म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.


१२७५



# चरित्र

REFBK-0005275

# श्रीसमर्थचरित्र



किंमत आठ आणे

जय जय रघुवीर समर्थ

श्रीसमर्थ सदन - प्रकाशन

— १ —

# श्रीसमर्थचरित्र

मनीं धरावें तें होतें ।
विघ्न अवघेंचि नासूनि जातें ।
कृपा केलिया रघुनाथें ।
प्रचीत येते ॥

लेखक
महाराष्ट्रभाषाभूषण
जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

REFBK-0005275

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे,
श्रीसमर्थ-सदन, बनाम हॉल लेन, गिरगांव, मुंबई

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन



प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे,
गिरगांव, मुंबई

मुद्रक
एस्. व्ही. परुळेकर,
मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई

# दोन शब्द

माझे मित्र रा. आजगांवकर यांच्या प्रेमाग्रहास्तव मी हे दोन शब्द लिहीत आहें. महाराष्ट्रकविचरित्रकार म्हणून त्यांचें नांव महाराष्ट्रास महशूर आहे. त्यांची आकर्षक लेखनपद्धती, प्रेमळ व निर्दोष भाषासरणी, मराठी कवितेचा तीन तपांचा व्यासंग, व कविचरित्र-प्रेम या त्यांच्या अंगच्या गुणांची मराठी वाचकांस ओळख आहेच. त्यांनीं लिहिलेलें प्रस्तुतचें त्रोटक श्रीसमर्थचरित्र तरुण वाचकांस समर्थांची धूळभेट करवून देण्यायोग्य आहे असें मला वाटतें. ह्यांत समर्थचरित्रांतल्या मुख्य मुख्य गोष्टी सरळ कथारूपानें सांगितल्या आहेत. समर्थांचें कुलवृत्त, सामर्थ्यसंपादन, अवतारकार्य, शिवाजी आणि रामदास, समर्थांचें राजकारण, समर्थ आणि श्रेष्ठ, समर्थ आणि त्यांचा शिष्यवर्ग, समर्थांची कविता व समर्थांचें प्रयाण या गोष्टी सुलभ व गोड वाणीनें रा. आजगांवकर यांनीं वर्णिल्या आहेत. सामान्य वाचकांस या गोष्टींचें वरवर ज्ञान करून देणारेंही छोटेसें एक पुस्तक पाहिजे होतें व ती उणीव या छोटेखानी पुस्तकानें भरून काढली आहे.

रामदास आणि शिवाजी, रामदास आणि राज-कारण, रामदास आणि पूर्वींचे संत याविषयीं गेल्या ३० वर्षांत विद्वानांत रणें माजून राहिलीं आहेत व

त्यांचा निःसंदेह व सर्वमान्य होण्यासारखा निष्कर्ष अद्याप कोणी काढलेला नाहीं. या बाबतींत आजगांवकरांशींही माझा क्वचित् मतभेद आहे. शिवराय व समर्थ यांची भेट शक १५७१ मध्येंच झाली असली पाहिजे असें तद्विरुद्ध पुरावे पाहूनही माझें मत कायम आहे. समर्थांची कर्तबगारी वर्णीत असतांना मागील संतांवर थोडाफार दोषारोप करण्याची आजगांवकरांची थोडीशी प्रवृत्ति प्रस्तुत पुस्तकांत दिसते, पण एकनाथ व दासोपंत यांच्या खांद्यावर उभे राहिलेले समर्थ हे त्यांचेंच एक पराक्रमी बालक आहे असा त्यांचे यांचे ग्रंथ पाहून माझा ग्रह झाला आहे ! समर्थांचा दासबोध म्हणजे दासोपंतांच्या ‘ ग्रंथराजाची ’ सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे. एकनाथांच्या ग्रंथांचा व चरित्राचा समर्थांवर अतिशय परिणाम झालेला स्पष्ट दाखवितां येण्यासारखा आहे. यावरून समर्थांचें महत्त्व कमी होतें असें नाहीं. त्यांचें कर्तृत्व स्वतंत्र आहे व तें महाराष्ट्रास पूर्णपणें पटलेलें आहे. आजगांवकरांच्या प्रस्तुत प्रबंधास समर्थग्रंथांची व समर्थचरित्राची छोटीशी ‘ प्रवेशिका ’ असें म्हणतां येईल. वाचकांनीं प्रस्तुत प्रबंध वाचून समर्थांविषयीं प्रेमादर बाळगावा व ‘ नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ’ या न्यायानें समर्थकाव्यमहोदधींत उडी घालावी व स्वतंत्रपणें जीं अनर्घ्यरत्नें हातीं लागतील तीं गोळा करावीं व कृतार्थतेचा मार्ग सुधरावा.

नाशीक सिटी, रंगपंचमी, शके १८५६. } संतचरणरज, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

# आभारप्रदर्शन

माझे मित्र, समर्थभक्त श्री. केशवराव ढवळे, मुंबईतील ग्रंथप्रकाशक, यांनीं गेल्या ता. १५ जानेवारी रोजीं मला मुद्दाम बोलावून सांगितलें कीं "श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचें शेंसव्वाशें पृष्ठांचें एक लहानसें चरित्र लिहून द्या, येत्या दासनवमीस तें प्रसिद्ध करावयाचें आहे." 'नाहीं' म्हणण्याची सोय नाहीं, म्हणून त्याच दिवशीं, समर्थस्मरण-पूर्वक चरित्रलेखनारंभ केला व अतिशय तांतडीनें–अवघ्या आठ दहा दिवसांत–चरित्रलेखन कसेंबसें पूर्ण केलें. लेखन आणि मुद्रण, दोन्ही एकसमयावच्छेदेंकरून चालू असल्यामुळें, सगळीच घाई झाली! याहून जरा अवकाशपूर्वक पुस्तक लिहितां आलें असतें तर बरें झालें असतें. दासनवमीपर्यंत पुस्तक बहुतेक छापून तयार झालें असतांही कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें त्या दिवशीं तें प्रसिद्ध करतां आलें नाहीं ही गोष्ट अलाहिदा. इतक्या घाईनें पुस्तक लिहावें लागल्यावर, इतरांनीं दीर्घ परिश्रमपूर्वक पूर्वींच तयार करून ठेवलेल्या सामग्रीचा उपयोग करणें भागच होतें. ही सामग्री, धुळें येथील समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव, कऱ्हाड येथील समर्थचरित्रकार श्री. सदाशिव खंडो आळतेकर व कै. महाराष्ट्र भाषाचित्रमयूर कृ. ना. आठल्ये यांच्या लिखाणांत आयतीच सांपडली. प्रस्तुत चरित्रलेखनाच्या कामीं जुन्या ग्रंथांचा मुळींच उपयोग केलेला नाहीं असें नाहीं, परंतु मुख्य माहिती वरील तिघां विद्वानांच्या ग्रंथांतूनच घेतलेली आहे व याबद्दल त्यांचे अत्यंत कृतज्ञतापूर्वक आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

माझे जुने मित्र ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन प्रस्तावनेदाखल दोन शब्द तांतडीनें लिहून पाठविले याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें.

मुंबई,
ता. २५ मार्च, १९३५

संतसेवक,
ज. र. आजगांवकर

# अनुक्रमणिका


कुलवृत्त, जन्म व बालपण ... ... ३
अति सुमुहूर्त सावधान! ... ... ९
सामर्थ्यसंपादन ... ... ... १२
अवतारकार्यारंभ ... ... ... २०
शिवाजी आणि रामदास ... ... ४३
समर्थांचें राजकारण ... ... ... ५५
जांब येथील वृत्तांत ... ... ... ६३
समर्थांचा शिष्यवर्ग ... ... ... ७२
समर्थांची कविता ... ... ... ८१
श्रीसमर्थ-निर्याण ... ... ... ९३
जांब, सज्जनगड व चाफळ ... ... १०३
उपसंहार ... ... ... ... १०९



शिवथरच्या ज्या घळींत **समर्थ** बसत असत त्या ठिकाणीं मुद्दाम जाऊन आर्टिस्ट श्री. **नी. म. केळकर** यांनीं, त्या स्थलीं ‘ समर्थ जप करीत फिरत आहेत ’ असें दाखविणारें हें चित्र कल्पनेनें काढलें आहे.

मराठी ग्रंथ
अनुक्रम

१

# कुलवृत्त, जन्म व बालपण

आमचा पुराणप्रसिद्ध भारतवर्ष म्हणजे धर्माचें माहेरघर; आणि त्यांतला हा आमचा महाराष्ट्र देश तर साधुसंतांची प्रसवभूमीच होय. पंढरपुरच्या पांडुरंगास विटेवर उभा करणाऱ्या पुंडलीकापासून थोड्या वर्षांपूर्वी समाधिस्थ झालेल्या गुलाबराव महाराजांपर्यंत, साधुसंतांची अखंड परंपरा आज शेंकडों वर्षें महाराष्ट्रांत चालू आहे. महाराष्ट्राचा जो भाग मोगलाईंत गेलेला आहे व ज्याला 'मराठवाडा' असें म्हणतात त्यांत तर इतके सत्पुरुष आजवर होऊन गेलेले आहेत कीं, त्यांची नुसती नामावलि देण्याचें योजिलें तरी तिच्यासाठीं या पुस्तकाचीं एकदोन पृष्ठें खर्ची घालावीं लागतील. मुकुंदराज, नामदेव, ज्ञानदेव, गोराकुंभार, दासोपंत, एकनाथ, जनार्दनस्वामी, विठ्ठल, वामन, मुक्तेश्वर, कृष्णदयार्णव, कृष्णदास मुद्गल, विसोबा खेचर, जनीजनार्दन, शिवदिन केसरी, इत्यादि बहुतेक प्रसिद्ध संतकवि या मराठवाड्यांत होऊन गेलेले आहेत.


याप्रमाणें हा परमपावन गोदातटाक साधुत्वाच्या पिकास फार अनुकूल असल्यामुळें, प्रस्तुत चरित्रनायक, महाराष्ट्रधर्मप्रवर्तक श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनींही याच पवित्र भूमींत अवतार घेऊन धर्म आणि राजकारण यांची सांगड घातली व महाराष्ट्रांत एक जयिष्णु उपासनामार्ग सुरू केला. पावणे तीनशें वर्षांपूर्वी, महाराष्ट्रांत, एकसमयावच्छेदेंकरून, निरनिराळ्या ठिकाणीं जे अनेक साधुसंत निर्माण झाले होते त्यांपैकीं बहुतेकांनीं 'समर्थ' ही पदवी एकवाक्यतापूर्वक ज्या महात्म्याला अर्पण केली त्याची कर्तबगारीही तशीच महत्त्वाची असली पाहिजे हें सांगावयास नकोच. ही कर्तबगारी कोणत्या प्रकारची होती व तत्कालीन महाराष्ट्रावर तिचा कोणता परिणाम झाला हें संक्षेपरूपानें सांगण्यासाठीं प्रस्तुत चरित्राचा अवतार आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे पूर्वज, प्राचीन काळीं, बेदर प्रांतीं औरंगाबादेच्या बाजूस रहात असत. पुढें इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या अखेरीस दुष्काळादि कारणांमुळें त्यांनीं त्या भूमीचा त्याग केला व शक ८८४ च्या सुमारास ते गोदातीरीं बीड येथें येऊन राहिले. समर्थांचा जो पूर्वज बीड येथें पहिल्यानें आला त्याचें नांव कृष्णाजीपंत ठोसर. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, गोत्र जामदग्न्य, सूत्र आश्वलायन. कृष्णाजीपंतांना पुत्र पांच— १ कचोपंत २ राघोपंत ३ हरिपंत ४ आत्माराम व ५ दशरथ. कचोपंत, राघोपंत, हरिपंत व आत्माराम यांनीं राक्षसभुवन, हिंवरें वगैरे गांवीं वसाहत करून तेथील कुळकर्ण्यांची व ज्योतिषाची वृत्ति संपादन केली. पांचवा मुलगा दशरथ यानें जांबेसुद्धां बारा गांवांची वृत्ति संपादन केली. यांपैकीं कसबें जांब हें गांव त्यानें नवीन वसविलें, व शक ९१०त त्या ठिकाणीं जाऊन त्यानें वास्तव्य केलें. दशरथ यास सहा मुलगे होते, त्यांपैकीं वडील मुलगा

रामाजीपंत याच्या वांट्यास जांब गांव आल्यामुळें तो तेथेंच राहिला व त्याचे बंधु आपापल्या वांट्यास आलेल्या गांवीं जाऊन राहिले. कृष्णाजीपंतापासून, समर्थांचे वडील सूर्याजीपंत यांच्यापर्यंत एकंदर २२ पुरुष या घराण्यांत होऊन गेले. सूर्याजीपंत शक १४९० त जांब येथें जन्मले. त्यांचे वडील लहानपणींच वारले होते. तत्कालीन शिक्षणपद्धतीप्रमाणें सूर्याजीपंतांचें थोडेंबहुत शिक्षण झालें होतें. ते लहानपणापासूनच सूर्योपासक असून श्रीरामाचीही उपासना करीत असत. सूर्याजीपंतांच्या पत्नीचें नांव रेणुका ऊर्फ राणूबाई. तीही पतिपरायण व सदाचारसंपन्न होती. या दांपत्यानें पुत्रप्राप्तीसाठीं बारा वर्षें सूर्याचें पुरश्चरण केल्यावर, त्याच्या कृपेनें, शक १५२७ त, विभावसु संवत्सरीं, मार्गशीर्ष शुद्ध १३ या दिवशीं त्यांना पहिला पुत्र झाला व त्याचें नांव त्यांनीं गंगाधर ठेविलें. श्रीसमर्थांचे हे वडील बंधु 'श्रेष्ठ' या नांवानें रामदासी संप्रदायांत प्रसिद्ध आहेत. गंगाधराचें उपनयन त्याच्या वयाच्या पांचव्या वर्षीं व लग्न सातव्या वर्षीं झालें. आंबडकर देशमुख यांच्या कन्येबरोबर हें लग्न झालें. हें देशमुखांचें घराणें आंबड येथें अद्याप प्रसिद्ध आहे. गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ यांनीं शेवटपर्यंत जांब येथेंच वास्तव्य केलें. यांना मारुतीच्या कृपेनें श्रीरामदर्शन झालें होतें असें जुन्या ग्रंथांत लिहिलें आहे. श्रेष्ठ हे भक्तिमार्गी संतकवि असून त्यांनीं लिहिलेले 'भक्तिरहस्य' व 'सुगमोपाय' हे दोन ओवीबद्ध ग्रंथ व इतर कांहीं स्फुट कविता प्रसिद्ध आहे. श्रीसमर्थ श्रेष्ठांस फार मान देत असत असें त्यांच्या चरित्रांतील कांहीं प्रसंगांवरून दिसतें. श्रेष्ठांचा निर्याणकाल व त्यांची संतति यासंबंधाची माहिती यथाक्रम पुढें देण्यांत येईल.

श्रेष्ठांच्या जन्मानंतर सुमारें दोन वर्षांनीं, शक १५३० कीलकनाम संवत्सरीं, चैत्र शुद्ध नवमी दिवशीं दुपारीं १२ वाजतां, श्रीराम-जन्माचे वेळीं, श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचा जन्म जांब येथेंच

झाला. दुसरा मुलगा, मारुतीचा अंशावतार होऊन धर्मप्रसार करील असा सूर्यनारायणानें वर दिला होता म्हणून सूर्याजीपंतांनीं मुलाचें नांव नारायण ठेविलें. समर्थांची जन्मकुंडली प्रसिद्ध आहे ती अशी—




समर्थांच्या बाललीलांचें मोठें मनोरंजक वर्णन गिरिधर, महीपति इत्यादि जुन्या चरित्रलेखकांनीं केलें आहे; त्यावरून असें दिसतें कीं, समर्थ हे बालपणापासूनच फार हूड, आनंदी व निर्भयवृत्तीचे होते. समर्थांस ‘समर्थ’ ही पदवी पुढें पुष्कळ वर्षांनीं प्राप्त झाली, म्हणून तूर्त ‘नारायण’ याच नांवानें आपण त्यांचा उल्लेख करूं. त्या वेळच्या चालीप्रमाणें नारायणाचीही मुंज त्याच्या पांचव्या वर्षीं म्हणजे शक १५३५ मध्यें झाली व मुंज होतांच त्याचें शिक्षणही सुरू झालें. तो तैलबुद्धि असल्यामुळें अल्पावकाशांतच लेखन, वाचन व जमाखर्च, येवढी विद्या त्यानें संपादन केली. शिवाय, ब्राह्मणबटूस आवश्यक असलेलें संस्कृताचें व ब्रह्मकर्माचेंही अध्ययन त्यानें केलें. नारायणाचें बाळबोध अक्षर फार वळणदार होतें. विद्याध्ययनाबरोबरच तालमीनें शरीरसामर्थ्य वाढविण्याचा क्रम त्यानें चालू ठेवला होता. शाळासोबत्यांस बरोबर घेऊन रानावनांतून फिरण्याचाही त्याला नाद होता.

गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ यांस श्रीरामदर्शन झालें होतें याला पुरावा ‘भक्तिरहस्य’ ग्रंथांतील पुढील ओवींत सांपडतो. श्रेष्ठ म्हणतात—

तो सद्गुरु जगद्गुरु समर्थ । भावेंचि भेटला श्रीरघुनाथ ।
मस्तकीं ठेऊनि पद्महस्त । स्वस्वरूप प्रकाशिलें ॥

आतां श्रीसमर्थ रामदास यांस बाळपणींच श्रीरामाचा साक्षात्कार कसा झाला होता हें पाहूं. समर्थांचे वडील सूर्याजीपंत हे एके दिवशीं गोदेवर स्नानास गेले असतां, दूतवेषानें एक वानरगण त्यांच्या घरीं आला आणि धाकट्या नारायणास घेऊन गांवाबाहेर गेला. वानराच्या खांद्यावर बसून जात असतां नारायण फार भयभीत होऊन पहातो तों असा चमत्कार त्याच्या दृष्टीस पडला कीं, सांवळ्या रंगाचा एक पुरुष व एक स्त्री अशीं दोघें पालखींत बसलेलीं असून त्यांचे सेवक त्यांच्यासभोंवतीं उभे आहेत. वानरानें नारायणास नेऊन त्या जोडप्यापुढें उभें केलें, तेव्हां त्या श्यामवर्ण पुरुषानें ( तो श्रीरामचंद्रच होता. ) त्यास जवळ बोलाविलें व त्याचें मस्तक कुरवाळून त्याच्या हातीं एक पत्र दिलें. तें राममुद्रांकित पत्र नारायणाचे हातीं पडतांच त्याची वृत्ति पालटली. त्याच्या अंगास थरथर कंप सुटला व तोंडांतून एक शब्दही बाहेर पडेना ! तो क्षणांत रडूं लागला, क्षणांत हसूं लागला व क्षणांत नाचूं लागला. जवळ जवळ वेड लागल्यासारखी त्याची स्थिति झाली. थोड्या वेळानें, त्याच्या डोळ्यांपुढचा तो विचित्र देखावा हळूहळू नाहींसा झाला व गांवाबाहेरच्या अरण्यांत आपण एकटेच आहों हें त्याच्या लक्षांत आलें. परंतु पाहिलेल्या प्रकारामुळें मंत्रमूढाप्रमाणें त्याची स्थिति झाली होती. इकडे नारायणाचे वडील सूर्याजीपंत व बंधु गंगाधर हे घरीं आले तेव्हां वानरानें नारायणास नेल्याचें वर्तमान त्यांस समजलें. तें ऐकतांच ते मोठ्या काळजींत पडले व नारायणाचा शोध करीत गांवाबाहेर चालले; तों ब्रह्मारण्यांत नारायण त्यांस एकटाच सांपडला. तो विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें देत नाहीं व कांहीं बोलत चालत नाहीं हें पाहून त्यांस आश्चर्य

वाटेल. इतक्यांत कांहीं ग्रामस्थ लोकही तेथें आले. नारायणाची पालटलेली चर्या व मूकवृत्ति पाहून त्यांतील कांहीं लोकांनीं असा तर्क केला कीं, याला भूतबाधा झाली असावी.

**कोणी म्हणती ब्रह्मराक्षस। कां लागली झोटिंगाची टापस।**
**कोणी म्हणती अहो यास। मुंज्या लागला निश्चयेंसी॥**

अशा प्रकारें निरनिराळे लोक निरनिराळे तर्क करूं लागले; व पंचाक्षरी बोलावून भूत काढण्याची सूचना कांहीं लोकांनीं केली! शेवटीं, मंडळीनें नारायणास घरीं उचलून आणलें. तेथें, त्याची मूठ उघडून पाहतांच तें रामनामांकित पत्र त्यांना सापडलें. पत्र वाचतांच असा चमत्कार झाला कीं, पत्रांतले शब्द कानीं पडतांच गंगाधर व नारायण या दोघांचीही समाधि लागली!

याप्रमाणें, श्रीसमर्थांस ज्या दिवशीं श्रीरामदर्शन होऊन भगवंताचा अनुग्रह झाला, त्याच दिवशीं सूर्याजीपंतांचें निर्याण झालें व श्रेष्ठांस समाधिसुखानुभव यऊन त्यांनीं आपली लेखणी रघुवीरचरणीं वाहिली, अशी हकीकत समर्थशिष्य दिनकर गोसावी रामदासी यांनीं आपल्या 'स्वानुभवदिनकर' ग्रंथाच्या १६ व्या कलापांत दिली आहे. गिरिधरकृत 'समर्थप्रताप' ग्रंथांतही, या कथेचा, थोड्याशा फरकानें उल्लेख केलेला सांपडतो.

२

# ‘अति सुमुहूर्ते सावधान!’

नारायणाचे वडील बंधु गंगाधर यांचें लग्न झाल्यावर कांहीं वर्षांनीं सूर्याजीपंत निवर्तले. पुढें नारायणाचेंही लग्न लवकरच करावें असें ठरवून राणूबाई वधू पाहूं लागल्या व शेवटीं जवळच्या आसनगांवच्या भानजीपंत बोधलापुरकरांची मुलगी निश्चित केली. हे भानजीपंत राणूबाईंचे बंधु अर्थात् नारायणाचे मामा असून मोठे हरिभक्त होते. वधूनिश्चय होतांच उभयपक्षीं लग्नाची तयारी सुरू झाली. परंतु लग्नाचा विचार नारायणास पसंत नव्हता. संवगड्यांनीं लग्नाची गोष्ट काढून त्याची थट्टा सुरू केली कीं, त्यानें रानांत पळून जाऊन झाडावर चढून बसावें. अशीच एकदां लग्नाची गोष्ट निघाली असतां नारायण रागानें नदीकांठच्या एका झाडावर जाऊन बसला व लोक शोधावयास आले तेव्हां त्यानें झाडावरून नदींत उडी टाकली. तेथें पाण्यांत खडक होता त्यावर त्याचें डोकें आपटून तेथें टेंगूळ आलें, तें अखेरपर्यंत होतें.

'अति सुमुहूर्ते सावधान!'

हो ना करतां करतां शेवटीं आईच्या आग्रहावरून नारायणानें लग्नास उभें रहाण्याचें कबूल केलें. देवकस्थापनादि प्राथमिक विधि झाल्यावर वर व वधू यांस समोरासमोर उभीं करून अंतरपाट धरण्यांत आला व ब्राह्मण मंगलाष्टकें म्हणूं लागले. मंडपांत वऱ्हाडी मंडळीची बरीच गर्दी झाली होती. शेवटच्या अक्षता पडून अंतरपाट दूर होणार तोंच, आपल्याकडे कोणाचें लक्ष नाहीं असें पाहून नारायणानें जी धूम ठोकली ती एकदम गांवाबाहेर! तेथून रातोरात तो गोदावरीपर्यंत गेला व नदी उतरून, फिरतफिरत नाशिकाजवळ पंचवटीस गेला. बोहल्यावरून वर पळाला हें लोकांच्या लक्षांत येतांच लग्नमंडपांत मोठा कोलाहल झाला. वधूपक्षाची मंडळी तर फारच चिंतातुर झाली. शेवटीं, वराचा शोध लागत नाहीं असें पाहून, त्याच दिवशीं, दुसऱ्या एका वराशीं वधूचें लग्न लावण्यांत आलें. एकंदर हकीकतीवरून, नारायणाचें लग्न गोरजमुहूर्तावर होण्याचें ठरलें होतें असें दिसतें. कारण, दिवसा लग्न असतें तर मंडपांतील सर्व लोकांची नजर चुकवून नारायणास असें पळून जातां आलें नसतें. काळोख होता म्हणूनच तसें करणें त्यास शक्य झालें.असो.

अशा रीतीनें लग्नाचा बेरंग करून नारायण पळून गेल्यावर राणूबाईनीं व इतर मंडळीनें आसपासच्या गांवीं त्याचा पुष्कळ तपास केला, पण शोध लागला नाहीं. कारण, नारायणानें रातोरात गोदातीरापर्यंत मजल मारून व नदी उतरून बरेंच अंतर तोडलें होतें. शेवटीं मुलाचा पत्ता लागत नाहीं असें पाहून राणूबाई फारच शोकाकुल झाली. गंगाधरानें व इतर नातेवाईकांनीं तिची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु कसें झालें तरी तें मातृहृदय; शिवाय मुलगा मोठा असता तर गोष्ट जरा निराळी होती पण नारायण तर त्या वेळीं ११ वर्षांचा होता. तेव्हां त्याचा विरह राणूबाईस अतिशयच जाणवला असेल हें काय सांगावयास पाहिजे?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ... वि: चरित्र
ग्रं: लि:
क्रमांक

आज माझा नारायण परत येईल, उद्यां येईल, निदान तो कोठें तरी सुखरूप आहे अशी बातमी तरी कोणी येऊन सांगेल, या आशेनें ती प्रेमळ माउली दिवस मोजीत बसली.

एवढ्या लहान वयांत, विवाहपाशाची भीति बाळगून, प्रिय माता आणि बंधु यांचा त्याग करण्यास एखाद्यानें प्रवृत्त होणें ही सामान्य गोष्ट नव्हे. पूर्वजन्मार्जित वैराग्यवृत्तीशिवाय किंवा श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांत वर्णिलेल्या योगभ्रष्ट पुरुषाची कोटि प्राप्त झाल्याशिवाय, ११ वर्षांच्या बालवयांत कोणत्याही मनुष्याची पारमार्थिक वृत्ति जागृत होणें शक्य नाहीं. खावेंप्यावें, विद्याभ्यास करावा, समवयस्क संवगड्यांबरोबर शैशवसुलभ क्रीडा कराव्या, पुढें तारुण्य येतांच लग्न करून संसार थाटावा आणि शेवटीं मरेपर्यंत संसारांतच गढून जाऊन एके दिवशीं कीडमुंगीप्रमाणें मरून जावें हाच बहुतेकांचा ठराविक आयुष्यक्रम; देवधर्म, परमार्थ, परोपकार यांचें महत्त्व ओळखून, त्यांत आपल्या आयुष्याचा अल्प तरी काल व्यतीत करावा ही जाणीव बाळगून तदनुसार वर्तन करणारे विरळा; आणि बालपणींच सावध होऊन 'हें विश्वचि माझें घर' हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून, तें प्राप्त करून घेण्याचा निर्धारपूर्वक प्रयत्न करून, शेवटीं वसुधैव कुटुंबकाच्या कोटीस जाऊन पोंचणारे महाभाग तर त्याहूनही विरळा. श्रीशंकराचार्य, ज्ञानदेव, एकनाथ वगैरे पुरुष या कोटींत येतात व म्हणूनच जुन्या संतचरित्रकारांनीं अवतारी पुरुषांत त्यांची गणना केली आहे. श्रीसमर्थ रामदासस्वामी हे मारुतीचा अवतार होते अशी जी महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाची समजूत आहे, तिच्या मुळाशीं हीच कल्पना आहे. नारायणानें लग्नमंडपांतून पलायन केलें, त्यासंबंधानें पंत म्हणतात—

**द्विज सावधान ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं म्हणती ।**
**तें एक रामदासें आयकिलें त्या असो सदा प्रणती ॥**

३

# सामर्थ्यसंपादन

या प्रकरणास मी ‘सामर्थ्यसंपादन’ हा मथळा दिला आहे. यावरून नारायण आतां शारीरिक सामर्थ्य संपादन करण्याच्या मार्गास लागला असें मात्र कोणी समजूं नये. एक प्रकारचें ‘सामर्थ्य’ संपादन करण्याचा प्रयत्न नारायणानें सुरू केला ही गोष्ट खरी, पण तें सामर्थ्य फार श्रेष्ठ दर्ज्याचें होतें. ज्या सामर्थ्यामुळें नारायणास पुढें ‘समर्थ’ ही फार थोर पदवी प्राप्त झाली तें हें अलौकिक पारमार्थिक सामर्थ्य होय.

जांबेहून पळून नारायण गोदाकांठानें नाशिकजवळ टाकळी येथें आला. या स्थलीं गोदावरी व नंदिनी या नद्यांचा संगम झालेला आहे. टाकळी येथें एका गुहेंत नारायणानें आपला मुक्काम ठोकला व रोज सकाळीं संगमावर स्नानास येऊन, कंबरभर पाण्यांत उभें राहून, श्रीराम जयराम जय जय राम या त्रयोदशाक्षरी मंत्राचा १३ कोटी जप करण्याचा निश्चय केला. या निश्चयाप्रमाणें त्याचा

वर्तनक्रम सुरू असतां मधुकरीवर तो आपला निर्वाह चालवीत असे. मंत्रजपाबरोबरच भक्तिमार्गाच्या संस्कृत ग्रंथांचा त्याचा व्यासंग चालू होता. दासबोधादि ग्रंथ ज्या संस्कृत ग्रंथांचे आधारें त्यांनीं लिहिले ते गीता भागवतादि ग्रंथ टाकळी येथील आपल्या बारा वर्षांच्या मुक्कामांतच त्यांनीं पाहिले. इतर गीता व रामायण यांचेंही वाचन त्यांनीं याच कालांत केलें असावें. जपाची संख्या जसजशी वाढत चालली तसतसा नारायणाचा पारमार्थिक अधिकारही वाढत चालला व त्याला वाचासिद्धि प्राप्त झाली. या वाचासिद्धीचा एक चमत्कार येथें देतों.

टाकळीच्या उत्तरेस दोन मैलांवर दशकपंचक या नांवाचें एक गांव आहे. तेथें गिरिधरपंत कुळकर्णी नामक एक तरुण अग्निहोत्री ब्राह्मण रहात असे. क्षयाच्या विकारानें हा ब्राह्मण एके दिवशीं मरण पावला व त्याचें प्रेत दहनार्थ टाकळी येथें संगमाजवळ नेण्यांत आलें. या ब्राह्मणाची पतिव्रता स्त्री अन्नपूर्णाबाई हिनें पतीबरोबर सहगमन करण्याचा निश्चय केला व तीही पतीच्या शवाबरोबर संगमावर आली. सहगमन करण्यापूर्वी, तपस्वी पुरुषाला नमस्कार करावा या हेतूनें ती समर्थांपाशीं आली आणि तिनें मोठ्या भक्तिभावानें त्यांना वंदन केलें. एकंदर परिस्थिति काय आहे हें लक्षांत न घेतांच समर्थांनीं तिला ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ’ असा आशीर्वाद दिला. तो ऐकतांच बाईनें स्मितपूर्वक विचारलें, “ या जन्मीं कीं पुढील जन्मीं ? ” हा प्रश्न ऐकून समर्थ बुचकळ्यांत पडले. लक्षपूर्वक पाहिल्यावर त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं, ज्या बाईस आपण आशीर्वाद दिला तिचा पति मृत झालेला असून ती त्याच्या शवाबरोबर सहगमन करण्यासाठीं येथें आलेली आहे ! ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ’ हे शब्द जरी आपण सहज औपचारिक रीतीनें उच्चारले असले तरी ते खोटे होतां कामा नयेत;

कारण जर ते खोटे ठरले तर आपल्या शब्दांचें महत्त्व काय ? असा विचार करून समर्थांनीं प्रेत जवळ आणण्यास सांगितलें व भगवंताचें स्मरण करून गंगोदक प्रेतावर शिंपडलें. तत्काळ तें प्रेत सजीव होऊन 'राम राम' म्हणत हालचाल करूं लागलें. लोकांनीं बंध सोडतांच बिचारा गिरिधरपंत उठून उभा राहिला व सभोंवतालच्या भीषण देखाव्याकडे टकमकां पाहूं लागला. बाईचा पति जीवंत होतांच समर्थ तिला म्हणाले, "बाई 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद मी तुम्हास दिला, तो याच जन्मीं खरा व्हावा म्हणून दिला. पण आतां तुम्हाला मी आणखी आशीर्वाद देतों कीं, आठांच्याऐवजीं तुम्हाला दहा पुत्र होतील." आणि खरोखरच हा आशीर्वाद पुढें खरा ठरून अन्नपूर्णाबाईस दहा पुत्र झाले व त्यामुळें त्या घराण्यास 'दशपुत्रे' हें आडनांव पडलें, तें अद्याप चालू आहे. गिरिधरपंत व अन्नपूर्णाबाई यांस पहिला पुत्र झाला त्याचें नांव त्यानीं उद्धव ठेविलें व पुढें तो त्यानीं समर्थांस अर्पण केला. समर्थांनीं पुढें जे अनेक शिष्य केले त्यांपैकीं उद्धव हा एक प्रमुख शिष्य होय.

टाकळी येथें समर्थांनीं बारा वर्षें वास्तव्य केलें व तेवढ्या मुदतींत त्यांना साक्षात्कार वगैरे होऊन जगदुद्धार करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं आलें. कवितारचनेसही त्यांनीं याच ठिकाणीं प्रारंभ केला असावा असें वाटतें. वयाचीं पहिलीं दहा बारा वर्षें जांब येथें, पुढचीं बारा वर्षें टाकळी येथें, व त्यानंतर बारा वर्षें तीर्थयात्रा करण्यांत समर्थांनीं घालविलीं. टाकळीहून ते जेव्हां तीर्थयात्रेस निघाले त्या वेळीं छोट्या उद्धवानें त्यांजबरोबर जाण्याचा हट्ट धरला. तेव्हां "तूं अद्याप लहान आहेस, प्रवासाचे कष्ट तुला सोसणार नाहींत. तीर्थयात्रा पुरी झाल्यावर मी जेव्हां एकाच जागीं स्थिर होईन तेव्हां तुला घेऊन जाईन," असें सांगून समर्थांनीं

त्याची समजूत घातली व आपण परत येईपर्यंत नित्य मारुतीची पूजा करण्यास व भिक्षा मागून पुरश्चरण करण्यास सांगितलें.

टाकळी सोडल्यावर पुढील बारा वर्षांत समर्थांनीं उत्तरदक्षिणेंतील बहुतेक तीर्थयात्रा केल्या, परंतु या प्रवासांत त्यांजबरोबर आणखी कोणकोण होते व कोणत्या क्रमानें त्यांनीं तीर्थयात्रा केल्या या संबंधाची विश्वसनीय व विस्तृत माहिती कोणत्याही जुन्या ग्रंथांत सांपडत नाहीं. जी काय त्रोटक माहिती उपलब्ध आहे तीवरून असें दिसतें कीं, समर्थ पहिल्यानें काशीस गेले व तेथून गया, अयोध्या, प्रयाग वगैरे तीथ करून, पंजाबांत गेले. तिकडील कुरुक्षेत्रादि तीर्थें केल्यावर ते बहुतकरून उज्जनीवरून द्वारकेस गेले असावे व काठेवाडांतील प्रभासपट्टण, गिरनार व गुजराथेंतील डाकोर, मातृगया वगैरे क्षेत्रें करून, पुनः दक्षिणेस येऊन गोदातीरानें आंवढ्या नागनाथ, घृष्णेश्वर, परळी वैजनाथ वगैरे क्षेत्रें करीत करीत पूर्वेस कदाचित् जगन्नाथपुरीपर्यंत गेले असावे. तिकडून पुनः दक्षिणेस जाऊन तिरुपती, शिवकांची, विष्णुकांची, पंपासरोवर, मल्लिकार्जुन, पक्षीतीर्थ वगैरे तीर्थें करीत करीत रामेश्वरापर्यंत गेले असावेत. उत्तरेंत असतांना बद्रीकेदार, बद्रीनारायण, गंगोत्री, जम्नोत्री, हरिद्वार वगैरे हिमालयांतील तीर्थयात्राही त्यांनीं केल्या असाव्या. पंढरपुर, त्र्यंबकेश्वर, पैठण, आळंदी, तुळजापुर, करवीर, भीमाशंकर, जेजुरी, नीरानरसिंगपुर, वगैरे महाराष्ट्रांतील सर्व तीर्थक्षेत्रें त्यांनीं केलींच असलीं पाहिजेत. सतत बारा वर्षें ज्यांनीं तीर्थयात्रेंत घालविलीं त्यांनीं देशांतलें कोणतेंही ठळक पुण्यक्षेत्र पहावयाचें ठेवलें असेल हें शक्यच नाहीं. तीर्थयात्रेचें महत्त्व समर्थांनीं आपल्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं वर्णिलें आहे. ‘ **जेथें ज्या तीर्थासि जावें । तेथें त्या देवाचें दर्शन घ्यावें** ’ असा त्यांचा दंडकच आहे. मात्र तीर्थयात्रा करण्यांत नुसतें पुण्यसंपादन करावें येवढाच त्यांचा

हेतु नव्हता. भिक्षा आणि तीर्थाटन यांच्या मिषानें एकंदर देशस्थितीचें आणि लोकस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करावें आणि सगळे लोक ' पारखून सोडावे, ' हाच त्यांचा मुख्य उद्देश होता. पुढील धर्मकारणाची आणि राजकारणाची ही सगळी तयारी होती हें सांगावयास नकोच. परधर्मीय लोकांनीं आपल्या देशाचा बहुतेक भाग कसा व्यापून टाकला आहे, तीर्थस्थानें कशीं भ्रष्ट केलीं आहेत, धर्मवेडाच्या भरांत हिंदु देवतांच्या मूर्तींचा कसा विध्वंस करण्यांत आला आहे, अकस्मात् आलेल्या परधर्मीय लोकांच्या टोळधाडीमुळें हिंदु बहुजनसमाज कसा किंकर्तव्यमूढ होऊन बसला आहे वगैरे सर्व परिस्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्यावर या धर्मवीराला जो भयंकर संताप आला त्याची छाया त्याच्या ग्रंथांत सर्वत्र पडलेली दिसते.

अशा रीतीनें बारा वर्षांची ही तीर्थयात्रा पुरी झाल्यावर समर्थ पुनः गोदातटीं आले. ते पैठण येथें गेले असतां तेथें त्यांच्या कीर्तनास आलेल्या एका ब्राह्मणानें त्यांस ओळखलें. त्यांच्या कपाळावरील आवाळू पाहून, लग्नांतून पळून गेलेला जांबच्या सूर्याजीपंताचा मुलगा नारायण हाच असावा असें त्यास वाटलें. नंतर तो समर्थांपाशीं जाऊन त्यांस म्हणाला, "तुमची आई तिकडे तुमच्या विरहानें मरणाच्या दारीं बसली आहे आणि तुम्ही इकडे कीर्तनें करीत फिरत आहां. रडून रडून त्या बिचारीचे डोळे गेले. आतां तरी तिला भेटून तिचें समाधान करा." त्या ब्राह्मणाचें हें भाषण ऐकून समर्थांस फार वाईट वाटलें असेल हें सांगावयास नकोच. परंतु, बाह्यतः त्यांनीं आपले सर्व मायापाश तोडून टाकले होते; भगवत्प्राप्तीपुढें प्रिय जनांचा लोभ क्षुल्लक असून भगवत्प्राप्तीला जर प्रियजन आड येत असतील तर त्यांचा त्याग[१] करावा असें

---

१ ' जेणें भगवंतीं घडे अंतराय । हो कां बाप माय त्यजावीं तीं, ' या अभंगांत तुकारामबुवांनींही हाच उपदेश केला आहे.

त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. ‘ **देवाचिया भेटीसाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी.** ’ असें जर त्यांनीं स्वतःच म्हटलें आहे तर तद्विरुद्ध त्यांचें आचरण कसें असेल ? राणूबाईंना नारायणाच्या विरहानें दुःख झालें तसें राणूबाईच्या विरहानें नारायणालाही दुःख झालें नसेल असें नाहीं, परंतु आपल्या अवतारकार्याची जाणीव त्याला असल्यामुळें त्यानें तें दुःख निमूटपणें सोसलें, इतकेंच. आतां, आईची स्थिति प्रत्यक्ष ऐकल्यावर त्यांचें मातृप्रेम तत्काळ जागृत झालें व मातृदर्शनार्थ ते पैठणहून तडक जांबगांवीं आले. घराच्या अंगणांत उभें राहून ‘जयजय रघुवीर समर्थ’ अशी त्यांनीं गर्जना केली तेव्हां कोणी गोसावी भिक्षेस आला आहे असें समजून राणूबाईनें सुनेस—श्रेष्ठांची पत्नी पार्वतीबाई हीस—त्याला भिक्षा वाढण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पार्वतीबाई भिक्षा घेऊन आली असतां समर्थ म्हणाले, ‘ हा भिक्षा घेणारा गोसावी नव्हे. ’ ‘ मग तुला काय पाहिजे ? ’ असें राणूबाईनीं विचारलें. तेव्हां समर्थ म्हणाले, ‘ आई, तूं मला ओळखलें नाहींस ? मी तुझा नारायण ना ? ’ आणि इतकें बोलून त्यांनीं आईचे पाय धरले. राणूबाईचा आनंद गगनांत मावेना. चोवीस वर्षांपूर्वीं घरांतून निघून गेलेला मुलगा अकस्मात् परत आलेला पाहून, त्याच्यासाठीं कंठांत प्राण ठेवून बसलेल्या त्या प्रेमळ मातेस काय वाटलें असेल आणि त्या आनंदाच्या भरांत तिनें त्याला किती कुरवाळलें असेल आणि प्रेमाश्रूंनीं त्याचें डोकें कसें भिजवून टाकलें असेल याची कल्पना कोणत्याही सहृदय मनुष्यास सहज होण्यासारखी आहे. नारायणाला राणूबाईनीं पोटाशीं धरलें, कुरवाळलें, परंतु त्यांचे डोळे गेलेले असल्यामुळें त्याला डोळे भरून पहाणें त्यांना शक्य नसल्यामुळें त्या फार कष्टी झाल्या. ती गोष्ट समर्थांच्या लक्षांत येतांच त्यांनीं आपला वरदहस्त आपल्या मातेच्या डोळ्यांवरून फिरविला व

त्याबरोबर तिची गेलेली दृष्टि परत आली! समर्थांचा तो गोसाव्याचा वेष पहातांच राणूबाईंनीं विचारलें, "नारोबा, तुला कोणत्या भूतानें पछाडलें?" समर्थांनीं उत्तर दिलें, "आई, ज्या भूतानें मला पछाडलें आहे तें भूत असें तसें नाहीं. हें महाभूत आहे. कोणत्याही मंत्रतंत्रानें हें जाणारें नाहीं. मंत्र म्हटला तर उलट हें जास्तच घट्ट धरून बसतें." या प्रसंगास अनुलक्षून समर्थांनीं लिहिलेलें किंवा कदाचित् तेथल्या तेथें रचून म्हटलेलें एक पद प्रसिद्ध आहे तें असें—

**तेंचि भूत गे माय। तेंचि भूत गे॥ ध्रु०॥**
**होतें वैकुंठींचे कोनीं। शिरलें अयोध्याभुवनीं।**
**लागे कौसल्येचे स्तनीं। तेंचि भूत गे॥ १॥**
**जातां कौशिक–राउळीं। अवलोकिली भयंकर काळी।**
**क्षणीं ताटिका निर्दाळी। तेंचि भूत गे॥ २॥**
**मार्गीं जातां वनांतरीं। पाय पडला दगडावरी।**
**पाषाणाची जाली नारी। तेंचि भूत गे॥ ३॥**
**जनकाचे अंगणीं गेलें। शंकराचें धनु भंगिलें।**
**वैदेही–अंगीं संचरलें। तेंचि भूत गे॥ ४॥**
**जेणें सहस्त्रार्जुन वधिला। तोही तत्काळचि भ्याला।**
**धनुष्य देउनि देह रक्षिला। तेंचि भूत गे॥ ५॥**
**पितयाचे भाकेसी। कैकयीचे वचनासी।**
**मानुनि गेलें अरण्यासी। तेंचि भूत गे॥ ६॥**
**चौदा संवत्सर तापसी। अखंड हिंडे वनवासी।**
**सांगातीं भुजंग पोशी। तेंचि भूत गे॥ ७॥**
**करी सुग्रीवपालन। वालीचें निर्दालन।**
**तारी पाण्यावरि पाषाण। तेंचि भूत गे॥ ८॥**

रक्षी मरणीं बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण ।
तोडी अमरांचें बंधन । तेंचि भूत गे ॥ ९ ॥
वामांगीं स्त्रियेला धरिलें । धावुनि शरयुतीरा आलें ।
तेथें भरतासी भेटलें । तेंचि भूत गे ॥ १० ॥
सर्व भूतांचें हृदय । नाम ज्याचें रामराय ।
रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे ॥ ११ ॥

या पद्यांत रामायणाचें सार संक्षेपानें सांगितलें असून काव्यदृष्ट्याही हें पद्य फार सुंदर आहे.

वरीलप्रमाणें, मातापुत्रांचे प्रेमालाप सुरू आहेत तों श्रेष्ठही घरांतून बाहेर आले व त्यांनीं नारायणास बंधुप्रेमानें आलिंगन दिलें. वरील पद्याचा 'धावुनि शरयूतीरा आलें। तेथें भरतासी भेटलें' हा चरणच त्या वेळीं सार्थ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. फरक इतकाच कीं, भरत हा रामाचा कनिष्ठ बंधु होता व श्रेष्ठ हे समर्थांचे ज्येष्ठ बंधु होते. असो. थोडे दिवस घरीं मुक्काम करून व आईचा निरोप घेऊन समर्थ जांबेहून जगदुद्धारार्थ बाहेर पडले.

अवघ्या बारा वर्षांत समर्थांची जी इतकी पारमार्थिक उन्नति झाली तिचें कारण त्यांचें कडकडीत वैराग्य होय. त्रयोदशाक्षरी मंत्राचा तेरा कोटि जप त्यांनीं पाण्यांत उभें राहून केला त्यामुळें त्यांना साक्षात्कार होऊन सिद्धि प्राप्त झाली व त्या अधिकाराच्या जोरावर त्यांनीं 'समर्थ' ही पदवी संपादन केली. प्रभुनामस्मरणाचें काय रहस्य आहे हें समर्थांसारख्यांच्या चरित्रावरून समजतें; वैराग्य, सदाचार, भूतदया इत्यादिकांना उपासनेची जोड मिळाली म्हणजे भगवत्कृपा दूर नाहीं हें समर्थादि संतांनीं स्वानुभवानें सिद्ध करून दाखविलें आहे. त्यांच्या अनुकरणानें व तदुपदिष्ट मार्गानें तसा अधिकार संपादन करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

४

# अवतारकार्यारंभ

बारा वर्षें तीर्थयात्रा करीत असतांना समर्थांनीं कांहीं ठिकाणीं मारुतीची स्थापना केली, परंतु मठस्थापना केली असेल असें वाटत नाहीं. पुढें कृष्णातटाकीं ते स्थिर झाल्यावर त्यांच्या शिष्यांची संख्या जसजशी वाढत गेली तसतसे निरनिराळे मठ स्थापन करून तेथें एकेका शिष्याची योजना त्यांनीं केली असावी हेंच अधिक संभवनीय दिसतें.

तीर्थयात्रा पुरी झाल्यावर, स्वदेशीं जाऊन कृष्णातीरीं कायम वस्ती करावयाची हें समर्थांनीं, पूर्ण विचारांतीं, अगोदरच ठरवून ठेवलें असावें असें दिसतें. कारण, मातृदर्शन घेऊन जांबेहून ते निघाले ते तडक कृष्णाकांठीं मसूर येथें आले व त्याच भागांत शेवटपर्यंत राहिले. महाराष्ट्राचा हाच भाग त्यांनीं आपल्या वास्तव्यार्थ कां पसंत केला असावा हें अनुमानानें सहज ताडतां येण्यासारखें आहे. एक तर, या भागापासून तत्कालीन मुसलमान

राज्यकर्त्यांच्या राजधान्या बऱ्याच दूर असल्यामुळें त्यांचा संसर्ग या भागास कमी प्रमाणांत होत असे व दुसरें असें कीं, ह्या भागावर मुख्य राजसत्ता जरी मुसलमानाची होती तरी प्रत्यक्ष अंमल मोरे, शिर्के, निंबाळकर वगैरे मराठे सरदारांचा होता. छत्रपति शिवाजी महाराजांचे वडील शहाजी यांची, पुणें व सुपें ही जहागीरही याच टापूंत होती. पुढें शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापनेस आरंभ केल्यावर हाच प्रदेश पहिल्यानें आपल्या ताब्यांत घेतला. अर्थात् यवनसंसर्गापासून अलिप्त असलेला हा प्रदेश आपल्या अंगीकृत कार्यास विशेष अनुकूल आहे असें समर्थांस वाटणें साहजिक होतें. असो. शक १५६६ मध्यें तारण नामसंवत्सरीं वैशाखमासीं समर्थ पहिल्यानें कृष्णातीरीं आले.

कृष्णाकांठीं आल्यावर तो सर्व टापू त्यांनीं एकदां डोळ्यांखालून घातला. महाबळेश्वर, कऱ्हाड, शहापूर, माहुली इत्यादि स्थलीं ते वरचेवर जात असत. डोंगरावर किंवा डोंगराच्या घळींत वस्ती करून शेजारच्या गांवीं भिक्षा मागावी, असा त्यांचा क्रम होता. समर्थ कऱ्हाडानजीक असतांना, कऱ्हाडहून पांच मैलांवर असलेल्या शहापूरच्या डोंगरावर रहात असत व तेथून कऱ्हाड येथील कृष्णा–कोयनेच्या प्रीतिसंगमावर स्नानसंध्यादि आन्हिक करण्यास जात असत. नित्यकर्म पुरें झाल्यावर मसूर किंवा शहापूर येथें कोरडी भिक्षा मागून पुनः डोंगरावर जात व तेथें पानगे करून श्रीरामास त्यांचा नैवेद्य समर्पण केल्यावर भोजन करीत. या बाजूस समर्थांचा मुक्काम असतांना घडलेली एक चमत्कारिक गोष्ट जुन्या ग्रंथांत दिली आहे ती अशी–एके दिवशीं समर्थ शहापूर येथें बाजीपंत कुळकर्णी यांचे घरीं भिक्षेस गेले व ‘जयजय रघुवीर समर्थ’ अशी त्यानीं गर्जना केली. ती ऐकून बाजीपंतांची बायको सईबाई ही बाहेर येऊन त्यांस रागानें म्हणाली, “मुलांमाणसांनीं

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम... दि:



भरलेल्या घरांत असले शब्द उच्चारूं नका." परंतु समर्थांनीं तिच्या कुरकुरीकडे बिलकुल लक्ष न देतां तोच क्रम पुढें चालविला व सईबाईही त्याबद्दल नित्य त्यांची कानउघाडणी करीत असे. एके दिवशीं समर्थ भिक्षेस गेले असतां बाजीपंतांच्या घरांतील सर्व बायका चिंताग्रस्त झालेल्या दिसल्या. समर्थांनीं त्या गोष्टीचें कारण विचारतां सईबाई म्हणाली, "कऱ्हाडच्या मुसलमान अधिकाऱ्यानें बाजीपंतांस गांवकीच्या हिशोबासाठीं विजापुरास नेलें असून तेथें त्यांना फार त्रास होत आहे." समर्थांनीं तिला विचारलें, "बाजीपंत सुखरूपपणें सुटून आले तर तुम्ही 'राम राम' म्हणाल काय?" सईबाईनें 'होय' म्हटल्यावर कारकुनाचा वेष घेऊन समर्थ विजापुरास गेले व तेथें शहापूर गांवचा सर्व हिशेब बादशहास समजून देऊन त्यांनीं बाजीपंतास सोडवून आणलें. "तुम्ही कोण? तुम्हास कोणी पाठविलें?" वगैरे प्रश्न बाजीपंतांनीं त्यांस वाटेंत विचारलें तेव्हां "तुमची पत्नी सईबाई व श्वशुर आबाजीपंत यांनीं मला पाठविलें," असें त्यांनीं सांगितलें. दोघेही शहापूरच्या वेशीजवळ येतांच, बाजीपंतांस झुकांडी देऊन समर्थांनीं एकदम डोंगराचा रस्ता धरला! घरीं येऊन बाजीपंतांनीं, घडलेला सर्व वृत्तांत आपल्या मंडळीस सांगितला. तेव्हां, 'भिक्षेस येऊन 'जयजय रघुवीर समर्थ' अशी गर्जना करणाऱ्या त्या गोसाव्याचेंच हें कृत्य असलें पाहिजे' असें सईबाई म्हणाली. तें ऐकतांच, त्या गोसाव्याचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा बाजीपंतांनीं निश्चय करून, त्याप्रमाणें तीन दिवस ते उपाशीं राहिले. चौथे दिवशीं, मध्यान्हकालीं समर्थ त्यांच्या घरीं आले आणि 'जयजय रघुवीर समर्थ' ही आपली नित्यगर्जना करून उभे राहिले. 'हाच तो गोसावी' असें सईबाईनें सांगतांच बाजीपंतांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातला आणि 'मला उपदेश देऊन

कृतार्थ करा’ अशी विनंति केली. तेव्हां, बाजीपंत, सईबाई व आबाजीपंत या तिघांनाही अनुग्रह देऊन समर्थ डोंगरावर गेले. पुढें, नित्य समर्थांचें दर्शन झाल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा निर्धार सईबाईनें केला व त्यामुळें तिला केव्हां केव्हां आठ आठ दिवस उपोषण घडूं लागलें. शेवटीं, तिची समजूत घालण्यासाठीं समर्थांनीं, तिच्यासाठीं एक चुन्याचा मारुती करून दिला व त्याचें दर्शन घेऊन भोजन करावें अशी आज्ञा केली. हा शहापूरचा मारुती समर्थांनीं स्थापन केलेल्या एकंदर अकरा मारुतींपैकीं पहिला मारुती होय. या मारुतीच्या डाव्या बाजूस ज्या गुहेंत समर्थ बसत असत ती गुहा अद्याप आहे व डोंगरावर ज्या ठिकाणीं ते रहात असत तेंही ठिकाण लोक अद्याप दाखवितात. या वेळेपर्यंत समर्थांचें वास्तव्य मुख्यतः शहापुरींच होतें. त्यानंतर ते चाफळखोऱ्यांत गेले. तिकडे असतांना, डेरवणचे डोंगरघळींत, वाघापूरचे सड्यावर, भैरवगडचे घळींत, चंद्रगिरीचे डोंगरावर किंवा कळंब्याचे घळींत त्यांचा मुक्काम असे. डोंगराच्या घळींत रहाणें समर्थांस फार आवडत असे. एकंदर परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केल्याशिवाय लोकांत फारसें मिसळूं नये हाही, एकांतीं रहाण्यांत, त्यांचा उद्देश असेल. त्या वेळीं चाफळखोऱ्यांत शिवाजीमहाराजांतर्फे नरसोमलनाथ अंबरखाने हे मामलेदार होते; त्यांनीं व चाफळचे आनंदराव देशपांडे व भानजी जोशी यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला. नंतर समर्थ पुनः कऱ्हाडास गेले व तेथील रुद्राजीपंत नामक गृहस्थांची बालविधवा बहीण अक्का हिनें समर्थांचा अनुग्रह घेतला. कऱ्हाडहून समर्थ मिरजेस गेले. तेथें गोपजीपंत देशपांडे यांची बालविधवा कन्या वेणूबाई हिनें त्यांचा उपदेश घेतला. तेथून समर्थ कोल्हापुरास गेले व तेथील महालक्ष्मीच्या देवालयांत त्यांचें कीर्तन झालें. तेथील सुभेदार पाराजीपंत बर्वे यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला.

अवतार कार्यारंभ

पाराजीपंतांची बहीण रखमाबाई व तिचीं दोन मुलें अंबाजी व दत्तात्रय, या तिघांस समर्थांनीं आपल्याबरोबर घेतलें. पुढें, कऱ्हाड प्रांतीं शिरगांव येथें मठ स्थापून तेथें रखमाबाई व दत्तात्रय यांना ठेवलें व अंबाजी यास बरोबर घेतलें. हा अंबाजीच समर्थांचा पट्टशिष्य कल्याण होय. समर्थ शिरगांवास गेले तेव्हां त्यांनीं टाकळीहून उद्धवास तेथें बोलावून आणलें व त्यासही बरोबर घेतलें. अशा रीतीनें आपला शिष्यपरिवार समर्थ वाढवीत चालले. कोदंडधारी श्रीराम आणि त्याचा सेवक ब्रह्मचारी बलशाली हनुमान यांची उपासना त्यांनीं सुरू केली. त्याचप्रमाणें श्रीरामनवमीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचें ठरवून त्यासाठीं मसूर हें स्थल त्यांनीं पसंत केलें. मसूर येथील कुळकर्ण्याच्या आईस त्यांनीं अनुग्रह दिला व तेथें मारुतीची स्थापना केली. रामनवमीचा दिवस जवळ येत चालला व उत्सवाची सर्व तयारी झाली, परंतु आयत्या वेळीं थोडेंसें विघ्न आलें. देवाची उत्सवमूर्ति रथांत ठेवून छबिना काढण्याची चाल त्या वेळीं होती. रथांतील सिंहासनास उंच निशाणाच्या काठ्या लावीत असत. त्या काठ्यांस अडचण करणाऱ्या, वाटेंतल्या आंब्याच्या झाडाच्या फांद्या तोडण्यास मसूरच्या मुसलमान अधिकाऱ्यानें हरकत घेतली. तेव्हां, समर्थ एकदम विजापुरास गेले व बादशहास भेटून फांद्या तोडण्याची लेखी परवानगी घेऊन आले. ती पहातांच त्या अधिकाऱ्यास, अर्थात्च, चुरमुरे खात स्वस्थ बसावें लागलें. अंबाजी ऊर्फ कल्याण याची गुरुनिष्ठा या प्रसंगीं चांगलीच कसोटीस लागली. समर्थांनीं त्याच्या हातीं कुऱ्हाड देऊन, पुढें बसून मागें फांदी तोडण्यास सांगितलें व ती आज्ञा निमूटपणें मान्य करून अंबाजीनें फांदी तोडली. फांदी तुटतांच अंबाजी खालच्या विहिरींत पडला. विहीर फार खोल होती. बराच वेळा झाला तरी अंबाजीची कांहीं हालचाल

दिसेना; तेव्हां तो बुडून मेला असें लोकांस वाटलें. परंतु तो मेलेला नाहीं हें समर्थांस ठाऊक होतें. विहिरीच्या तोंडाशीं जाऊन 'अंबाजी, 'कल्याण' आहेस ना?' असें त्यांनीं विचारलें, तेव्हां अंबाजीनें विहिरींतून 'कल्याण आहें' असें उत्तर दिलें. नंतर त्याला वर काढण्यांत आलें. तेव्हांपासून त्याला 'कल्याण' हें नांव पडलें. असो. नंतर, रथयात्रा पुरी होऊन रामनवमीचा उत्सव यथासांग रीतीनें पार पडला. मसूर येथें समर्थांचा मुक्काम असतांना, शहापूरच्या सईबाईच्या चुलतभावाचा मुलगा भिकाजी यास त्यांनीं अनुग्रह दिला. हेच तंजावरचे मठपति भीमस्वामी होत. यानंतर, रामनवमीचे तीन उत्सव, लागोपाठ मसूर येथेंच झाले. याच कालांत, समर्थांनीं या प्रांतांतल्या अकरा गांवीं अकरा मारुतींची क्रमाक्रमानें स्थापना केली. अकरा हा आंकडा समर्थांचा फार आवडता होता असें दिसतें. ते घरांतून पळाले ते अकराव्या वर्षी, त्यांनीं स्थापन केलेल्या मारुतींची संख्या अकरा आहे. पुढेंही त्यांच्या चरित्रांत हा आंकडा अनेक वेळां आला आहे व त्यांनीं आपल्या एका पद्यांत तर '**अक्रा अक्रा काये अक्रा कळेचि ना**' असें म्हणून या आंकड्याचें गूढ अधिकच बिकट केलें आहे.

याच सुमारास दुसरे कोणते प्रसिद्ध साधु महाराष्ट्रांत कोण-कोणत्या ठिकाणीं होते हें येथें सांगून टाकतों, कारण त्यांपैकीं कांहीं साधूंचा संबंध समर्थचरित्रांत पुढें आलेला आहे. पुण्याजवळ देहू येथें प्रसिद्ध वैष्णव संत तुकारामबुवा हे वास्तव्य करीत होते. सातारा जिल्ह्यांतील निगडी येथें रंगनाथस्वामी, वडगांव येथें जयरामस्वामी व ब्रह्मनाळ येथें आनंदमूर्ति होते. भागानगरास केशवस्वामी रहात असत. चांभारगोंदें येथें शेख महमद नांवाचे यवन सत्पुरुष होते. करवीर प्रांतीं मौनीस्वामींचें वास्तव्य असे.

यांपैकीं रंगनाथ, जयराम, केशवस्वामी व आनंदमूर्ति हे चार व पांचवे समर्थ या पंचकाला समर्थपंचायतन म्हणत असत.

मसूर येथें समर्थांनीं रामनवमीचा उत्सव तीन वर्षें केल्यावर, कोठें तरी कायमची श्रीराममूर्ति स्थापून तिचें मंदिर उभारावें असा विचार त्यांच्या मनांत आला व त्याप्रमाणें ते जागेच्या शोधास लागले. दरम्यान त्यांनीं एका कुशल मूर्तिकारास बोलावून आणून श्रीरामाच्या चार मूर्ति तयार करण्यास सांगितलें. मूर्तिकारानें एक वर्षाची मुदत मागून घेतली. पुढें कांहीं दिवसांनीं रंगनाथस्वामींनीं, आपले वडील निजानंदस्वामी यांच्या पुण्यतिथीकरितां समर्थांस कऱ्हाड येथें नेलें. पुण्यतिथि झाल्यावर निगडीवरून समर्थ आपल्या मुक्कामीं परत येत असतां वाटेंत रहिमतपुरनजीक अंगापूरच्या रानांत उतरले. तेथें ते ध्यानस्थ बसले असतां त्यांना दृष्टांत झाला कीं, "श्रीरामनवमीचे उत्सवास ज्या ध्यानाची मूर्ति तुम्हास पाहिजे त्या ध्यानाची मूर्ति समोरच्या कृष्णेच्या डोहांत आहे." समर्थांनीं डोहांत उडी मारली तेव्हां त्यांना दोन मूर्ति सांपडल्या. एक श्रीरामाची व दुसरी महिषासुरमर्दिनीची. दोन्ही मूर्ति झोळींत घालून समर्थ चाफळकडे जाण्यास निघाले. हा प्रकार कांहीं गुराख्यांनीं पाहिला होता, त्यांनीं धावत जाऊन समर्थांनीं मूर्ति नेल्याची बातमी अंगापुरच्या लोकांस कळविली. तेव्हां ते येऊन समर्थांपाशीं मूर्ति मागूं लागले. 'ठीक आहे. तुमच्या मूर्ति तुम्ही घेऊन जा' असें म्हणून समर्थांनीं मूर्ति खालीं काढून ठेविल्या आणि ते स्वस्थळीं निघून गेले. अंगापुरच्या लोकांनीं मूर्ति गाड्यांत घालून नेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या इतक्या जड झाल्या कीं, पांचपन्नास असामींसही त्या उचलून गाडींत ठेवतां येईनात! तेव्हां हें कांहीं तरी विलक्षण आहे असें जाणून ते चाफळास समर्थांकडे गेले व 'मूर्ति आपणच आणाव्यात, आम्हास नकोत,' असें त्यांनीं

त्यांस सांगितलें. 'बरें आहे' असें म्हणून समर्थांनीं आपले शिष्य पाठवून मूर्ति चाफळास नेल्या. 'श्रींच्या सेवेंत आम्हांस कांहीं हक्क असावा,' अशी विनंति अंगापुरकरांनीं समर्थांस केली, ती मान्य करून, 'प्रतिवर्षीं रामनवमीच्या उत्सवांत बिनीस सिंहासनाची काठी तुमची ठेवण्यांत येईल,' असें समर्थांनीं त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें तो मान अंगापुरकरांकडे अद्याप चालू आहे. मूर्ति मिळाल्यावर, चाफळ येथें एक जागा पसंत करून तेथें श्रीराममंदिर बांधण्याचें ठरविलें व छत्रपति शिवाजीमहाराज यांजकडून, चाफळचे मामलेदार नरसोमलनाथ यांचे मार्फत मिळालेले तीनशें होन व शिष्यमंडळीकडून जमलेली रक्कम, खर्च करून मंदिर उभारण्यांत आलें. श्रीराममूर्तींची प्रतिष्ठापना मोठ्या थाटानें झाली. या मंदिरांत श्रीरामनवमीचा पहिला उत्सव शक १५७० सर्वधारीनाम संवत्सरीं मोठ्या समारंभानें केला.

समर्थ तीर्थयात्रेहून कृष्णातटाकीं पहिल्यानें आले तेव्हां आरंभींचीं कांहीं वर्षें त्यांनीं अज्ञातवासांतच घालविलीं. भिक्षेपुरतें गांवांत जावयाचें व इतर वेळीं डोंगरावर कोठें तरी एकांतस्थलीं वास्तव्य करावयाचें असा क्रम त्यांनीं चालविला, परंतु त्यांचें तपोबल येवढें प्रभावशाली होतें कीं, तें फार दिवस लपून रहाणें शक्य नव्हतें. आसपासच्या गांवांत जे सूक्ष्मदृष्टि लोक होते, त्यांनीं समर्थांचें चारित्र्य अवलोकन करून त्यांची अधिकारसंपन्नता लवकरच ओळखली व अशा थोर सत्पुरुषाचा अनुग्रह आपणास मिळेल तर आपण धन्य होऊं या भावनेनें ते समर्थांपाशीं अनुग्रहार्थ येऊं लागले आणि लोकसंग्रह हें तर समर्थांचें ध्येयच असल्यामुळें त्यांनींही अशा मुमुक्षुजनांस अनुग्रह देऊन आपला शिष्यसमुदाय वाढविण्यास सुरुवात केली. हळूहळू समर्थांची कीर्ति वाढत चालली, निगडीकर रंगनाथस्वामींनीं आपल्या गुरूंच्या पुण्यतिथीस

समर्थांस मुद्दाम बोलावून नेलें होतें ही हकीकत मागील प्रकरणीं आलीच आहे.

चाफळ येथें राममंदिराच्या दक्षिणेस समर्थांनीं मठ बांधला त्यांत त्यांची शिष्यमंडळी रहात असे. जवळच पर्णकुटिका होती तींत समर्थ रहात असत. नंतर या पर्णकुटिकेच्या जागीं मठ बांधण्यांत आला. राममंदिराच्या घुमटाखालीं विवर आहे व मंदिराखालीं तळघर आहे त्यांत समर्थ ध्यानस्थ बसत असत. मंदिराची व्यवस्था व उत्सवपरंपरा कायम चालावी म्हणून समर्थांनीं पंच नेमले व त्यांजकडे ती कामगिरी सोंपविली. याच सुमारास विजापूरच्या कांहीं हिंदु अधिकाऱ्यांनीं व सरदारांनीं चाफळच्या राममंदिरास जमिनी इनाम दिल्याचा उल्लेख जुन्या कागदपत्रांत आढळतो.

समर्थांच्या कालीं पंढरपुरचा वारकरी संप्रदाय चालूच होता व तुकारामबुवांच्या कारकीर्दींत तर त्या संप्रदायाचा परमोत्कर्ष झाला. पंढरीचा पांडुरंग हेंच महाराष्ट्राचें मुख्य दैवत त्या वेळीं होतें व अद्यापही आहे. असें असतां श्रीराम आणि हनुमान् या देवतांची उपासना समर्थांनीं कोणत्या हेतूनें सुरू केली याचा थोडासा विचार येथें केला पाहिजे. पांडुरंग आणि रामचंद्र यांच्यांत समर्थ कांहीं भेद मानीत होते अशांतला भाग नाहीं. परंतु, त्यांना असें वाटलें असावें कीं, कटावर कर ठेवून केवळ साक्षीभूत होऊन उभा राहिलेल्या पांडुरंगापेक्षां त्याचाच पूर्वावतार जो कोदंडधारी पराक्रमी राम त्याच्याच उपासनेची या पारतंत्र्यकालांत विशेष आवश्यकता आहे. समर्थांनीं आपल्या बारा वर्षांच्या तीर्थयात्रेंत, तत्कालीन देशस्थिति व लोकस्थिति यांचें सूक्ष्म अवलोकन करून, परधर्मीयांच्या आक्रमणामुळें किंकर्तव्यमूढ होऊन बसलेल्या बहुजनसमाजांत जागृति आणि उत्साह उत्पन्न करण्यासाठीं

कोणत्या उपायांची योजना केली पाहिजे याची रूपरेषा पूर्वींच आंखून ठेवली होती. नुसत्या परमार्थसंपादनाकडेच लोकांची प्रवृत्ति त्यांना वळवावयाची असती तर पांडुरंगाच्या उपासनेनें तें काम सहज होण्यासारखें होतें; परंतु नुसता भक्तिमार्गाचा प्रसार करणें येवढेंच त्यांचें ध्येय नव्हतें, तर भक्तिमार्गाबरोबरच शक्तिसंपन्नता, संघशक्ति, उत्साह, जयिष्णुता, इत्यादिकांचीही निर्मिती व वृद्धि त्यांना करावयाची होती आणि त्याच दृष्टीनें, तामसी व आततायी रावणाचा वध करून देवांस बंदिवासांतून सोडविणाऱ्या महाप्रतापी रामचंद्राची व बलशाली हनुमंताची उपासना त्यांनीं सुरू केली. महाराष्ट्रांतील तत्पूर्वकालीन, तत्कालीन व तदुत्तरकालीन इतर संत व समर्थ यांच्यांत जें थोडेंसें अंतर आहे तें हेंच होय. इतर संतांस स्वदेशस्थितीचा पूर्ण विसर पडला होता किंवा पारतंत्र्य आणि धर्मच्छल यांविषयीं त्यांच्या मनांत कांहीं विचारच येत नसे अशांतला भाग नाहीं, परंतु या दोन गोष्टींबद्दल समर्थांस जितकी चीड आल्याचें त्यांच्या कवितेवरून दिसतें तितकी चीड इतरांस आल्याचें त्यांच्या कवितेवरून दिसत नाहीं. आणि याचें मुख्य कारण हेंच दिसतें कीं, तीर्थयात्रेच्या निमित्तानें हिंदुस्थानभर प्रवास करीत असतां, हिंदुधर्मीय लोकांच्या अनन्वित छलाचे व मूर्ति-विध्वंसनादिकांचे जे अनेक देखावे समर्थांच्या अवलोकनांत आले ते इतर संतांच्या अवलोकनांत आले नसावेत. असो.

वर सांगितल्याप्रमाणें, अशा वेळीं कोणत्या देवतेची उपासना सुरू करणें जरूर आहे याचा विचार करतांना बहुतेक प्रमुख हिंदु देवांचीं चरित्रें समर्थांनीं वाचून पाहिलीं व शेवटीं श्रीरामचंद्र हें दैवत त्यांनीं उपासनेसाठीं पसंत केलें. ते म्हणतात—

**“ कथा नृसिंहा–वामना–भार्गवाची**
**कथा कौरवां–पांडवां–माधवाची ।**

कथा देव इंद्रादि ब्रह्मादिकांची
समस्तांमध्यें श्रेष्ठ या राघवाची ॥"

श्रीराम हें दैवत एकदा पसंत करून त्याची उपासना सुरू केल्यावर त्या दैवताच्या ठायीं असेरपर्यंत समर्थांनीं कशी जाज्वल्य निष्ठा ठेवली आणि त्या दैवताच्या पराक्रमावर त्यांचा कसा अढळ विश्वास होता हें त्यांच्या, तद्विषयक शेंकडों उद्गारांवरून दाखवितां येईल. कांहीं उद्गार येथें देतों—

भवाच्या भयें काय भीतोसि लंडी
धरीं रे मना धैर्य धाकासि सांडीं।
रघूनायकासारखा स्वामि शीरीं
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥

दिनानाथ हा राम कोदंडधारी
पुढें देखतां काळ पोटीं थरारी।
जना वाक्य नेमस्त हें सत्य मानीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

समर्थांचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

महासंकटीं सोडिले देव जेणें
प्रतापें बळें आगळा सर्व गूणें।
जयातें स्मरे शैलजा शूलपाणी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि नासूनि जातें।
कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते ॥

आणि हे सर्व समर्थांचे प्रचीतीचे बोल आहेत. रामोपासनेच्या योगानें जें सामर्थ्य आपल्या अंगीं आलें तें इतरांच्याही अंगीं यावें एतदर्थ श्रीरामभजनाचा उपदेश आपल्या कवितेंत त्यांनीं मोठ्या कळकळीनें केला आहे.

श्रीरामनवमीच्या उत्सवाचे वेळीं फार मोठा जनसमुदाय चाफळ येथें जमत असे, त्यामुळें महाराष्ट्र धर्माचा प्रसार करण्यास समर्थांस ती एक चांगलीच संधि मिळत असे. शिवाय ठिकठिकाणीं कीर्तनें करून तद्द्वाराही लोकसंग्रह करण्याचा त्यांचा उद्योग सुरूच होता.

समर्थांनीं येवढा व्याप केला तरी इतर वेळीं त्यांची वृत्ति एखाद्या बालकासारखी असे. लहान मुलें जमवून त्यांजबरोबर नाना प्रकारचे खेळ खेळण्याचा त्यांस भारी नाद होता. एकदां ते असेच कृष्णेच्या वाळवंटांत मुलांबरोबर विटीदांडू खेळत असतां विटी जोरानें उडून त्यांच्या डोक्यास लागली व त्या वेदनेनें ते फार व्याकुळ होऊन निश्चेष्ट पडल्यासारखे दिसले. मुलांनीं पाणी आणून त्यांच्या तोंडांत घातलें, त्यांना वारा घातला व त्यांना शुद्धीवर आणण्याचे इतर उपाय यथामति केले, पण समर्थ डोळे उघडीनात. तेव्हां मात्र मुलें घाबरलीं. त्यांना वाटलें, समर्थ मेले. आतां आपली धडगत नाहीं असें जाणून त्या अजाण मुलांनीं तेथेंच वाळूंत घाईघाईनें एक खड्डा खणला आणि त्यांत समर्थांस ठेवून वर वाळू लोटली ! इतकें करून मुलें घरोघर गेलीं. पुढें समर्थांचा पत्ता नाहीं म्हणून शिष्यमंडळीनें त्यांचा शोध चालविला, पण सात दिवस झाले तरी पत्ता लागेना. शेवटीं ज्या पोरांबरोबर समर्थ खेळत होते त्यांना विचारलें; पण त्यांनीं कानावर हात ठेवले. अखेर धाकदपटशा दाखविल्यावर, घडलेला प्रकार पोरांनीं सांगितला. मग त्यांना घेऊन लोक कृष्णातीरीं आले व ज्या जागीं समर्थांस पुरलें होतें ती जागा उकरण्यास त्यांनीं सुरुवात

केली. वरची वाळू निघतांच समर्थ एकदम मोठ्यानें गर्जना करीत खड्ड्यांतून बाहेर पडले आणि एखाद्या पिसाटाप्रमाणें सारखे पळत सुटले ! तें पाहून लोकही गर्भगळित होऊन रानोमाळ पळाले ! सात दिवसांपूर्वी पुरलेला हा गोसावडा अद्याप कसा जिवंत राहिला याचेंच त्यांस कोडें पडलें. अशा प्रकारच्या विचित्र लीला करून, आपण अगदीं वेडेपिसे आहोंत असें लोकांस भासविण्याची समर्थांस संवयच होती असें म्हटलें तरी चालेल.

**वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।**
**सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ॥**
**ठायीं ठायीं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा ।**
**प्राणीमात्र बोलवावा । आप्तपणें ॥**
**परलोकीं वास करावा । समुदाय उगाचि पहावा ।**
**मागण्याचा तगादा न लावावा । कांहीं एक ॥**

अशी आपल्या शिष्यवर्गास समर्थांची शिकवण होती.

जयरामस्वामी वडगांवकर या नांवाचे प्रसिद्ध कृष्णोपासक साधु वडगांव येथें रहात असत, त्यांनीं जेव्हां समर्थांची कीर्ति ऐकली तेव्हां त्यांचें दर्शन घ्यावें या हेतूनें ते त्यांच्या शोधास निघाले. समर्थ एकाच जागीं बहुधा फार दिवस रहात नसत त्यामुळें अमूकच वेळीं त्यांची भेट होईल अशी खात्री नसे. म्हणून जयरामस्वामी कृष्णातटाकानें त्यांचा शोध करीत चालले असतां, रानांत एके ठिकाणीं त्यांची अकस्मात् गांठ पडली. समर्थदर्शन होतांच जयरामस्वामींनीं धावत जाऊन त्यांना प्रेमानें आलिंगन दिलें. मग ते दोघे त्याच ठिकाणीं कांहीं दिवस राहिले. गांवांत जाऊन भिक्षा मागावी, पुनः रानांत येऊन पानगे भाजून खावे व इतर वेळीं परमार्थविवेक करावा अशा रीतीनें ते कालक्रमणा करीत असतां, एके दिवशीं, त्या अरण्यांतच सहस्रभोजन घालण्याचा आपला विचार समर्थांनीं

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३... दि: ...



जयरामस्वामींस कळविला. जयरामस्वामी म्हणाले, "ठीक आहे, तुम्ही ब्राह्मण घेऊन या." मग समर्थ ब्राह्मणांस आमंत्रण देण्यासाठीं गांवांत येऊन ग्रामस्थ ब्राह्मणांस म्हणाले, "महाराज, सहस्रभोजनास चलावें." ब्राह्मणांनीं विचारलें, "सहस्रभोजन कोठें आहे आणि तें कोण घालतो आहे?" समर्थ म्हणाले, "या पलीकडल्या अरण्यांत जयरामस्वामींनीं सहस्रभोजनाची सर्व तयारी केली असून तुम्हांस बोलावून आणण्यासाठीं त्यांनीं मला पाठविलें आहे." हें ऐकून ब्राह्मण हसूं लागले. एक भटजी म्हणाले, 'अरे, या पिसाटाचें काय ऐकतां? वाघांनीं आणि अस्वलांनीं गजबजलेल्या त्या अटव्य अरण्यांत जाणार कोण लेक! आपले जीव काय वर आले आहेत? रानांत इतकी अन्नसामग्री यांनीं आणली कोठून? उलट, आम्हाला तिकडे नेऊन वाघांना आणि आस्वलांना सहस्रभोजन घालण्याचा याचा विचार असल्यास न कळे!' हें ऐकून सर्व ब्राह्मणांनीं रानांत जाण्याचें नाकारलें. तेव्हां समर्थांनीं त्यांस हात जोडून सांगितलें कीं, "श्रीरामानें सर्व श्वापदें आवरलीं आहेत; भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. मजवर विश्वास ठेवा आणि निश्चिंतपणें मजबरोबर अरण्यांत चला. भोजनाची सर्व सिद्धता आहे." भोजन म्हटलें कीं ब्राह्मणाच्या तोंडास पाणी सुटल्याशिवाय रहाणें शक्य नाहीं. शिवाय दक्षिणेचाही मोह अनावरच असतो. म्हणून ब्राह्मणांनीं शेवटीं असें ठरविलें कीं, समर्थांबरोबर हळूहळू सावधगिरीनें अरण्यांत जावें आणि दुरूनच भोजनाची कांहीं तयारी दिसते कीं काय हें पहावें. तशी तयारी दिसली तर ठीकच, न दिसली तर मागें पलायन करण्यास आपले पाय आपल्याबरोबर आहेतच.

इकडे अरण्यांत जयरामस्वामींनीं सिद्धीच्या जोरावर भोजनाची सर्व सिद्धता खरोखरच केली होती. समर्थांबरोबरचे ब्राह्मण त्या ठिकाणीं जाऊन पहातात तों पक्वान्नांच्या राशी पडलेल्या, आणि

त्यांच्या सुवासानें सगळें वातावरण दरवळून गेलेलें. भगवत्कृपासंपन्न सत्पुरुषांना काय उणें आहे ? समर्थ म्हणतात—

**“ भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपणचि करावें ।**
**तेथें वेगळें भावावें । नलगेचि कदा ॥ ”**

असो. पुढें ब्राह्मणभोजन झाल्यावर, ब्राह्मणांस विडेदक्षिणा देऊन त्यांची रवानगी करण्यांत आली. गांवांत जातांना वाटेंत ब्राह्मणांनीं या गोष्टीची चर्चा करून शेवटीं असा निष्कर्ष काढला कीं, बाह्यतः पिसाटासारखे दिसणारें आणि वागणारे हें पुरुष वस्तुतः मोठे साधु आहेत. त्या वेळेपर्यंत समर्थांविषयीं या ब्राह्मणांचें मत फारसें अनुकूल नव्हतें, हा कोणी तरी एक विचित्र पुरुष आहे अशी त्यांची समजूत होती. आणि त्यांची अशी समजूत होण्यास समर्थांचें वर्तनच कारणीभूत होतें. एका ठिकाणीं वास्तव्य नाहीं, आज या रानांत तर उद्यां त्या डोंगरावर, गांवांत आगमन झालेंच तर तें वारा यावा आणि जावा त्याप्रमाणें, कोणी भिक्षा घातली तरी वाहवा, न घातली तरी वाहवा, अशा वर्तनाच्या मनुष्यास सामान्य लोकांनीं वेडगळ म्हणूं नये तर काय म्हणावें ? आणि गंमत ही कीं, आपल्या या वेडगळपणाच्या वर्तनाबद्दल समर्थांस मोठा आनंद वाटत असे. ते आपणास ब्रह्मपिसा म्हणवीत. पुढील पद्य वाचा—

**पहा पहा ब्रह्मपिसा येतो जवळी ।**
**रामनामें हांक देउनि डोई खांजोळी ॥ ध्रु० ॥**
**वृत्तिशेंडी बंधनेंविण सदा मोकळी ।**
**संसाराची धुळी करुनी अंगीं उधळी ॥ १ ॥**
**प्रपंच उकिरड्यावर बैसणें ज्याचें ।**
**भोंवता पाळा फिरून पाहे जन अविद्येचें ॥ २ ॥**

देखुनि धावे उठोनि पळे दृश्य वाटेचें ।
अदृश्याचें रान घेतां न चले कवणाचें ॥ ३ ॥

औट हात गज नवां ठायीं वितुळले ।
दहावा ठाव म्हणोनि तेथें ठिगळ दिधलें ॥ ४ ॥

ऐसें मन हें चंचल निवृत्तींत गुंतलें ।
परतोनियां आलें म्हणवुनि जिवेंचि मारिलें ॥ ५ ॥

मीपणाचें शहाणपण जळालें माझें ।
कोण वाहे देहबुद्धिशास्त्राचें ओझें ॥ ६ ॥

न लगे आम्हा मानापमानाचें ओझें ।
तुझी शुद्धि घेतां गेलें मीपण माझें ॥ ७ ॥

आम्हीं धन जन देखुनि वार करितों ।
आपणाऐसे पिसें देखुनि उमज धरितों ॥ ८ ॥

आतें भेटी येती त्यांस वेड लावितों ।
रामीरामदास ऐसें अबद्ध बोलतो ॥ ९ ॥

शिष्यांच्या निष्ठेची कसोटी पहाण्यासाठीं समर्थ एकदां हातीं तलवार घेऊन त्यांच्या अंगावर धावून गेले त्या वेळीं त्यांनीं हें पद म्हटलें होतें !

एक शेतकरी मोठा आळशी होता. समर्थांच्या शिष्यांस विशेष कांहीं उद्योग न करावा लागतां, पोटभर जेवावयास मिळतें असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां तो समर्थांपाशीं जाऊन त्यांस म्हणाला, “ महाराज, मला उपदेश द्या. ” समर्थांनीं विचारलें, “ तूं मला गुरुदक्षिणा काय देशील ? ” शेतकरी म्हणाला, “ चवली देईन. ” मग त्याजकडून गुरुदक्षिणेदाखल चवली घेऊन ‘ श्रीराम जयराम जयजयराम ’ हा त्रयोदशाक्षरी मंत्र समर्थांनीं त्यास सांगितला. कोणी कांहीं काम सांगितलें तर करावें आणि दोन वेळ पानगे

खाऊन रहावें, असा त्या शेतकऱ्याचा क्रम चालू असतां एके दिवशीं रंगनाथस्वामी आपल्या शिष्यपरिवारासह समर्थांच्या भेटीस आले. रंगनाथस्वामींची रहाणी मोठ्या श्रीमंती थाटाची असे. कपडेलत्ते भारी किंमतीचे आणि पक्वान्नाशिवाय भोजन नाहीं. हें जेव्हां त्या शेतकऱ्यानें पाहिलें तेव्हां त्याला वाटलें कीं, नुसते पानगे घालणाऱ्या गोसावड्यापेक्षां हा श्रीमंत गुरु जर आपण केला तर रोज आपणास पक्वान्नें खावयास मिळतील. शिवाय बसावयास घोडा आणि सरदारी थाटाचा पोषाकही मिळेल. मग रंगनाथस्वामीं-पाशीं जाऊन त्यांचा अनुग्रह घेण्याची आपली इच्छा त्यानें बोलून दाखविली. स्वामींनीं विचारलें, "काय रे? तूं पूर्वीं कोणाचा उपदेश घेतला आहेस का?" शेतकरी म्हणाला, "होय. घळींत रहाणाऱ्या त्या गोसावड्याचा उपदेश मी घेतला आहे." रंगनाथांनीं विचारलें, "मग आतां तूं दुसरा गुरु कां करतोस?" शेतकरी म्हणाला, "काय सांगूं महाराज? सकाळसंध्याकाळ पानगे खाऊन फार कंटाळलों." आपलें शिष्यत्व स्वीकारण्यांत त्याचा उद्देश काय आहे हें ताडून रंगनाथस्वामी त्यास म्हणाले, "ठीक आहे, मी तुला उपदेश देतों. पण तूं अगोदर त्या गोसावड्याचा उपदेश त्याला परत देऊन ये." शेतकरी त्याप्रमाणें समर्थांपाशीं जाऊन त्यांस म्हणाला, "अहो बुवा, मी तुमचा उपदेश परत देण्यासाठीं आलों आहें. तो घ्या आणि माझी चवली फेंकून द्या." समर्थ म्हणाले, 'ठीक आहे; तूं तोंडांत पाण्याचा गुळणा घे आणि मनांतल्या मनांत, मी दिलेल्या मंत्राचा जप करून, तो गुळणा या शिळेवर टाक, म्हणजे माझा मंत्र मला पोंचला." शेतकऱ्यानें त्याप्रमाणें पाण्याचा गुळणा घेऊन तो शिळेवर टाकतांच तेथें श्रीराम जयराम जयजयराम हीं तेरा अक्षरें स्पष्ट उमटलीं. पण

त्याबरोबर शेतकऱ्याची वाचाही गेली! त्याला बोलतां येईना. मग तो रंगनाथस्वामींकडे गेला आणि झालेला प्रकार त्यानें त्यांस खुणेनें कळविला. एकंदर हकीकत स्वामींच्या लक्षांत येतांच त्यांना शेतकऱ्याची दया आली. मग त्याला बरोबर घेऊन ते समर्थांकडे गेले, व त्यांना विनंति करून त्यांजकडून शेतकऱ्याची वाचा त्याला परत देवविली. नंतर ते त्याला म्हणाले, 'सत्पुरुषाचा अनुग्रह घेण्याची तुझी पात्रता नाहीं. तूं आतां आपल्या घरीं जा आणि उद्योगधंदा करून पोट भर.'

समर्थ एकदां एका उसांच्या मळ्याजवळून चालले असतां त्यांना ऊस खाण्याची इच्छा झाल्यामुळें मळ्यांतला एक ऊस मोडून ते घेऊन चालले. मळ्याचा मालक जवळच राखण करीत बसला होता त्यानें तो प्रकार पाहिला आणि धांवत येऊन समर्थांच्या हातांतला ऊस काढून घेऊन, त्याच उसाचे दोन रट्टे समर्थांच्या पाठींत त्यानें लगावले. आपलीच चूक झाली हें जाणून समर्थांनीं तो मार निमूटपणें सोसला. पुढें ही हकीकत अधिकाऱ्यास कळल्यावर त्यानें त्या शेतकऱ्यास बोलावून आणलें आणि त्याला शिक्षा करण्याचें ठरविलें. समर्थांच्या कानावर ही गोष्ट जातांच, यांत शेतकऱ्याचा कांहीं अपराध नसून, आपणच खरे अपराधी आहोंत असें त्या अधिकाऱ्यास सांगून शेतकऱ्यास त्यानीं सोडविलें, इतकेंच नव्हे तर पुढें शिवाजी महाराजांस सांगून तें शेत त्या शेतकऱ्यास त्यांनीं इनाम करून देवविलें!

समर्थांचा एक शिष्य अगदींच धटिंगण होता. समर्थ सांगतील तें प्रमाण मानून चालावयाचें असा त्याचा निर्धार असून, त्यांच्या सामर्थ्यावर त्याचा पूर्ण विश्वास असल्यामुळें तो कोणाची पर्वा करीत नसे. रोज मध्यान्हकालीं झोळी खाकेस मारून गांवांत भिक्षा मागणें हें त्याचें काम. एके दिवशीं, तो एका तपस्वी

ब्राह्मणाचे घरीं भिक्षेस गेला आणि '**समर्थांचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे**' हा श्लोक खड्या सुरांत म्हणून 'जय जय रघुवीर समर्थ' अशी त्यानें गर्जना केली. तपस्वी ब्राह्मण ध्यानस्थ बसला होता, त्याच्या ध्यानाचा, या गर्जनेनें भंग झाल्यामुळें तो संतापला आणि त्यानें 'उद्यां या वेळेपर्यंत तूं मरशील' असा त्याला शाप दिला. तेव्हां, 'मी समर्थांचा सेवक आहें, तुमचा शाप कसा खरा होतो पाहूं,' असें त्याला आव्हान करून तो समर्थशिष्य मठांत आला आणि झालेला वृत्तांत समर्थांस त्यानें निवेदन केला. त्या तपस्वी ब्राह्मणाचें तपोबल किती उग्र आहे आणि त्याचा शब्द कसा खोटा होणार नाहीं हें समर्थांस ठाऊक असल्यामुळें, ते त्या शिष्यास म्हणाले, "अरे, माझें सर्वांग कसें अगदीं ठणकत आहे, म्हणून तें रगडीत तूं येथें माझ्या बिछान्यावर बैस, आणि मी सांगितल्याशिवाय येथून हलूं नकोस." "आज्ञा प्रमाण" असें म्हणून शिष्य समर्थांच्या शय्येवर त्यांचें अंग रगडीत बसला. ती रात्र जाऊन दुसरा दिवस उजाडला व हळूहळू, तपस्वी ब्राह्मणानें सांगितलेली त्याच्या मृत्यूची वेळ टळून गेली. तेव्हां समर्थांनीं त्यास विचारलें, "काय रे, तूं येथें कांहीं विचित्र गोष्ट पाहिलीस का?" शिष्य म्हणाला, "होय महाराज, थोड्या वेळापूर्वीं, ज्यांच्या हातांत पाश आहेत असे कोणी तरी दोघे भयंकर पुरुष या ठिकाणीं आले आणि ते मला 'बिछान्यावरून उठून ये' असें खुणावूं लागले. परंतु, येथेंच बसून रहाण्याची आपली आज्ञा असल्यामुळें मी उठलों नाहीं. शेवटीं, कांहीं वेळ बिछान्याभोंवतीं फिरून ते दोघेही अदृश्य झाले." मग समर्थ त्याला म्हणाले, "तुझें मरण टळलें. आतां ऊठ. त्या तपस्वी ब्राह्मणाच्या शापाप्रमाणें तुला नेण्यासाठीं ते यमदूत आले होते. परंतु '**समर्थांचिया**

सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे' हें माझें वचन खरें करण्यासाठीं भगवंतानें तुझें रक्षण केलें आणि त्या तपस्व्याचा शाप खोटा ठरविला." लगेच त्या शिष्यानें झोळी खाकेस मारली आणि तडक त्या तपस्वी ब्राह्मणाच्या घरीं जाऊन तोच श्लोक त्यानें खड्या आवाजांत म्हटला आणि 'जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना अधिकच जोरानें केली! तें पाहून, त्या ब्राह्मणानें आपल्या कपाळास हात लाविला आणि तो स्वस्थ बसला!

समर्थ एकदां पंढरपुरास गेले असतां, पांडुरंगानें त्यांना रामरूपानें दर्शन दिलें. त्या वेळीं समर्थांनीं म्हटलेला पुढील अभंग प्रसिद्ध आहे—

**येथें उभा कां श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा॥**
**काय केली शरयूगंगा। येथें वाहे चंद्रभागा॥**
**काय केली अयोध्यापुरी। येथें वसविली पंढरी॥**
**धनुष्यबाण काय केले। कर कटावरी ठेले॥**
**काय केली सीताबाई। येथें राई रखुमाई॥**
**काय केला वानरमेळा। येथें हनुमंत एकला॥**
**रामीं रामदासीं भाव। तैसा जाला पंढरिराव॥**

पंढरपुरच्या विठ्ठलाचा स्तुतिपर उल्लेख ज्यांत आढळतो अशीं समर्थांचीं कांहीं पद्यें उद्धवसुतकृत रामदासचरित्रांत दिलेलीं आहेत; त्यांवरून श्रीराम आणि विठ्ठल यांच्यांत समर्थ कांहीं भेदभाव मानीत नसत हें सिद्ध होतें.

एकदां समर्थ आपल्या शिष्यमंडळीसह चाफळाहून परळीस जावयास निघाले असतां वाटेंत पाडळी येथें त्यांचा मुक्काम पडला. सर्व मंडळी नदीवर उतरली. कांहीं शिष्य गांवांत भिक्षा मागण्यास गेले. गांवांतील चावडीवर ग्रामाधिकारी व कांहीं गांवकरी बसले

होते. समर्थशिष्यांची ती फौज पहातांच ग्रामाधिकारी त्यांना म्हणाला, "तुमच्यासारख्या धटिंगणांना भीक मागायला काय धाड भरली आहे? उद्योग नाहीं, धंदा नाहीं, लंगोट्या लावून फिरताहेत आपले निलाजऱ्यासारखे!" इतकें बोलून त्यानें आपल्या शिपायाकडून त्यांच्या झोळ्या व कुबड्या हिसकावून घेतल्या. तेव्हां, तेथें बसलेल्या गांवकऱ्यांनीं त्याला सांगितलें कीं, "असें करणें बरोबर नाहीं. महासाधु रामदास यांचे हे शिष्य आहेत, त्यांचा असा उपमर्द करणें योग्य नव्हे." परंतु ग्रामाधिकाऱ्यानें लोकांच्या या बोलण्याकडे लक्ष न देतां समर्थशिष्यांस गांवांतून हांकून लाविलें! झालेला प्रकार शिष्यांनीं समर्थांस सांगितला तेव्हां ते म्हणाले, "येवढ्यावरच निभावलें हें नशीब! आतां या गांवांत एक क्षणभरही राहूं नका." हें ऐकतांच, आपापल्या पडश्या खांद्यावर टाकून समर्थांसह सर्व मंडळी गांवाबाहेर पडली. ते गांवाबाहेर येतात न येतात तोंच पाडळी गांवास आग लागून एकच आकांत उडाला! समर्थशिष्यांचा ग्रामाधिकाऱ्यानें अपमान केला त्याचा हा परिणाम, असें म्हणून गांवांतले लोक समर्थांकडे धावले. गांवाबाहेरच्या आंबराईंत समर्थ जाऊन उतरले आहेत असें त्यांस कोणी सांगितल्यावरून ते तिकडे गेले, पण समर्थ तेथें नव्हते. ते तेथून बरेच दूर गेले होते. आतां काय करावें या विचारांत गांवकरी लोक मागें वळून गांवाकडे पहातात तों कोणी एक वानर हातांत चूड घेऊन एकामागून एक घर पेटवीत चालला आहे! हें पहातांच लोक अतिशय घाबरले. धावत जाऊन समर्थांस त्यांनीं खिंडींत गांठलें व त्यांच्या पायांवर लोळण घेऊन अपराधाची क्षमा करण्याविषयीं त्यांस विनंति केली. समर्थ त्यांना म्हणाले, "काळजी करूं नका. मागें वळून गांवाकडे पहा." हें ऐकून

खिंडीच्या उंचवट्यावर उभे राहून लोक पाडळी गांवाकडे पाहूं लागले. तेव्हां त्यांना काय देखावा दिसला? जो वानर हातांत चूड घेऊन गांवांतल्या सगळया घरांस आग लावीत सुटला होता तोच आतां आपल्या खांद्यावर पाण्याच्या घागरी घेऊन जळत असलेलीं घरें विझवीत आहे! मग पाडळीकरांच्या आग्रहावरून समर्थ पुन: पाडळीस गेले व शिष्यांसहवर्तमान त्यांनीं तेथें भोजन केलें. गांवकऱ्यांनीं घरोघर जाऊन पाहिलें तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं, सगळया घरांस आग लावण्यांत आली असतांही, एकही घर जळलेलें नाहीं!

शालिवाहन शक १५७२ मध्यें समर्थ परळी येथें रहाण्यास गेले. तेथें तत्कालीन इतर संत समर्थांच्या भेटीस वरचेवर येत असत व त्यांचीं तेथें कीर्तनेंही होत असत.

समर्थ चाफळ येथें असतांना, त्यांना एकदां हिमज्वराची बाधा झाली. त्याच वेळीं शिवाजीमहाराज त्यांच्या दर्शनास आले. तेव्हां त्यांच्याशीं मनमोकळेपणानें बोलण्यास आपला हिंवताप आड येऊं नये म्हणून समर्थांनीं आपली छाटी काढून उशास ठेवली व हिंवताप त्या छाटींत घातला! त्यामुळें हुडहुडी भरल्या-प्रमाणें ती छाटी सारखी कांपूं लागली. महाराजांनीं हें पाहिलें आणि छाटी कां हलते, म्हणून कल्याणस्वामींस विचारिलें. तेव्हां त्यांनीं, समर्थांस चार पांच दिवस हिंवताप येत असून, आपल्याशीं बोलण्यास हरकत येऊं नये म्हणून तूर्त त्यांनीं तो हिंवताप या छाटींत कोंडला आहे व त्यामुळें छाटी कांपत आहे असें सांगितलें. तें ऐकून महाराजांनीं समर्थांस विचारलें, "आपलें येवढें सामर्थ्य असतां हे शरीरक्लेश कां भोगावे लागतात?" समर्थ म्हणाले, "शिवबा, कर्मभोग हा मनुष्यास भोगलाच पाहिजे. प्रारब्ध हें भोगूनच संपवावयाचें असतें."

हिमज्वराचा बंदिवास!

समर्थांनीं एक बोका पाळला होता, त्याचें नांव राम. या रामाला अगोद्र पोटभर खाऊं घालून 'रामा! तूं तृप्त झालास ना?' असें विचारावयाचें व नंतर स्वतः जेवावयाचें असा समर्थांचा क्रम असे. 'राम' समर्थांचा लाडका असल्यामुळें त्याला कोठेंही मज्जाव नसे. वाटेल तेव्हां सैंपाकघरांत जाऊन दूधदुभत्याचा तो फन्ना उडवीत असे. त्यामुळें त्रासून जाऊन एके दिवशीं त्याच्या डोळ्यांत कोणी तिखट घातलें! अर्थात् 'राम' त्या दिवशीं जेवावयास गेला नाहीं. 'राम कोठें आहे?' म्हणून समर्थांनीं चौकशी केली, परंतु कोणीच उत्तर देईना. शेवटीं, रामाशिवाय आपलें जेवण होणार नाहीं असें जेव्हां त्यानीं निक्षून सांगितलें, तेव्हां 'राम दहींदूध चोरून खातो म्हणून त्याच्या डोळ्यांत आपण तिखट घातलें,' अशी कबुली एका शिष्यानें दिली. तेव्हां समर्थ शिष्यांस म्हणाले, "तुम्ही तेवढे देवाचे, आणि 'राम' कोणी चोर आहे कीं काय? सारे जीव रघुपतीचेच आहेत. अतःपर त्याच्या वाटेस कोणी जाऊं नका." इतक्यांत, राम लपून बसला होता तेथून त्याला आणून एकानें समर्थांपुढें ठेविलें. तेव्हां त्याला उचलून समर्थांनीं त्याचे डोळे पुसले, त्यांना तूप लावलें, व नित्याप्रमाणें त्यास जेवावयास घालून व पाणी पाजून 'रामा, तूं तृप्त झालास ना? असें विचारून ते स्वतः भोजनास बसले!

अशा प्रकारच्या शेंकडों गोष्टी जुन्या ग्रंथांत दिल्या आहेत, परंतु त्या सर्वांचा अंतर्भाव या छोट्या चरित्रग्रंथांत करणें अर्थात्च शक्य नाहीं.

५

# शिवाजी आणि रामदास

स्वराज्यसंस्थापक छत्रपति शिवाजीमहाराज हे श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे शिष्य होते ही गोष्ट आज सुमारें २५० वर्षें महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. महाराज आणि समर्थ यांची पहिली भेट कधीं झाली व समर्थांचा अनुग्रह महाराजांनीं कधीं घेतला यासंबंधानें विद्वानांचा वाद असून या वादाचा निर्णयात्मक निकाल अद्याप लागलेला नाहीं. उपलब्ध पुराव्यावरून इतकें स्पष्ट लिहिण्यास हरकत नाहीं कीं, शिवाजीमहाराजांनीं आपल्या वयाच्या १७ व्या वर्षीं तोरणा किल्ला घेऊन स्वराज्यमंदिराची जी मुहूर्तमेढ रोंवली ती दुसऱ्या कोणाच्याही प्रेरणेनें रोंवली नसून केवळ स्वयंप्रेरणेनें रोंवली. स्वराज्यविस्ताराचें महाराजांचें कार्य आणि धर्मप्रसाराचें समर्थांचें कार्य, हीं दोन्ही कार्यें एकसमयावच्छेदेंकरून एकाच प्रांतांत सुरू असूनही आरंभीं बरींच वर्षेपर्यंत त्या दोघांच्याही प्रत्यक्ष भेटीचा योग आला नाहीं. ' **आपुले देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ... स्थळप्रत.
अनुक्रम ३८९०४ वि: चरित्र



नाहीं घेतलें" ही ओंवी, समर्थांनीं शिवाजी महाराजांस पाठविलेल्या ज्या पत्रांत आहे त्या पत्रानंतरच समर्थ आणि शिवाजी यांची भेट झाली असली पाहिजे; तत्पूर्वीं त्यांची भेट झालेली नव्हती, हें उघड आहे. कारण, त्यापूर्वीं त्यांची भेट झालेली असती तर वरच्यासारखे उद्गार आपल्या पत्रांत काढण्याचें समर्थांस कांहीं कारण नव्हतें. तथापि, स्वराज्यस्थापनेच्या कामीं महाराजांस समर्थांचें उत्तेजन आरंभापासूनच होतें असें सिद्ध करूं पहाणारा एक पक्ष आणि शिवाजी व समर्थ यांची भेट शिवाजीच्या कारकीर्दीच्या अखेरीस झाली असें म्हणणारा दुसरा पक्ष, या दोन्ही पक्षांच्या म्हणण्यांत सत्याचा अंश फारच कमी असून, महाराजांच्या कारकीर्दीच्या पूर्वार्धानंतर लवकरच समर्थांची व त्यांची भेट होऊन समर्थांचा अनुग्रह महाराजांनीं घेतला हें निर्भेळ सत्य आहे.

साधुसंतांच्या सहवासाची आवड महाराजांस बालपणापासूनच होती. महाराज पुण्यास असतांना तुकारामबुवांच्या कीर्तनाचा लाभ घेण्यासाठीं आपला जीव कसा धोक्यांत घालीत असत हें तुकाराम-चरित्रांतील तद्विषयक प्रसंगांवरून दिसून येतें. याशिवाय, स्वानंदस्वामी नामक एका सत्पुरुषांस त्यांनीं रायगडावर नेऊन ठेवलें होतें व त्यांची सेवा ते करीत असत असाही उल्लेख ग्रंथांतरीं आढळतो. तथापि, स्वानंदस्वामींची रायगडीं स्थापना करण्यांत, आपल्या कार्यास त्यांचा आशीर्वाद असावा इतकाच महाराजांचा हेतु होता; पारमार्थिक दृष्ट्या महाराज हे स्वानंदस्वामींचे शिष्य होते असें मानण्यास कांहींच पुरावा नाहीं. पुढें, त्याच कालांत समर्थ, रंगनाथ, जयरामस्वामी, आनंदमूर्ति वगैरे अनेक संत जरी आसमंतात् भागीं वावरत होते, तरी महाराजांच्या राजकारणाचा तो अटीतटीचा काल असल्यामुळें व लढाया, वेढे, बंदिवास, प्रवास, वगैरे गोष्टींपुढें इतर गोष्टींकडे लक्ष पुरविण्यास त्यांना फारशी

फुरसतच नसल्यामुळें समर्थादिकांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग पूर्ववयांत त्यांना आलाच नाहीं. परंतु, समर्थांचे कांहीं शिष्य व महाराज यांच्या भेटीगांठी होत असत असें उपलब्ध पुराव्यावरून, गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

समर्थ आणि शिवाजीमहाराज यांच्या भेटीविषयींचा व त्या दोघांचा संबंध कोणत्या प्रकारचा होता हें दाखविणारा मुख्य पुरावा म्हटला म्हणजे शक १६०१ मध्यें शिवाजीमहाराजांनीं समर्थांस दिलेली पत्ररूपी सनद होय; व या सनदेंत स्वतः महाराजांनीं जे शब्द वापरले आहेत त्यांवरून, सनदेच्या कालापूर्वीं पुष्कळच वर्षें समर्थ आणि शिवाजी यांची भेट होऊन त्यांचें बोलणेंचालणें झालें होतें हें अगदीं निर्विवाद रीतीनें सिद्ध होत आहे. ही सनद येणेंप्रमाणें—

श्री श्रीरघुपति

श्रीमारुति

श्रीसद्‌गुरुवर्य श्रीसकल तीर्थरूप श्रीकैवल्यधाम श्रीमहाराज श्रीस्वामी स्वामीचे सेवेसी,

चरणरज शिवाजीराजे यांनीं चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना जे मजवर कृपा करुनु सनाथ केलें. आज्ञा केली कीं तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करुनु धर्मस्थापना देव ब्राह्मणाची सेवा प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावें, हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पाववील, त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट दुराढे लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करुनु राज्यपरंपरा अक्षयी चालेल ऐशीं स्थळें दुर्घट करावीं ऐसें जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले. याउपरी राज्य सर्व संपादिलें तें चरणीं अर्पण करुनु

सर्व काळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा जाहाली कीं तुम्हास पूर्वी धर्म सांगितले तेच करावे, तीच सेवा होय ऐसें आज्ञापिलें. यावरून निकट वास घडुनु वारंवार दर्शन घडावें, श्रींची स्थापना कोठें तरी होऊनु सांप्रदाय शिष्य व भक्ति दिगंत विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली तेही आसमंतांत गिरिगव्हरीं वास करुनु चाफळीं श्रीची स्थापना करुनु सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता त्यास चाफळीं श्रींची पूजा मोहोछाव ब्राह्मणभोजन आतिथि इमारत यथासांग घडावें. जेथें जेथें श्रीच्या मूर्ति स्थापना तेथें उछाव पूजा घडावी. यास राज्य संपादिलें यांतील ग्रामभूमी कोठें काय नेमावी ते आज्ञा व्हावी, तेव्हां आज्ञा जाहाली कीं विशेष उपाधीचें कारण काय तथापि तुमचे मनीं श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहाला त्यास येथावकाश जेथें जें नेमावेंसें वाटेल तें नेमावें व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विचार होईल तैसें करावें या प्रकारें आज्ञा जाहाली या वरुनु देशांतरीं सांप्रदाय व श्रीसंनिध चाफळीं एकशें एकवीस गांव सर्वमान्य व एकशें एकवीस गांवीं अकरा बिघेप्रमाणें भूमी व अकरा स्थळीं श्रींची स्थापना जाहाली, तेथें नैवेद्यपूजेस भूमी अकरा बिघेप्रमाणें नेमिले आहेती ऐसा संकल्प केला आहे. तो सिद्धीस नेण्याविषयीं विनंति केली तेव्हां संकल्प केला तो परंपरेनें शेवटास न्याहावा ऐसी आज्ञा जाहाली. त्यावरून सांप्रत गाऊ व भूमी नेमिले......

पुढें जमिनीचा तपशील आहे तो येथें देत नाहीं. आतां, वरील सनदेंतील शब्दयोजनेवरून काय निष्कर्ष निघतो हें जरा बारकाईनें पाहूं. कारण या प्रश्नाचा निकाल, माझ्या मतें, मुख्यतः या एका सनदेवरच अवलंबून आहे.

 शिवाजीमहाराज म्हणतात, "मजवर कृपा करून सनाथ केलें.

आज्ञा केली कीं तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करुनु देवब्राह्मणाची सेवा......करावें. तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धी पाववील. त्यावरून जो जो उद्योग केला......जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींनीं आशीर्वादप्रतापें पूर्ण केलें." यावरून ही गोष्ट अगदीं सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होते कीं, ही पत्ररूपी सनद महाराजांनीं समर्थास दिली त्यापूर्वीं बरींच वर्षें, त्या दोघांची भेट झालेली होती व त्या भेटीच्या वेळीं, महाराजांनीं ज्या ज्या गोष्टी कराव्या म्हणून समर्थांनीं त्यांस सांगितलें होतें त्या त्या गोष्टी सनदेच्या कालापर्यंत महाराजांच्या हातून झालेल्या होत्या. 'दुष्ट दुराढे लोकांचा नाश, विपुल द्रव्यप्राप्ती, राज्यपरंपरा अक्षयी चालेल ऐशीं दुर्घट स्थळें ( किल्ले ) करणें,' वगैरे गोष्टी कांहीं चुटकीसरशा होणाऱ्या नाहींत, त्या व्हावयास निदान दहापंधरा वर्षांचा अवधि तरी जरूर आहे. यावरून सनदेच्या कालापूर्वीं कितीतरी वर्षें अगोदर, वरील गोष्टी करण्याबद्दलची आज्ञा समर्थांनीं महाराजांस दिली असली पाहिजे हें अगदीं निर्विवाद सिद्ध होतें. "या उपरी राज्य सर्व संपादिलें तें चरणीं अर्पण करुनु सर्व काळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा जाहली कीं तुम्हास पूर्वीं धर्म सांगितले तेच करावेत तीच सेवा होय ऐसें आज्ञापिलें." या वाक्यांत दुसऱ्या एका भेटीचा उल्लेख आहे. या भेटीच्या वेळीं, महाराजांनीं, समर्थांच्या 'आशीर्वादप्रतापें' प्राप्त झालेलें राज्य समर्थचरणीं वाहून, त्यांची सेवाचाकरी करीत रहाण्याची आपली इच्छा समर्थांपाशीं व्यक्त केली असतां पूर्वीं सांगितलेला राजधर्म पाळणें हीच आपली सेवा होय, असें समर्थांनीं महाराजांस सांगितलें. आपलें सगळें राज्य समर्थांस अर्पण करण्यास शिवाजीमहाराज तयार झाले असतां समर्थांनीं त्याचा स्वीकार

शि वा जी आ णि रा म दा स

केला नाहीं अशी जी कथा आज अडीचशें वर्षें महाराष्ट्रांत प्रचलित आहे तिची सत्यता महाराजांच्या पत्रांतील वरील वाक्यावरून निःसंदेह रीतीनें सिद्ध होत आहे. समर्थांचें वास्तव्य एकाच जागीं फार दिवस नसे व त्यामुळें महाराजांस त्यांची वाटेल तेव्हां भेट घेतां येत नसे, म्हणून, समर्थांनीं आपल्या मुक्कामाच्या जवळपास कोठें तरी कायमची वस्ती करावी या उद्देशानें महाराजांनीं शेवटीं त्यांना उपरिनिर्दिष्ट पत्रांत निर्दिष्ट केलेल्या जमिनी देऊं केल्या, पण त्या वेळींही 'असल्या उपाधीचें कारण काय ?' असाच जबाब समर्थांनीं त्यांस आरंभीं दिला. परंतु शेवटीं, महाराजांनीं फारच आग्रह केल्यामुळें, आपण स्थापन केलेल्या श्रीराममंदिरांतील पूजाअर्चा, रामनवमी–महोत्सव व संप्रदाय-परंपरा यांना चिरस्थायीत्व यावें याच एका उद्देशानें समर्थांनीं, महाराजांनीं दिलेल्या जमिनीचा स्वीकार केला. यांत महाराजांची उत्कट गुरुभक्ति जशी दिसून येते तद्वत्च समर्थांची निरपेक्षताबुद्धीही प्रतीत होते.

सनदेंतील वाक्यांच्या वरील विवरणावरून, शक १६०१ हा जो सनदेचा काल त्यापूर्वीं कमींतकमी १५ वर्षें म्हणजे शक १५८५ च्या सुमारास समर्थ आणि शिवाजी यांची पहिली भेट झाली असली पाहिजे अशी वाचकांची खात्री होईल. समर्थ शक १६०३ मध्यें समाधिस्थ झाले त्याच वर्षीं अंताजी गोपाळ कुडाळकर यांनीं तत्कालीन कागदपत्रांच्या आधारानें 'समर्थ वाकेनिशी' लिहिली असून तींत समर्थचरित्रांतील ठळक गोष्टींच्या शकांचें क्रमवार टिप्पण दिलें आहे. या टिपणांत शिवाजी महाराजांस समर्थांचा अनुग्रह झाल्याचा काल शक १५७१ वैशाख शुद्ध नवमी गुरुवार, हा दिला आहे. परंतु या कालास विरोधक अशीं दोन पत्रें प्रतिपक्षीयांकडून पुढें आणलीं जातात. पहिलें पत्र

शक १५८० मध्यें दिवाकर गोसावी यांना भास्कर गोसावी यांनीं लिहिलेलें आहे; त्यांत, भास्कर गोसावी शिवाजीमहाराजांकडे गेले असतां " समर्थ कोठें रहातात ? मूळगांव कोण ? " असे प्रश्न महाराजांनीं त्यांस विचारल्याचा उल्लेख असून, दुसरें पत्र दिवाकर गोसावी यांस केशव गोसावी यांनीं शक १५९४ मध्यें लिहिलेल्या पत्राची नक्कल आहे व त्यांत " राजश्री शिवाजी राजे भोसले हे समर्थांचे भेटीस येणार. राजे यांची पहिलीच भेट. " अशीं वाक्यें आहेत. ह्या दोन पत्रांतील हे दोन उल्लेख जर प्रमाणभूत मानले तर शक १५९४ पर्यंत समर्थ व शिवाजीमहाराज यांची भेट झाली नव्हती व त्यानंतर ती केव्हां तरी झाली असें मानणें भाग आहे. शक १५८० च्या पत्रांत ' समर्थ कोठें रहातात ? मूळगांव कोण ? ' वगैरे प्रश्न शिवाजी महाराजांनीं विचारल्याचा ज्या अर्थीं स्पष्ट उल्लेख आहे त्या अर्थीं त्या वेळेपर्यंत समर्थ आणि शिवाजी यांची भेट झालेली नव्हती, इतकेंच नव्हे तर महाराजांस समर्थांची फारशी माहितीही नव्हती असेंच म्हणावें लागतें. शक १५७१ त जर समर्थांचा अनुग्रह महाराजांस झालेला असता तर त्यानंतर १० वर्षांनीं असले प्रश्न भास्कर गोसावी यांस त्यांनीं खात्रीनें विचारले नसते. कारण तेवढ्या दहा वर्षांत समर्थांशीं त्यांचा पुष्कळच परिचय होऊन त्यांच्यासंबंधाची जरूर तेवढी सर्व माहिती त्यांना मिळून चुकलेली असती. अर्थात्, शक १५८० चें हें पत्र शक १५७१ त समर्थांनीं महाराजांस अनुग्रह दिला या समजुतीस पूर्णपणें विघातक आहे यांत बिलकुल संशय नाहीं; आणि यासंबंधानें कोणी कितीही मखलाशी केली तरी तिचा कांहीं उपयोग नाहीं. कारण पुरावाच तसा निर्णायक आहे. दुसरें पत्र केशव गोसावी यांचें शक १५९४ मधलें. यांतील ' राजे

यांची पहिलीच भेट.' हें वाक्य फार घोटाळा उत्पन्न करणारें आहे. पूर्वीं उद्धृत केलेल्या खुद्द शिवाजीमहाराजांच्या पत्रांतील माहितीस हें वाक्य विरोधी आहे यांत संशय नाहीं. परंतु, शक १५९४ मध्यें समर्थ व शिवाजी यांची पहिली भेट झाली असें जर या वाक्यावरून मानलें तर तेव्हांपासून, महाराजांनीं समर्थांस शक १६०१ मध्यें सनद दिली त्या वेळेपर्यंतच्या सहा सात वर्षांत, समर्थांनीं महाराजांस करावयास सांगितलेल्या व महाराजांनीं केलेल्या सर्व गोष्टी घडून येणें शक्य नाहीं. महाराजांच्या पत्रांतील शब्दयोजना समर्थांशीं त्यांचा दीर्घकालीन परिचय दाखविणारी आहे. अशा स्थितींत, केशव गोसावी यांच्या पत्रांतल्या "राजे यांची पहिलीच भेट.' या वाक्याचा अर्थ त्या वाडींतली पहिली भेट असाच घ्यावा लागतो. तात्पर्य, शक १६०१ त महाराजांनीं पत्ररूपी सनद समर्थांस दिली त्यापूर्वीं कमींत कमी १५ वर्षें तरी त्या दोघांचा निकट परिचय असलाच पाहिजे असें मानल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

अगदीं आरंभीं शिवाजीमहाराजांचा संबंध समर्थांशीं कसा आला हें आतां पाहूं. पुणें येथें गिरिगोसावी यांच्या एका कीर्तनास महाराज गेले असतां कीर्तन ऐकून ते फार संतुष्ट झाले व गिरिगोसावी यांस त्यांनीं कांहीं बिदागी देऊं केली. तेव्हां गोसावी यांनीं सांगितलें कीं, "आम्ही निरिच्छ, आम्हास बिदागीची जरुरी नाहीं. त्यापेक्षां, चाफळ येथें रामदासस्वामी श्रीरामाचें देवालय बांधीत आहेत त्यांना आपण मदत कराल तर बरें होईल." त्यावरून, महाराजांनीं, चाफळचे मामलेदार नरसोमलनाथ यांचे हस्तें ३०० होन श्रीराममंदिरासाठीं समर्थांकडे पाठविले. ही हकीकत शक १५७० त घडली. पुढें बरींच वर्षें गेलीं. चाफळच्या राममंदिरास आपण ३०० होन दिले आहेत याची आठवणही महाराजांस

राहिली नाहीं. पुढें, कांहीं तरी परमार्थसाधन करावें अशी इच्छा महाराजांस होऊन, अनुग्रहार्थ ते एखाद्या लायक सत्पुरुषाचा शोध करूं लागले. त्याच विवंचनेंत ते असतां प्रतापगडावरील देवीच्या देवालयांत 'रामदासां'चा अनुग्रह घेण्याविषयीं त्यांस दृष्टांत झाला. तेव्हां समर्थांच्या शोधास महाराज चाफळास आले. तेथें नरसोमलनाथ अंबरखाने हे महाराजांचे, चाफळखोऱ्याचे मामलेदार होते. समर्थ मठांत रहात नाहींत, ते अरण्यांत फिरतात असें त्यांनीं महाराजांस सांगितलें. 'समर्थ या भागांत इतकीं वर्षे असतां आपणाकडून त्यांची कांहीं सेवा घडली नाहीं" असें महाराज म्हणाले. तेव्हां "चाफळच्या श्रीराममंदिरास आपण पूर्वी २०० होनाची मदत केलेली आहे," असें नरसोमलनाथ यांनीं सांगितलें. महाराजांस त्या गोष्टीची बिलकुल आठवण नव्हती, म्हणून नरसोमलनाथ यांस त्यांनीं खुलासा विचारला. नरसोमलनाथ यांनीं, गिरिगोसावी यांस महाराजांनीं देऊं केलेली बिदागी त्यांनीं न घेतां चाफळ येथें रामदासस्वामी जें राममंदिर बांधीत आहेत त्यास मदत करण्यास महाराजांस सांगितलें होतें व त्याप्रमाणें महाराजांच्या आज्ञेवरून आपण २०० होन समर्थांस दिले होते, वगैरे जुनी हकीकत महाराजांस सांगितली. शक १५७१ त जर महाराजांस समर्थांचा अनुग्रह झालेला असता तर एक वर्षापूर्वी, त्यांनीं जी २०० होनांची मदत चाफळच्या राममंदिरास केली होती तिची पूर्ण विस्मृति अवघ्या एक वर्षाच्या अवधींत त्यांना खात्रीनें झाली नसती. असो. मग त्यांनीं ७०० होन नरसोमलनाथ यांजपाशीं दिले आणि चाफळच्या देवालयास, मांड नदी व हणमंत ओढा यांचा उपद्रव होतो, त्याच्या निवारणार्थ बंधारा घालण्यास सांगितलें. नंतर आसपासच्या अरण्यांत समर्थांचा शोध करूनही त्यांची गांठ न

पडल्यामुळें महाराज पुनः प्रतापगडावर गेले व समर्थांचा अनुग्रह झाल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं अशा निर्धारानें देवीच्या देवालयांत निद्रित झाले. पहांटे समर्थांनीं त्यांस स्वप्नांत दर्शन दिलें. ती गोष्ट मातेस सांगून महाराज पुनः समर्थांच्या शोधास निघाले. महाबळेश्वर–वाईवरून ते माहुलीस आले. तेथें समर्थांकडून एक शिष्य महाराजांस ओंवीबद्ध पत्र घेऊन आला. हें पत्र येणेंप्रमाणें—

" निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसि आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥

परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैंची ॥ २ ॥

नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥

यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ॥ ४ ॥

आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठायीं ॥ ५ ॥

धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥

देव धर्म गो ब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥

उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ॥ ९ ॥

या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ १० ॥
आणीकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकां आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणूं ॥ १३ ॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ॥ १४ ॥
उदंड राजकारण तटलें । तेणें वित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

समर्थांसारख्या सत्पुरुषाचें शिवाजीमहाराजांविषयीं कोणतें मत होतें तें या ओंव्यांवरून अगदीं स्पष्ट समजतें. "**तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें**" या उद्गारांवरून, समर्थांनीं चाफळ येथें वस्ती केल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं हें पत्र लिहिलें असलें पाहिजे. कारण, शक १५७० त समर्थ चाफळास आल्यावर पुढें फक्त एकच वर्षानें म्हणजे शक १५७१ त हें पत्र त्यांनीं लिहिलें असें मानल्यास, उतावीळपणाचा दोष विनाकारण त्यांजवर लादावा लागेल. "आपल्या देशांत आम्ही बरींच वर्षें वास्तव्य करीत असतांही आमच्याकडे तुमचें लक्ष गेलें नाहीं," असेंच म्हणण्याचा समर्थांचा आशय वरील ओंवींत अगदीं स्पष्ट आहे व इतक्या वर्षांत महाराजांचें लक्ष आपल्याकडे कां गेलें नसावें याचें कारणही "**उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें**" या ओंवींत समर्थांनीं स्वतःच सांगितलें आहे. अर्थात्

हें 'उदंड राजकारण' एक वर्षांतलें नसून अनेक वर्षांतलें असलें पाहिजे हें उघड आहे. असो.

समर्थांच्या वरील पत्रास महाराजांनीं असें उत्तर पाठविलें कीं, "स्वामी, मी बहुत अपराधी आहें. आपण क्षमावंत आहां. सांप्रत कृपा करून आशीर्वादपत्र पाठविलें, तें पाहून परम आनंदातें पावलों. दर्शनाची इच्छा धरून येत आहें, त्यास कृपादर्शन दिलें पाहिजे, ही विज्ञप्ति."

येणेंप्रमाणें उत्तर पाठविल्यावर दुसरे दिवशीं महाराज स्वारीसह माजगांवापर्यंत गेले. तेथून पुढें निळो सोनदेव मुजुमदार, बाळाजी आवजी चिटणीसप्रभृति निवडक मंडळीसह चाफळास जाऊन त्यांनीं श्रीरामदर्शन घेतलें. समर्थ शिंगणवाडीस आहेत अशी माहिती मिळाल्यावरून ते शिंगणवाडीस गेले. दिवाकर भट गोसावी हे महाराजांबरोबर होते. समर्थ उंबराखालीं बसून दासबोध लिहीत होते, इतक्यांत महाराज तेथें गेले. त्यापूर्वींच महाराजांचें पत्र समर्थांच्या हातीं पडलें होतें. महाराजांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातला तेव्हां समर्थांनीं त्यांस उठवून म्हटलें, "तुमचें पत्र व तुम्हीं एकदमच आलां." पुढें महाराजांनीं अनुग्रह करण्याविषयीं विनंति केली. ती मान्य करून समर्थांनीं त्यांस स्नान करून येण्यास सांगितलें. नंतर महाराजांनीं समर्थांची पूजा केल्यावर, समर्थांनीं त्यांस त्रयोदशाक्षरी मंत्राची दीक्षा देऊन 'तत्त्वमसि' महावाक्याचा उपदेश केला. हा उपदेश 'लघुबोध' या नांवानें प्रसिद्ध असून, दासबोधाच्या तेराव्या दशकांतील सहाव्या समासांत तो अंतर्भूत झालेला आहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: चरित्र
क्रमांक ........ नों. दि:

६

# समर्थांचें राजकारण

**मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण ।**

शक १५७० मध्यें समर्थांनीं चाफळ येथील श्रीराममंदिर बांधलें. त्यानंतर शक १६०३ पर्यंत ते विद्यमान होते. ह्या ३१ वर्षांच्या दीर्घकालांत त्यांनीं जें देशकार्य, धर्मकार्य आणि वाङ्मयकार्य केलें त्याची यथार्थ कल्पना होण्यास, त्यांच्या चरित्रासंबंधाचें जें जुनें नवें विस्तृत वाङ्मय उपलब्ध आहे तेंच लक्षपूर्वक वाचलें पाहिजे. छत्रपति शिवाजीमहाराजांच्या राजकारणास समर्थांच्या राजकारणाचा थोडाबहुत अप्रत्यक्ष उपयोग झाला असला तरी समर्थांचें मुख्य कार्य राजकारण हें नव्हतें. उपासनामार्गाचा प्रसार करण्यासाठीं गांवोंगांव कीर्तन करणें, त्या निमित्तानें फार मोठा जनसमुदाय गोळा करून त्यांत आपल्या अमोघ वाणीनें नवचैतन्य उत्पन्न करणें, सोप्या सुलभ भाषेंत ग्रंथरचना करून तद्द्वारा लोकांचें धर्मविषयक औदासीन्य झाडून टाकून त्यांच्या मनांत स्वधर्मप्रेम

निर्माण करणें, गांवोंगांव मठस्थापना करून व स्वतःच्या कसोटीस उतरलेल्या महंतांची त्या मठांत नेमणूक करून सर्व देशभर धर्मप्रसारकार्याचीं केंद्रस्थानें स्थापन करणें इत्यादि कामें करण्यांतच त्यांनीं आपल्या आयुष्याचीं हीं ३१ वर्षें व्यतीत केलीं. मात्र, या धर्मकार्याबरोबरच राजकारण करण्याची एकही संधि त्यांनीं फुकट जाऊं दिली नाहीं.

समर्थांस जें स्वराज्य पाहिजे होतें तें धर्मरक्षणासाठीं पाहिजे होतें. परधर्मीय राज्यकर्त्यांच्या राजवटींत स्वधर्माचा जो उच्छेद होत चालला होता त्याला जर आळा घालावयाचा तर त्यासाठीं स्वराज्यच स्थापलें पाहिजे अशी त्यांची ठाम समजूत होती व असें स्वराज्य स्थापण्याचा प्रयत्न दुसरा एक पराक्रमी पुरुष करीत आहे त्याला यथाशक्ति साहाय्य आपण केलें पाहिजे या जाणीवेनेंच त्यांनीं आपले उद्योग चालविले होते. ही जाणीव जर त्यांना नसती तर—

**मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।**
**येविषयीं न धरितां तकवा। पूर्वज हांसती॥**

*　　*　　*

**कष्टेंविण फळ नाहीं। कष्टेंविण राज्य नाहीं।**
**केल्याविण होत नाहीं। साध्य जनीं॥**

*　　*　　*

**सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें।**
**परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे॥**

*　　*　　*

**राजकारण बहुत करावें। परंतु कळोंच नेदावें।**
**परपीडेवरी नसावें। अंतःकरण॥**

इत्यादि शेंकडों ओंव्या आपल्या परमार्थपर कवितेंत घालण्याचें त्यांना कांहीं कारण नव्हतें. समर्थपूर्वकालीन व समकालीन बहुतेक सर्व संत दैववादी होते, परंतु समर्थांनीं हा दैववाद साफ धुडकावून लावला असून सर्वत्र प्रयत्नवादाचाच पुरस्कार केला आहे. '**यत्न तो देव जाणावा**' या श्लोकांत तर त्यांनीं देवाइतकें यत्नाचें महत्त्व वर्णिलें आहे. स्वतः हातीं शस्त्र धारण करून त्यांनीं लढाया मारल्या नाहींत, पण लढाया मारण्याचें स्फुरण बहुजनसमाजाच्या ठायीं त्यांनीं उत्पन्न केलें व हेंच त्यांचें राजकारण होय. 'घरादारावर लाथ मारून आणि दैवावर हवाला ठेवून अरण्याचा रस्ता धरा' असला उपदेश सर्वसामान्य जनतेस त्यांनीं केला नाहीं, उलट '**आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका ।**' असा त्यांचा दंडक आहे. लोकांची युद्धोत्सुकता वाढावी म्हणून रामायणाच्या युद्धकांडावर त्यांनीं मुद्दाम वीररसप्रचुर अशी मराठी काव्यरचना केली. हें समर्थकृत युद्धकांड लक्षपूर्वक वाचल्यास असें स्पष्ट दिसून येईल कीं, जेणेंकरून लोकांत वीरश्रीचा संचार होऊन त्यांचा उत्साह वाढेल अशाच प्रकारची भाषा या प्रकरणांत समर्थांनीं मुद्दाम सर्वत्र वापरली आहे. शिवाजीमहाराजांस अनुग्रह दिल्यानंतर राजधर्म व क्षात्रधर्मच समर्थांनीं त्यांस सांगितला, राज्य सोडून गोसावी हो असें सांगितलें नाहीं. उलट,

**मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।**
**फिरोन येतां पावावें । महद्भाग्य ॥**

* * *

**दोनी दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें ।**
**युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनी ॥**
**देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।**
**आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥**

* * *

**देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।**
**देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥**
**देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।**
**मुलुख बुडावा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥**

अशा प्रकारचा दणदणीत उपदेश महाराजांस त्यांनीं केला आहे. समर्थांचें राजकारण हें अशा प्रकारचें होतें. '**मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण**' या ओंवींत त्यांनीं हरिकथानिरूपणाच्या खालोखाल राजकारणास स्थान दिलें आहे. समर्थांच्या वाङ्मयांत हा 'राजकारण' शब्द एकंदर ३६ वेळां आला आहे, त्यांपैकीं बहुतेक स्थलीं, हल्लीं आपण ज्या अर्थानें तो शब्द वापरतों त्याच अर्थानें त्याचा उपयोग करण्यांत आलेला आहे.

समर्थ हे वर्णानें ब्राह्मण व आचरणानें साधु होते. अर्थात्, साधुत्वास उचित अशा गोष्टींचा त्याग करून, परशुरामाप्रमाणें त्यांनीं हातीं शस्त्र घेऊन युद्ध केलें नाहीं, पण युद्ध करण्याचा ज्यांचा अधिकार त्या क्षत्रियांना त्यांनीं युद्ध करावयास लाविलें! संधि मिळाली त्या त्या वेळीं लढाईचेंच शिंग त्यांनीं पुकारलें आहे. शिवाजीमहाराजांचें निर्याण झाल्यावर त्यांचे पुत्र संभाजी राजे यांस त्यांनीं जें पत्र पाठविलें त्यांत राजकारणानें भरलेल्या पुढील ओंव्या आहेत—

**"अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ।**
**तजवीजा करीत असावें । एकांत स्थळीं ॥**
**राजी राखतां जग । मग कार्यभागाची लगबग ।**
**ऐसें जाणोनी सांग । समाधान राखावें ॥**
**सकळ लोक एक करावे । गनीम निवटून काढावे ।**
**ऐसें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥**
**आधीं गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।**
**ऐसें न करितां धक्के । राज्यास होती ॥**

समय प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा ।
आला तरी कळों न द्यावा । जनांमध्यें ॥
बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावे ।
कष्टें करून घसरावें । म्लेंच्छांवरी ॥
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल तेणें ॥

अशा प्रकारचा खणखणीत उपदेश करणारा साधु इतर संतांसारखाच नुसता परमार्थोपदेशक होता, त्याला राजकारणाचें वावडें होतें, आणि युद्धकला त्याला अप्रिय होती असें म्हणणें हें पांढऱ्याला काळें म्हणण्यासारखें आहे.

दासबोधाच्या १८ व्या दशकांतला ६ वा 'उत्तमपुरुष' नामक समास तर समर्थांनीं शिवाजीमहाराजांसच अनुलक्षून लिहिलेला दिसतो. या समासांतल्या बहुतेक ओंव्या निव्वळ राजकारणपर आहेत. समर्थांनीं हा समास लिहिला त्या वेळीं अफजुलखानाच्या वधाचा प्रसंग होता, म्हणून त्या प्रसंगीं कसें वागावें हें या समासांतील पुढील ओंव्यांत त्यांनीं शिवाजीमहाराजांस सुचविलें आहे—

तुंड हेंकाड कठोरवचनी । अखंड तोले साभिमानी ।
न्यायनीति अंतःकरणीं । घेणार नाहीं ॥
तऱ्हे शीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ।
राजकारणाच्या संवादा । मिळोंचि नेणें ॥
ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ।
पापी अपस्मार जनीं । राक्षस जाणावे ॥
समयासारिखा समयो ये ना । नेम सहसा चालेना ।
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥

म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड ।
या कारणें अखंड । सावधान असावें ॥

या ओंव्यांतून निघणारा ध्वनि अगदीं स्पष्ट आहे. पहिल्या दोन तीन ओंव्यांत, अफजुलखानाच्या स्वभावाचें वर्णन असून तो न्याय आणि नीति यांना जुमानणारा नाहीं व आपला शब्द तो कधीं पाळणार नाहीं असें समर्थांनीं सुचविलें असून, अशी संधि पुनः येणार नाहीं, यासाठीं वेळ पडल्यास नीतिनियमाचें बंधन क्षणभर बाजूस ठेवावें असेंही, दूरान्वयानें, सूचित केलें आहे. असो.

'आनंदवनभुवन' हें समर्थांचें एकच प्रकरण लक्षपूर्वक वाचलें असतां त्यांचा स्वधर्माभिमान आणि स्वदेशाभिमान किती जाज्वल्य होता हें कोणाच्याही ध्यानांत येईल. शिवाजीमहाराज विजयी होऊन महाराष्ट्र स्वतंत्र होतांच समर्थांस जो आनंद झाला त्याच्या भरांत हें प्रकरण त्यांनीं लिहिलें असल्यामुळें त्या आनंदाची छटा त्यांत सर्वत्र पसरली आहे. पुढील कांहीं श्लोक पहा—

स्वधर्माआड जे विघ्नें ते ते सर्वत्र ऊठिलीं ।
लाटिलीं कूटिलीं देवें, आनंदवनभूवनीं ॥
त्रैलोक्य चालिल्या फौजा सौख्य बंधविमोचनें ।
मोहीम मांडली मोठी आनंदवनभूवनीं ॥
कल्पांत मांडला मोठा म्लेंच्छ दैत्य बुडावया ।
कैंपक्ष घेतला देवीं आनंदवनभूवनीं ॥
बुडाले सर्वही पापी हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो जाला आनंदवनभूवनीं ॥
पूर्वीं जे मारिले होते तेचि आतां बळावले ।
कोपला देव देवांचा आनंदवनभूवनीं ॥

**भीमचि धाडिला देवें वैभवें धांव घेतली।**
**लांगूळ चालिलें पूढें आनंदवनभूवनीं ॥**

समर्थांचा देशाभिमान नुसत्या महाराष्ट्रापुरताच मर्यादित नसून त्याची व्याप्ति फार मोठी होती हें वरील श्लोकांतील '**हिंदुस्थान बळावलें**' या शब्दांवरून सिद्ध होतें. तत्कालीन राजकीय परिस्थितीशीं इतकी तन्मयता दुसऱ्या कोणत्याही साधूची झालेली दिसत नाहीं. '**मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा,' महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे,**' असें कंठरवानें सांगणारा आणि म्लेंच्छांचा पाडाव होऊन देश स्वतंत्र व धर्म निर्भय झाल्याबरोबर आनंदोद्गारांचा वर्षाव करणारा हा महापुरुष 'राजकारणी' नव्हता, उलट राजकारणाचें त्याला अगदीं वावडें होतें, असें प्रतिपादन करणें हा निव्वळ हटवादीपणा आहे. केवळ अध्यात्म सांगण्यासाठीं 'दासबोधा'सारखा ग्रंथ लिहावयास बसलेला मनुष्य त्यांत राजकारणाचे दोन समास मध्येंच कां घुसडतो? त्याला राजकारणाची आवड नव्हती म्हणूनच कीं काय? आतां, राजकारण हा शब्द ज्या अर्थानें आपण हल्लीं वापरतों त्या अर्थाचें राजकारण समर्थांनीं केलें नसेल, परंतु त्यांनीं आपल्या आयुष्यांत ज्या ज्या गोष्टी केल्या त्या सर्व स्वराज्यस्थापनेच्या तत्कालीन प्रयत्नाला साहाय्यक अशाच होत्या यांत बिलकुल संशय नाहीं.

मर्दपणाचा आणि राजकारणाचा उपदेश करण्याची एकही संधि समर्थांनीं वायां जाऊं दिली नाहीं; एका थोबाडांत मारलें असतां दुसरें थोबाड पुढें करा असला दुबळा उपदेश न करितां, जयिष्णुता आणि शक्तिसंपन्नता संपादन करून दुर्जनाचा कांटा काढून टाका आणि सर्वत्र रामराज्य करा असें आपल्या तेजस्वी वाणीनें सर्व लोकांस त्यांनीं बजावून सांगितलें आहे. ते म्हणतात—

शक्तीनें पावती सुखें शक्ति नस्तां विटंबना ।
शक्तीनें नेटका प्राणी वैभवें भोगितां दिसे ॥

कोण पुसे अशक्ताला रोगीसें बराडी दिसे ।
कळा नाहीं कांति नाहीं युक्ति बुद्धी डुरावली ॥

सार संसार शक्तीनें शक्तीनें शक्ति भोगिजे ।
शक्त तो सर्वही भोगी शक्तीवीण दरिद्रता ॥

शक्तीनें मिळती राज्यें युक्तीनें येत्न होतसे ।
शक्ति युक्ति जये ठायीं तेथें श्रीमंत धांवती ॥

युक्ति ते जीवकळा विशक्तीसी तुळणा नसे ।
आचुक चुकेना कोठें त्याचीं राज्यें समस्तही ॥

युक्तीनें चालती सेना युक्तीनें युक्ति वाढवी ।
संकटीं आपणा रक्षी रक्षी सेना परोपरी ।

नुसता टाळ कुटून जुन्या भक्तिमार्गाचाच कीस काढण्यापलीकडे समर्थांनीं विशेष कांहीं केलें नाहीं आणि सांगितलें नाहीं असें म्हणणारांनीं वरच्यासारखे समर्थांचे उद्गार लक्षपूर्वक, पण निर्विकार चित्तानें वाचावे आणि इतर संतांसारखेच समर्थ हे एक भक्तिमार्गी संत असून त्यांचें वैशिष्ट्य असें कांहीं नाहीं हें आपलें मत कितपत बरोबर आहे हें पुन: एकदां तपासून पहावें.

समर्थांचें राजकारण कोणत्या प्रकारचें होतें हें दाखविणारे अशा प्रकारचे वेंचे त्यांच्या ग्रंथांतून वाटेल तेवढे देतां येतील, परंतु विस्तारभयास्तव ते देण्याचा मोह आवरण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

७

## जांब येथील वृत्तांत

समर्थ पंढरीस गेले होते त्या वेळीं जांबगांवचे कांहीं लोक त्यांस भेटले, त्यांजबरोबर मातुश्री राणूबाई व बंधु श्रेष्ठ यांस समर्थांनीं एक ओंवीबद्ध पत्र पाठविलें तें असें—

सकळ गुणांची निधि । निर्गुणाची कार्यसिद्धि ।
विवेकाची दृढबुद्धि । तुझेनि गुणें ॥ १ ॥

तूं भवसिंधूचें तारूं । तूं भक्तांचा आधारु ।
तूं अनाथाचे अवसरू । वैष्णवी माया ॥ २ ॥

तूं भावार्थांची जननी । तूं विरक्ता संजीवनी ।
तूं परमार्थांची खाणी । भजनशीळ ॥ ३ ॥

तूं सर्व सुखाची मूस । तूं रत्नाची मांदूस ।
तुझेनि चुकती सायास । संसारींचे ॥ ४ ॥

तूं परमार्थाविषयीं अंगण । सद्गुरुदासांचें मंडण ।
समाधानाची खूण । अंतरीं वसे ॥ ५ ॥

सत्संगासी सादर । भक्तिमार्गासि तत्पर ।
धूर्त कुशल अति आदर । परोपकारीं ॥ ६ ॥

श्रीगुरुभजनीं तत्पर । स्वामीकृपा निरंतर ।
म्हणोनि शुद्ध क्रियेचा उद्धार । तुमचे ठायीं ॥ ७ ॥

आत्मचर्चेसी मुकुटमणि । अत्यंत सादरता निरूपणीं ।
बोलती अमृतवाणी । मृदुवचनीं ॥ ८ ॥

विवेकनिधि केवळ । अंतरशुद्ध निर्मळ ।
ज्ञानदीप प्रबळ । तुमचे ठायीं ॥ ९ ॥

क्रियाशुद्धि निर्मळ मन । निरभिमानी परम सज्जन ।
निरंतर अनुसंधान । अंतरीं वसे ॥ १० ॥

भावार्थाचें आगरु । प्रबळ शांतीचा सागरु ।
पाहतां उपमे मेरू । तोही उणा ॥ ११ ॥

यांतील आरंभींच्या चार ओंव्या राणूबाईंस व पुढील ओंव्या श्रेष्ठांस उद्देशून लिहिलेल्या दिसतात. तीर्थयात्रा करून परत आल्यावर समर्थ आपल्या वयाच्या ३६ व्या वर्षीं, मातृदर्शनार्थ जांबेस गेले होते. त्यानंतर फक्त एकदांच, शक १५७६ मध्यें ते पुनः जांबेस गेल्याचा उल्लेख 'स्वानुभवदिनकर' ग्रंथांत सांपडतो, व त्यास 'समर्थप्रताप' ग्रंथांतही पुष्टी मिळते. राणूबाईंनीं देह ठेवल्याची तिथि हनुमंतस्वामींनीं दिली आहे ती शक १५७७ ज्येष्ठ शुद्ध ३ होय. अर्थात् समर्थ पुनः जांबेस गेले त्या वेळीं राणूबाई विद्यमान होत्या. श्रेष्ठांनीं आपला 'भक्तिरहस्य' ग्रंथ शक १५९० त लिहिला. राणूबाईचें निर्याण झालें त्या वेळची एक चमत्कारिक गोष्ट बखरींत

दिली आहे. शक १५७७ मधली ही गोष्ट. एके दिवशीं समर्थांनीं आपल्या शिष्यांस आज्ञा केली कीं, "ह्या माझ्या खोलीचें दार बंद करून कुलूप लावा व पुनः सोळाव्या दिवशीं कुलूप काढून खोली उघडा. तोंपर्यंत मी खोलींत निजून रहाणार आहें." कित्येक दिवस समाधि लावून बसण्याची समर्थांस संवय असल्यामुळें त्यांतलाच हा प्रकार असेल असें समजून शिष्यांनीं दार बंद करून कुलूप लावलें. दरम्यान, समर्थ आपल्या योगसामर्थ्यानें, अदृश्यरूपानें खोलींतून बाहेर पडून जांबेस गेले. तेथें राणूबाई वृद्धापकाळामुळें अगदीं मरणोन्मुख स्थितींत होत्या. अंतकाळीं आपल्या नारायणाची भेट व्हावी इतकीच त्यांची शेवटची इच्छा होती व "तूं अंतकाळीं माझें स्मरण कर म्हणजे मी त्या क्षणीं तुझ्यापुढें येऊन उभा राहीन," असें आश्वासनही समर्थांनीं त्यांना मागील भेटीच्या वेळीं देऊन ठेवलें होतें. त्याप्रमाणें, अगदीं अखेरच्या घटकेस समर्थ अकस्मात् तेथें जाऊन दाखल होतांच, राणूबाईंस, त्या तसल्या स्थितींतही, मोठा आनंद झाला व समर्थांच्या पाठीवरून त्यांनीं प्रेमानें हात फिरविला. पुढें श्रीरामरूपीं तदाकार होऊन रामनामोच्चारपूर्वक, राणूबाईंनीं शांतपणानें प्राण सोडला. पुढील विधि संपल्यावर समर्थ, श्रेष्ठांचा निरोप घेऊन पूर्ववत् योगसामर्थ्यानें परळीस येऊन आंगळाईच्या देवालयांत जाऊन बसले. आज्ञेप्रमाणें, शिष्यांनीं सोळाव्या दिवशीं कुलूप काढून खोलीचें दार उघडलें, तों खोलींत समर्थ नाहींत! इतक्यांत, ते आंगळाईच्या देवालयांत असल्याचें त्यांना कोणी सांगितलें, तेव्हां ते तेथें जाऊन पहातात तों समर्थ तेथें बसले असून त्यांनीं क्षौर केलें आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. मग त्यांनीं क्षौर करण्याचें कारण समर्थांस विचारलें, तेव्हां ते म्हणाले, "आमच्या मातोश्री श्रीरामस्वरूपीं लीन झाल्या म्हणून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८८०८ दि:
क्रमांक



आम्ही त्यांच्या शेवटच्या दर्शनास जांबेस गेलो होतों. तेथें चौदा दिवस राहून, त्यांचा श्राद्धादिविधि झाल्यावर परत आलों!"

समर्थांनीं निरनिराळ्या वेळीं श्रेष्ठांस पाठविलेलीं दोन पत्रें व श्रेष्ठांनीं समर्थांस पाठविलेलें एक पत्र, अशीं तीन ओंवीबद्ध पत्रें जुन्या चरित्रांत दिलीं आहेत, त्यांपैकीं श्रेष्ठांनीं पाठविलेलें म्हणून जें पत्र आहे तें विश्वसनीय दिसत नाहीं. समर्थांच्या दोन पत्रांपैकीं एका पत्रांत—

**तूं पवित्रपणें वैश्वानरु । तूं समर्थपणें ईश्वरू ।**
**तूं प्रतापाचा दिनकरु । धगधगायमान ॥**

**तूं सकळ तीर्थांचें यश । तूं उंच आकाश ।**
**तूं मायेचा मूळपुरुष । सकळकर्ता ॥**

**तूं विष्णूचें मूळस्थान । तूं योगियांचें ध्यान ।**
**तूं वेदशास्त्रांचें मथन । सार वेदांताचें ॥**

अशा प्रकारचीं, केवळ ईश्वरासच शोभणारीं विशेषणें वापरलेलीं असल्यामुळें हें पत्र श्रेष्ठांस उद्देशून लिहिलें असेल असें वाटत नाहीं. दुसऱ्या पत्राविषयीं मात्र शंका घेण्याचें कारण नाहीं, म्हणून तें पत्र येथें देतों—

**सकळ तीर्थांचें सार । सत्यस्वरूप निर्विकार ।**
**तुमचें चित्त तदाकार । निरंतर ॥ १ ॥**

**विमळ ब्रह्मपरायण । सगुण भक्तिसंरक्षण ।**
**विशेष वैराग्यलक्षण । तुमचे ठायीं ॥ २ ॥**

**मुक्त क्रियेचा अनादरु । स्वधर्मकर्मीं अत्यादरु ।**
**आग्रह निग्रहाचा विचारु । तोही नसे ॥ ३ ॥**

**नसे कामनेचा लेश । जयंत्या पर्वांचा हव्यास ।**
**अंतरीं आवडे विशेष । हरिकथानिरूपण ॥ ४ ॥**

**तुमचें देह सार्थकाचें । सर्वदा परोपकाराचें ।**
**भगवंतें निर्मिलें बहुतांचें । समाधान ॥ ५ ॥**
**तुमचेचि वाग्विलासें । बहु पाखंड नासे ।**
**संशयातीत प्रकाशे । विमळ वस्तु ॥ ६ ॥**
**सन्मार्गांचा कैंपक्षी । अनमार्ग करणें अलक्षी ।**
**लोक पावती प्रत्यक्ष । समाधान ॥ ७ ॥**
**दक्षता आणि चातुर्यता । वित्पन्नता आणि लीनता ।**
**उत्तम गुण सर्वज्ञता । तुमचे ठायीं ॥ ८ ॥**
**तुमचें स्वरूप वर्णवेना । म्हणोनि देहाची वर्णना ।**
**युक्त अयुक्त मित्रजनां । क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥**

वरील शेवटल्या ओंवींतील '**मित्रजनां क्षमा केली पाहिजे**' हें एकच वाक्य थोडीशी शंका उत्पन्न करणारें आहे. येथें जर 'बंधुजना' असा शब्द असता तर हें पत्र श्रेष्ठांसच लिहिलें आहे असें खात्रीपूर्वक म्हणतां आलें असतें. बाकी, पत्रांतील बराचसा मजकूर श्रेष्ठांसही लागू पडण्यासारखा आहे; विशेषतः '**जयंत्या पर्वांचा हव्यास**' हें वर्णन श्रेष्ठांसच लागू पडतें; कारण श्रेष्ठांनीं आपल्या '**भक्तिरहस्य**' ग्रंथांत व्रतोद्यापनें आणि हरिनाममाहात्म्य यांवरच विशेष भर दिलेला स्पष्ट दिसतो.

श्रेष्ठांनींही कांहीं मुमुक्षुजनांवर अनुग्रह केला होता असें दिसतें. मुंजे उपनांवाच्या त्यांच्या एका शिष्याचा उल्लेख हनुमंतस्वामीकृत समर्थांच्या बखरींत आला आहे. दक्षिणगिर गोसावी या नांवाचे त्यांचे एक शिष्य किंवा प्रशिष्य होते त्यांचा मठ जांबेस आहे.

श्रेष्ठांनीं, शक १५९९ फाल्गुन वद्य १४ या दिवशीं दहीफळ येथें आपला देह ठेविला. त्यांच्या पत्नीनें सहगमनाचा निश्चय करून,

अमावास्येच्या दिवशीं दीर्घ स्वरानें 'राम' असा उच्चार करून देहाचें विसर्जन केलें. दहिफळ येथें गांवाचे बाहेर अर्ध्या कोसावर खंदारे पाटलांच्या शेतांत एक वृंदावन आहे. या वृंदावनास मोगलाईतून ८० रु. वर्षासन आहे. पुजारी पूजा करीत असतात. श्रेष्ठांच्या मृत्यूची बातमी समर्थांस अंतर्ज्ञानानें कळतांच, दुपारीं कल्याण व उद्धव गोसावी वगैरे मंडळीस घेऊन ते पुनः नदीवर स्नानास गेले. हें पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. मग, स्नानाचें कारण शिष्यांनीं विचारतांच समर्थांनीं सांगितलें कीं, "श्रेष्ठ निजधामास गेले, आमचें छत्र नाहींसें झालें!" नंतर समर्थांनीं, उद्धव गोसावी यांस जांबेस पाठविलें. त्यांजबरोबर, श्रेष्ठांच्या उभय चिरंजीवांकरितां पुढील दहा श्लोक दिले होते—

बरें सत्य बोला यथातथ्य चाला ।
बहू मानिती लोक येणें तुम्हांला ॥
धरा बुद्धि पोटीं विवेकें मुलें हो ।
बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥

सदा दांत घांसोनि तोंडा धुवावें ।
कळाहीन तें शूद्रमूर्खीं नसावें ॥
सदा सर्वदा यत्न सोडूं नये रे ।
बहूसाळ हा खेळ कामा नये रे ॥ २ ॥

दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें ।
प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें ॥
गुणश्रेष्ठ ऊपास्य त्यांचें करावें ।
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥

बहू खेळ खोटा सदालस्य खोटा ।
समस्तांसि भांडेल तोची करंटा ॥
बहूतां जनांलागिं जीवीं भजावें ।
भल्यासंगतीं न्याय तेथें भजावें ॥ ४ ॥

हिशोबीं सदा न्याय सांडूं नये रे ।
कदाचीत अन्याय होतां धका रे ॥
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें ।
महासूख तेंही अकस्मात जातें ॥ ५ ॥

प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वायां ।
विवेकेंविणें सर्वही दंभ जाला ॥
बहू सज्जला नेटका साज केला ।
विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ॥ ६ ॥

वरी चांगला अंतरीं गोड नाहीं ।
तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ॥
वरी चांगला अंतरीं गोड आहे ।
तयालागिं कोणीतरी शोधिताहे ॥ ७ ॥

सदा अंतरीं गोड तें सांडवेना ।
कदा अंतरीं वोखटें देखवेना ॥
म्हणूनी बरा गूण आधीं धरावा ।
महाघोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥

भला रे भला बोलती तें करावें ।
बहूतां जनांचें मुखें येश घ्यावें ॥
परी शेवटीं सर्व सोडोनि द्यावें ।
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥

बरा वोखटा सर्व संसार जाला ।
अकस्मात येईल रे काळघाला ॥
म्हणोनी भले संगतीं नित्य चाला ।
जनीं दास तो बोधिताहे मुलांला ॥ १० ॥

शेवटच्या चरणावरून हा उपदेश समर्थांनीं सर्वच मुलांस केलेला दिसतो. मुद्दाम, श्रेष्ठांच्या मुलांसाठीं म्हणून जर हे श्लोक लिहिलेले असते तर त्यांत, त्यांच्या सांत्वनपर मजकूर थोडा तरी असता. असो.

श्रेष्ठ कधीं चाफळास किंवा परळीस गेल्याचा उल्लेख कोठें सांपडत नाहीं. श्रेष्ठ समाधिस्थ झाले त्या वेळीं त्यांचे पुत्र रामजी व शामजी यांचीं वयें अनुक्रमें १६ व १० अशीं होतीं. शक १६०३ मध्यें समर्थांचें निर्याण झाल्यावर, दासनवमीच्या उत्सवासंबंधानें शिष्य-मंडळींत मतभेद झाला, तेव्हां कल्याणस्वामींनीं मध्यस्थी करून भांडण मिटविलें. पुढें, परंपरा चालविण्यासाठीं श्रेष्ठांच्या चिरंजीवांस जांबेहून आणावें असें ठरविलें. परंतु त्यानंतरचा कांहीं काळ महाराष्ट्रांत धामधुमीचा गेल्यामुळें तो विचार लांबणीवर पडला. मध्यंतरीं, आधीं शामजी व नंतर रामजी हे मृत्यु पावले. म्हणून, समर्थशिष्यांनीं, रामजींचे चिरंजीव गंगाधर व शामजी यांस, शक १६३२, श्रावण शुद्ध ५ रोजीं सज्जनगडीं आणिलें.

समर्थांचे ज्येष्ठ बंधु गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ हे जरी प्रापंचिक होते तरी त्यांचा पारमार्थिक अधिकार कमी नव्हता. समर्थांप्रमाणेंच त्यांनींही कथाकीर्तनें व निरूपणें करून आणि ग्रंथ लिहून भागवतधर्माचा प्रसार केला. भक्तिरहस्य व सुगमोपाय हे त्यांचे दोन प्रमुख ग्रंथ असून इतर फुटकळ कविताही बरीच आहे. ही सर्व कविता धुळें येथील 'सत्कार्योत्तेजक' सभेनें प्रसिद्ध केलेली आहे. भक्तिरहस्याचीं

प्रकरणें ७७ असून ओंवीसंख्या ५८१९ आहे. सुगमोपायाचीं १० प्रकरणें असून ओंवीसंख्या ११३९ आहे. भक्तिरहस्य ग्रंथ शक १५९० च्या विजयादशमीस पूर्ण झाला. सुगमोपायाचा रचनाकाल ग्रंथांत दिलेला नाहीं. श्रेष्ठांची भाषा शुद्ध असून तींत संस्कृत शब्दांचा भरणा बराच मोठा आहे. भगवन्नाममाहात्म्यावर त्यांनीं विशेष भर दिला आहे. आपले ग्रंथ लिहितांना त्यांनीं भारत, भागवत, रामायण, गौतमस्मृति, अत्रिस्मृति, मन्वादि अष्टादश स्मृतिकारांच्या स्मृति, शारीरभाष्य, ब्रह्मपुराण, ब्रह्मांडपुराण, स्कंद-पुराण, गरुडपुराण, नारदपुराण, गुरुगीता इत्यादि ग्रंथांचा उपयोग केल्याचा उल्लेख स्वतः त्यांनींच केला आहे.

श्रेष्ठांनीं 'रामी रामदास' या नांवानेंही स्वतःचा उल्लेख आपल्या कवितेंत केला आहे व समर्थांनींही तेंच नांव आपल्या फुटकळ कवितेंत बऱ्याच ठिकाणीं उपयोजिलें आहे, त्यामुळें कोणतें पद्य श्रेष्ठांचें व कोणतें समर्थांचें हें नेमकें ओळखून काढणें जरा कठिणच झालें आहे.

१

# समर्थांचा शिष्यवर्ग

समर्थांनीं देशाच्या निरनिराळ्या भागांत मठस्थापना करून त्या मठांवर आपल्या शिष्यांची योजना केली, यांत त्यांचा मुख्य उद्देश धर्मजागृति व गौण उद्देश राजकारण हा होता. ही मठस्थापना त्यांनीं कोणत्या कालांत केली हें नक्की समजण्यास जरी कांहीं साधन नाहीं तरी, तीर्थयात्रा पुरी करून ते जेव्हां कृष्णातीरीं येऊन स्थायिक झाले त्यानंतरच मठस्थापनेचा हा प्रचंड उद्योग त्यांनीं केला असावा असें वाटतें. कारण, प्रवासांत असतांना त्यांनीं कोणास शिष्य केल्याचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. उलट, लोकांस आपली ओळख होऊं न देतां शक्य तेवढ्या अलिप्तपणानेंच हीं तीर्थयात्रेचीं बारा वर्षें त्यांनीं घालविलीं. आपण ज्या प्रांतांत रहातों त्या प्रांतांतच फार तर धर्मजागृतीचें कार्य आपणास करितां येईल, परंतु हिंदुस्थान देश इतका विस्तृत आहे कीं, त्याच्या सर्व भागांत आपला संदेश जाऊन पोंचणें शक्य नाहीं, म्हणून त्यासाठीं आपल्या

संप्रदायाचीं केंद्रस्थानें ठिकठिकाणीं स्थापन करून व तेथें आपल्या तालभींत तयार झालेल्या अधिकारसंपन्न शिष्यांची योजना करून त्या त्या प्रदेशाचें धार्मिक आक्रमण केलें पाहिजे असें समर्थांनीं ठरविलें, व त्याप्रमाणें त्यांनीं आपली ही मठस्थापनेची कल्पना अमलांत आणली. " **महंतें महंत करावे । युक्तिबुद्धिनें भरावे । जाणते करूनि विखरावे । नाना देशीं** " या आपल्या ओंवींत समर्थांनीं महंताचें कर्तव्य सांगितलें असून, महंतानें जे महंत तयार करून नेमावयाचे ते 'युक्तीनें' आणि 'बुद्धीनें' नेमले पाहिजेत, कसे तरी नेमून चालणार नाहीं, हें मुद्दाम स्पष्ट केलें आहे. 'युक्ति' ह्या शब्दाचा राजकारणाशीं फार निकट संबंध आहे हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

समर्थांनीं आपल्या हयातींत एकंदर किती मठ स्थापले याचा नक्की आंकडा कोणत्याही जुन्या चरित्रकारानें दिलेला नाहीं. आतांपर्यंत, संशोधकांच्या प्रयत्नानें सुमारें ६०।७० मठांचा शोध लागला आहे. ' मुसलमानी राज्यांत महत्त्वाच्या ठिकाणीं ' समर्थांनीं मठ स्थापन केले होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. धुळें येथील संशोधक रामदासी श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं प्रसिद्ध केलेल्या माहितीच्या आधारानें, समर्थांनीं स्थापलेले हे मठ कोठें कोठें होते व त्यांवर कोणकोणत्या महंतांची नेमणूक करण्यांत आली होती हें येथें थोडक्यांत सांगतों.

( १ ) जांब ( २ ) चाफळ व ३ परळी ( सज्जनगड ) या मठांचे महंत स्वतः समर्थच होते ( ४ ) टाकळी मठ—उद्धव गोसावी ( ५ ) तंजावर—भीमस्वामी ( ६ ) शिरगांव—दत्तात्रयस्वामी ( ७ ) इंदूर बोधन—उद्धव गोसावी ( ८ ) कण्हेरी—वासुदेवस्वामी ( ९ ) भालगांव—त्रिंबकराज ( १० ) डोमगांव—कल्याणस्वामी ( ११ ) नीलंगें—अणणाप्पा ( १२ ) तीसगांव—दिनकरस्वामी

( १३ ) कारंजें–बालकराम ( १४ ) शिरवळ–बाजी ( १५ ) मनपाडळें–जयराम गोसावी ( १६ ) कारंजें–प्रल्हाद ( १७ ) दादेगांव–देवदास ( १८ ) तेलंगण–शिवराम ( १९ ) शिरवळ–नारायण ( २० ) धोंडाई गवराई–मुसळराम ( २१ ) पारगांव–शंकर गोसावी. ( २२ ) मन्यार गुडी–अनंतस्वामी. ( २३ ) मिरज–वेणाबाई ( २४ ) राशिवडें व ( २५ ) वाळवें–अंबिकाबाई. वरील यादीवरून असें दिसतें कीं, क्वचित एकाच गांवांत दोन मठ स्थापून त्यांवर निरनिराळ्या दोन महंतांची योजना करण्यांत आली होती, तर निरनिराळ्या दोन ठिकाणच्या मठांवर एकच महंत नेमण्यांत आला होता. वरील यादींतील मठांशिवाय आणखी सुमारें ३० मठ व मठपति यांचीं नांवें सांपडतात. ह्यांतील कांहीं मठ महाराष्ट्रांत व इतर बहुतेक मठ महाराष्ट्राबाहेर होते. प्रयाग, काशी, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, रामेश्वर, उज्जनी वगैरे ठिकाणीं-देखील समर्थांचे मठ होते व या मठांवरील मठपतींच्या यादींत वेणीमाधव, जयकृष्ण, ब्रह्मदास, कोदंडराम, दयाळ वगैरे महाराष्ट्रीय न दिसणारीं नांवें आढळतात. या मठपतींशिवाय समर्थांचे आणखी शेकडों शिष्य ठिकठिकाणीं होते व त्यांपैकीं अनंतकवि, रघुनाथपंडित, यांच्यासारखे कांहीं शिष्य चांगले नामांकित कवि होते. ज्या दिवा-कर गोसाव्यांचा उल्लेख मागें आला आहे ते नेहमीं समर्थांपाशींच असत. दत्तू न्हावी याचेंही नांव समर्थशिष्यांत प्रसिद्ध आहे. शिवाय तत्कालीन सरकारी अधिकारीही त्यांच्या शिष्यवर्गांत होते. जेथें खुद्द छत्रपति शिवाजीमहाराजच समर्थांचे शिष्य होते तेथें महाराजांच्या मंत्रिमंडळांतील गृहस्थांनीं व इतर अधिकाऱ्यांनींही त्याचें शिष्यत्व पतकरावें यांत आश्चर्य नाहीं. श्री. शंकरराव देव लिहितात, " आर्यावर्तांत त्या वेळीं असें एकही क्षेत्र नव्हतें कीं

जेथें एकाद् दुसरा समर्थांचा शिष्य नव्हता. कोणत्याही निमित्तानें अनेक लोक एकत्र जमण्याचीं जीं ठिकाणें त्या वेळीं होतीं त्या प्रत्येक ठिकाणीं समर्थांचा शिष्य असे. हे महंत प्रथम कांहीं काळ श्रीसमर्थांच्या सान्निध्यांत घालवीत, संप्रदायाचीं रहस्यें त्यांच्यापासून समजावून घेत, त्यांचे ग्रंथ उतरून घेऊन त्यांचीं भक्तिभावानें पारायणें करीत, त्यांतील गूढ तत्त्वांचा स्वतः अनुभव घेत, गुरुप्रचीति, शास्त्रप्रचीति व आत्मप्रचीति यांची एकवाक्यता करीत व स्वतःच्या देहाला विसरून जात, आत्मनिवेदन करीत, आणि मग

**‘ आतां होणार तें होयेना कां ।**
**आणि जाणार तें जायेना कां ।**
**तुटली मनांतील आशंका ।**
**जन्ममृत्याची ’ ॥**

अशा निःशंक वृत्तीनें जगदुद्धाराचें अवघड काम, पण सहज, लीलेनें, सद्गुरुप्रतापाविषयीं असलेल्या अढळ निष्ठेनें करण्यास समर्थांच्या आज्ञेप्रमाणें अखिल भरतखंडभर किंवा विशिष्ट प्रांतांत संचार करण्यास बाहेर पडत ”

समर्थांपाशीं पैसा नव्हता किंवा राजाधिकार नव्हता, असें असतां हे शेंकडों–किंबहुना हजारों–सुविद्य लोक त्यांच्या भोंवतालीं कां गोळा झाले, त्यांची कडक शिस्त त्यांनीं निमूटपणें कां पाळली, त्यांनीं पाठविलें त्या ठिकाणीं ते बिनतक्रार कां गेले इत्यादि प्रश्नांचा जो कोणी सूक्ष्म विचार करील त्याला शेवटीं, पानगे खाऊन रहाणाऱ्या आणि पिसाटाप्रमाणें रानावनांतून भटकणाऱ्या या व्यक्तीच्या ठिकाणीं तशीच कांहींतरी मोठी आकर्षणशक्ति, कोणतें तरी मोठें अचाट सामर्थ्य, असलेंच पाहिजे हें कबूल करावेंच लागेल अशी माझी खात्री आहे.

शिष्यांप्रमाणेंच समर्थांच्या शिष्यिणीही पुष्कळ होत्या. सतीबाई, अक्का, वेणाबाई, अंबिका, द्वारकाबाई, नवाबाई, मनाबाई, अपाबाई, अन्नपूर्णाबाई, सखाबाई, गंगाबाई, गोदाबाई, अंताबाई, कृष्णाबाई इतक्या शिष्यिणींचीं नांवें श्री. देव यांनीं दिलीं आहेत.

आतां या शिष्यशिष्यिणींपैकीं प्रमुखांची माहिती येथें थोडक्यांत देतों—

**उद्धव**—समर्थ टाकळी येथें पुरश्चरण करीत असतां तेथें सहगमन करावयास निघालेल्या बाईला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देऊन तिच्या पतीला त्यानीं जिवंत केलें ही हकीकत मागें आलीच आहे. त्या दांपत्याचा पहिला पुत्र उद्धव. तो त्यांनीं समर्थांस अर्पण केला. समर्थांचा पहिला शिष्यही उद्धवच होय. त्यानें बरींच वर्षें समर्थांच्या सहवासांत घालविल्यावर समर्थांनीं त्याची योजना टाकळी मठांत केली. पुढें गोदावरीच्या पश्चिमेस इंदूरबोधन येथें मठस्थापना करण्यांत आली व त्याही मठाचें आधिपत्य उद्धवस्वामीलाच देण्यांत आलें. हा मठ ज्या ठिकाणीं आहे ती जागा फार रम्य व शांत असून अद्याप तेथें व्याघ्रादिकांची वस्ती आहे. या मठपतींची परंपरा ब्रह्मचाऱ्यांची असून, हल्लींचे मठपति हे उद्धवस्वामीपासून ११ वे पुरुष होत. टाकळी मठांत आतांपर्यंत एकंदर ८ मठपति झाले. उद्धवस्वामी टाकळी येथें समाधिस्थ झाले व तेथें त्यांची समाधि आहे. उद्धवांनीं समर्थांचें चरित्र लिहिलें असल्याचा उल्लेख जुन्या ग्रंथांत आढळतो, परंतु दुर्दैवानें तें चरित्र उपलब्ध नाहीं.

**कल्याण**—समर्थांचे पट्टशिष्य. शक १५६६ च्या सुमारास समर्थांची व यांची गांठ पडली व तेव्हांपासून सतत ३२ वर्षें ते समर्थांपाशीं होते. शक १६०० मध्यें डोमगांव येथें मठ स्थापून तेथें रहाण्याची

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों दि: ...

समर्थांनीं त्यांस आज्ञा केली. तेथें ३६ वर्षें वास्तव्य करून त्यांनीं संप्रदाय वाढविला. डोमगांवीं असतांना नजीकच्या सीना नदीचे कांठीं एका कड्यावर कल्याणस्वामी रहात असत. वर्षांतून चार महिने डोमगांवीं, चार महिने परंड्यास व चार महिने डोणज येथें देवीचे देवळांत रहात असत. समर्थांची जी कविता धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केली आहे ती बहुतेक या मठांत मिळाली. सदर सभेनें प्रसिद्ध केलेल्या दासबोधाची कल्याण–लिखित प्रतही याच मठांत आहे. कल्याणस्वामींना समर्थांनीं घालून दिलेला कित्ताही तेथें आहे. कल्याणस्वामी परंडा येथें समाधिस्थ झाल्यावर त्यांचा देह वाजतगाजत डोमगांवीं नेऊन तेथें त्याचें दहन केलें. त्यानंतर ५९ वर्षांनीं म्हणजे शक १६९५ त त्या जागीं समाधि-मंदिर उभारण्यांत आलें. डोमगांव मठास कांहीं नियमित वार्षिक उत्पन्न आहे. कल्याणस्वामीच्या ४२ महंतांचीं, व कल्याणस्वामीच्या नंतरचे मठपति मुद्गलस्वामी यांच्या १४ महंतांचीं नांवें श्री. देव यांस सांपडलीं तीं त्यांनीं 'श्रीसमर्थांची कविता, प्रथम खंड' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत दिलीं आहेत. कल्याणस्वामींचीं कांहीं पद्यें उपलब्ध आहेत. यानींही समर्थ–चरित्र लिहिलें असल्याचा उल्लेख जुन्या ग्रंथांत आहे.

**भीमस्वामी**—हे सातारा जिल्ह्यांत मसूरपासून एक मैलावर शहापूर गांव आहे, तेथील रहिवासी. यांनीं शक १५६७ त समर्थांचा अनुग्रह घेतला. पुढें, समर्थ तंजावरास गेले असतां, शिवाजी महाराजांचे बंधु व्यंकोजी राजे यांनीं त्यांस तेथेंच रहाण्याचा आग्रह केला. तेव्हां समर्थांनीं तेथें मठ स्थापून त्यावर भीमस्वामीची योजना केली. या मठांत भीमस्वामीच्या हातचा दासबोध आहे. भीमस्वामीनीं लिहिलेलें संक्षिप्त समर्थचरित्र प्रसिद्ध झालें आहे. प्रत्यक्ष समर्थशिष्यानें लिहिलेलें असें त्यांचें हें एकच चरित्र उपलब्ध आहे. भीमस्वामीची समाधि मठापासून दोन मैलांवर आहे.

**दत्तात्रयस्वामी**—हे कल्याणस्वामींचे कनिष्ठ बंधु, शिरगांव मठाधिपति. हें शिरगांव कऱ्हाड तालुक्यांत असून चाफळपासून जवळच आहे. कल्याण, दत्तात्रय व त्यांची आई यांची व समर्थांची भेट पहिल्यानें कोल्हापुर येथें झाली. नंतर शिरगांव येथें मठ बांधून समर्थांनीं दत्तात्रय व त्याची आई या दोघांस तेथें ठेविलें व कल्याणास बरोबर घेतलें. चाफळ येथील रामनवमीच्या उत्सवांतील लळिताचें काम दत्तात्रयस्वामींकडे होतें. स्वतः समर्थ शिरगांव मठांत कांहीं दिवस राहिले होते. कल्याणस्वामी शेवटपर्यंत ब्रह्मचारी राहिले व दत्तात्रयस्वामींनीं गृहस्थाश्रम केला. या मठास उत्पन्न चांगलें आहे. दत्तात्रयस्वामींची समाधीही तेथेंच आहे. या मठपरंपरेंतले सातवे मठपति हल्लीं विद्यमान आहेत. दत्तात्रयस्वामींचे नातू यशवंतस्वामी यांची कांहीं कविता असून त्यांचे पुत्र भीमस्वामी यांनीं भक्तलीलामृत नामक अभंगबद्ध ग्रंथ लिहिला आहे. भीमस्वामींचे बंधु लक्ष्मणस्वामी यांचे शिष्य लक्ष्मणमहाराज यांनीं बडोदें येथें मठ स्थापन केला. त्यांचे शिष्य रघुनाथ महाराज यांची कांहीं कविता उपलब्ध आहे. सातवे पुरुष परशुराम यांनीं ग्वाल्हेर येथें मठ स्थापन केला, त्यास शिंदे सरकाराकडून पांच हजार रुपयांची नक्त नेमणूक चालू आहे.

**दिनकरस्वामी**—तिसगांव मठपति-मूळ वसतिस्थान भिंगार-यांचा ' स्वानुभवदिनकर ' हा ओंवीबद्ध ग्रंथ छापलेला आहे. यांचें मूळ उपनांव मुळे, पुढें ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनामुळें त्यांना 'पाठक' म्हणूं लागले. दिनकरांच्या वडिलांचें नांव नरहर पाठक, व आईचें नांव द्वारकाबाई. कागदोपत्रीं दिनकरांचें नांव ' बहिणाजी ' असें आढळतें. हे गृहस्थाश्रमी असून मोठे परोपकारी होते. बायका दोन. एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं. शक १५७४ त दिनकर हे घरदार सोडून भिंगारपासून १४ कोसांवर

वृद्धेश्वर नामक सुंदर शिवस्थान आहे तेथें गेले. तेथें ते तपश्चर्या करीत असतां शक १५७५ त समर्थांनीं त्यांस स्वप्नांत दर्शन दिलें व पुढें शक १५७६ सालीं वृद्धेश्वर येथें समर्थांचा त्यांस अनुग्रह झाला. पुढें तेथून तीन कोसांवर तिसगांव येथें दिनकर हे मठस्थापना करून राहिले. तेथें त्यांनीं बरीच ग्रंथरचना केली व संप्रदायही वाढविला. यांची कविता श्रेष्ठ दर्जाची असून तींत त्यांची विद्वत्ता व अनुभव हीं दिसून येतात. त्यांचे पुत्र रामचंद्र यांनींही 'श्रीसीतारामसंवाद' या नांवाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. समर्थांचे शिष्यही समर्थांप्रमाणेंच राजकारणी होते याला पुरावा दिनकरांच्या पुढील ओंवींत सांपडतो—

**'कार्य करूनि अतिसावध ।**
**राजकारणीं असोनि विविध ।**
**सावडेपणीं अतिसावध ।**
**वेष भाविक बावळा ॥**

शक १६१८ पर्यंत दिनकरांचें नांव कागदोपत्रीं आढळतें, पुढें त्यांचे पुत्र रामचंद्र यांच्याच नांवाचा उल्लेख सर्वत्र आला आहे, यावरून शक १६१८ च्या सुमारास दिनकरस्वामी समाधिस्थ झाले असावेत असें वाटतें. यांची फुटकळ कविताही सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केली आहे.

**वासुदेवस्वामी**—कण्हेरी मठपति. हा मठ सातारा जिल्ह्यांत वांई तालुक्यांत कण्हेरी गांवीं आहे. वासुदेवस्वामींचें मूळचें नांव सदाशिवशास्त्री येवलेकर असें होतें. हे मोठे संस्कृत पंडित असून ज्याला त्याला वादाचें आव्हान देत फिरत असतां समर्थांनीं एका मोळीविक्याकडून वादांत त्यांचा पराभव केला. नंतर त्यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला. समर्थांनीं त्यांचें नांव 'वासुदेव पंडित' ठेविलें. पुढें हे कण्हेरी येथें मठ स्थापून राहिले. या मठास शक

१५९३ मध्यें शिवाजीमहाराजांनीं एक सनद दिली आहे. यांना 'समर्थांची दुसरी प्रतिमा' असें म्हणत असत व शिवाजी महाराजही समर्थांच्या खालोखाल यांना मान देत असत.

**देवदास**—दादेगांव मठ. अहमदनगर जिल्ह्यांत नगरच्या पूर्वेस १४ कोस. मठपरंपरा ब्रह्मचाऱ्यांची. देवदासांची बरीच कविता उपलब्ध आहे. हल्लीं सहावे पुरुष नारायणबुवा हे विद्यमान आहेत. मुसलमानाच्या हिंसकवृत्तीबद्दल देवदासांनीं एके ठिकाणीं त्यांजवर कोरडे ओढले आहेत.

**त्रिंबकराज**—भालगांव मठ. हा मठ मोगलाईत सुकना नदीच्या कांठीं आहे. तेथून एक कोसावर एक लहानसा डोंगर आहे त्यावर त्रिंबकराज यांची समाधि आहे. यांची कांहीं कविता उपलब्ध आहे.

**बालकराम**—कारंजें मठ. वऱ्हाडांत. बालकराम यांनीं रचिलेलीं सुमारें २० आख्यानें व इतर फुटकळ कविता उपलब्ध आहे. हे यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण. उपनांव कळवे.

यांशिवाय, प्रल्हाद, मुसळराम, अण्णाप्पा वगैरे समर्थशिष्यांची थोडीबहुत माहिती उपलब्ध आहे पण विस्तारभयास्तव ती येथें देतां येत नाहीं. समर्थांच्या शिष्यिणीही पुष्कळ होत्या, त्यांत वेणाबाई व अक्का ह्या विशेष प्रसिद्ध आहेत.

**अक्का**—यांचें नांव चिमणाबाई, पण पुढें त्यांना 'अक्का' हेंच नांव पडलें. कऱ्हाड येथील रुद्राजीपंत देशपांडे यांच्या या कन्या. समर्थ समाधिस्थ झाल्यावर सज्जनगड मठाची व्यवस्था यांनीं ३७ वर्षें चालविली. यांची समाधि सज्जनगडावर आहे.

**वेणाबाई**—मिरज मठ. वेणाबाई या उत्तम कवयित्री होत्या. समर्थांच्या सर्व शिष्यिणींत यांनाच फक्त कीर्तन करण्याचा अधिकार होता. यांचें जन्मस्थान कोल्हापुर. त्यांच्या वडिलांचें

नांव गोपजी देशपांडे. ते समर्थांचे शिष्य होते. वेणाबाई बालविधवा होत्या. त्यांचें सासर मिरज येथें होतें. त्यांना त्यांच्या वडिलांनीं लिहिण्यावाचण्याचें शिक्षण दिलें होतें. पुढें वेणाबाईनीं समर्थांचा अनुग्रह घेतला. त्यांनीं रचिलेला ओंवीबद्ध सीतास्वयंवर ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला असून तो फार रसभरित आहे.

रामदासी संप्रदायाचा विस्तार जसा मोठा तसे त्यांत कवीही पुष्कळ. वेणाबाईंचे शिष्य गिरिधर यांची कविता तर अफाटच आहे. ' समर्थप्रताप ' या नांवांचें समर्थचरित्र त्यांनीं लिहिलें आहे. दुसऱ्या एका मेरू नामक रामदासी कवीनें ' रामसोहळा ' या नांवाचा मोठा ग्रंथ लिहिला आहे. रघुनाथ पंडित व अनंतकवि यांचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. हरिबुवा भोंडवे या नांवाचे एक शिंपी जातीचे रामदासी संतकवि होऊन गेले त्यांची ग्रंथरचना अफाट आहे. याशिवाय, अनेक सांप्रदायी पुरुषांनीं समर्थांचीं लहानमोठीं चरित्रें लिहिलीं आहेत. गेल्या शतकांत होऊन गेलेले प्रसिद्ध वेदांती हंसराजस्वामी व ' भक्तमंजरीमाला ' कर्ते राजाराम प्रासादी हे रामदासीच होते.

कोंकण प्रांतांतही रामदासी संप्रदायाचा प्रसार झाला होता. सावंतवाडी संस्थानांतील पाट, मांडकुली, कोचरें वगैरे गांवीं या संप्रदायाची परंपरा अद्याप चालू आहे.

१०

# समर्थांची कविता

मठस्थापना, राजकारण, कथाकीर्तन, संप्रदायाची वाढ इत्यादि अनेक व्याप सांभाळून समर्थांनीं जी प्रचंड ग्रंथरचना केली आहे ती पाहिली म्हणजे या महापुरुषाच्या उद्योगशीलतेचें मोठें कौतुक वाटतें. त्यांनीं लिहिलेली बहुतेक सर्व कविता आतां उपलब्ध झालेली असून तिचे दोन भाग धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केले आहेत व तिसरा भाग अद्याप प्रसिद्ध व्हावयाचा आहे. तो झाला म्हणजे सुमारें १५०० पृष्ठांत समर्थांची समग्र कविता समाविष्ट झाल्यासारखें होईल. समर्थशिष्य अनंतकवि यांनीं समर्थांच्या कवितेस समुद्राची उपमा दिली आहे ती सार्थ आहे यांत संशय नाहीं. या कवितासमुद्रांत अध्यात्मज्ञान, प्रपंचोपदेश, राजकारण, कृषिविद्या, वास्तुविद्या, लेखनकला, पाकशास्त्र, मनोबोध, बालबोध वगैरे अनेक रत्नें विखुरलेलीं असून, या समुद्राची गर्जनाही एवढी भयंकर आहे कीं, ती ऐकून तत्कालीन महाराष्ट्रीय चांगलेच

खडबडून जागे झाले असतील यांत संशय नाहीं. समर्थांच्या कवितेंत दैववादास जागा नाहीं, निराशेस ठाव नाहीं आणि आलस्यास वाव नाहीं. शक्ति, युक्ति, प्रयत्न, उद्योग, पराक्रम, यांचेंच महत्त्व समर्थांनीं आपल्या जोरदार व परिणामकारक वाणीनें पुनः पुनः वर्णिलें आहे. त्यांची वृत्तीच पारमार्थिक असल्यामुळें व भगवत्प्राप्ति हेंच मनुष्यप्राण्याचें अंतिम ध्येय असें त्यांचें ठाम मत असल्यामुळें आपल्या कवितेंत त्यांनीं परमार्थावरच विशेष भर दिलेला असला तरी प्रपंचाकडे सर्वस्वी दुर्लक्ष करावें असा एकदेशीय उपदेश त्यांनीं कोठेंही केलेला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. समर्थांचें लिखाण पद्यात्मक आहे म्हणूनच त्याला कविता म्हणावयाचें, नाहीं तर, वस्तुतः तें गद्यच आहे. काव्याच्या व्याख्येची कसोटी समर्थांच्या कवितेस कोणी लावूंच नये असें मला वाटतें. कारण, काव्यासाठीं काव्य लिहिण्याचा समर्थांचा उद्देशच नव्हता. आपल्या गुणदोषांचा पाढा भगवंतापुढें वाचून त्याची मुक्तकंठानें करुणा भाकावी, त्याच्या भेटीविषयीं आपण किती उत्कंठित झालों आहों हें त्याला पुनः पुनः आळवून सांगावें, त्याच्या कृपेबद्दल स्वतःस वाटणारी कृतज्ञता गहिंवरलेल्या कंठानें बोलून दाखवावी, भगवन्नामस्मरणाच्या सामर्थ्याचा स्वतःस आलेला अनुभव लोकांच्या गळीं उतरवून देण्यासाठीं नामस्मरण आणि उपासना यांचें माहात्म्य वर्णन करावें, प्रापंचिकांना प्रापंचिक गोष्टींचा उपदेश करावा, राजकारण करणारांना राजकारणाचे धडे द्यावे इत्यादिकांसाठींच समर्थांनीं आपली ग्रंथरचना केलेली असल्यामुळें निव्वळ काव्य असें त्यांच्या कवितेंत फारसें सांपडणार नाहीं; तथापि स्थलविशेषीं व प्रसंगविशेषीं करुण, शांति, रौद्र, भयानक, वीर वगैरे रसांचा परिपोष त्यांच्या कवितेंत झालेला दृष्टीस पडतो. शृंगाररसावर

मात्र त्यांनीं पूर्ण बहिष्कार घातला आहे, इतकेंच नव्हे तर कीर्तनादिकांत स्त्रियांचा शृंगार बिलकूल वर्णू नये असा निर्बंधच घालून ठेवला आहे. म्हणून मनास गुदगुल्या करणाऱ्या शृंगारिक गोष्टी समर्थांच्या कवितेंत आपणास वाचावयास मिळतील अशा अपेक्षेनें जर कोणी त्यांची कविता वाचूं लागेल तर त्याची मात्र निराशा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. समर्थांची भाषा बरीच खडबडीत आणि कवितारचनाही प्रायः ओबडधोबडच आहे, परंतु त्यांच्या वाणींत असें एक दैवी तेज आहे कीं, त्याच्यापुढें असले दोष कोठल्या कोठेंच गडप होऊन जातात. तत्कालीन खेडवळ देशस्थ ब्राह्मणांची जी बोलण्याची भाषा तिचाच उपयोग समर्थांनीं आपल्या ग्रंथांत केलेला असल्यामुळें शब्दांचीं अशुद्ध रूपें तींत बरींच आढळतात व वृत्तसुखार्थ, ऱ्हस्वाचें दीर्घ आणि दीर्घाचें ऱ्हस्व, पुष्कळच ठिकाणीं करावें लागलें असल्यामुळें, नीटनेटके-पणाच्या दृष्टीनें पहाणारास बरीच ओढाताण झालेली दिसते. तथापि एकंदरींत ही कविता फार प्रासादिक, तेजस्वी, अधिकारवती व अत्यंत परिणामकारक आहे; व म्हणूनच कै. न्या. रानडे हे या समर्थवाणीस ' जीवंत वाणी ' असें म्हणत असत.

समर्थांचे मुख्य व विशेष प्रसिद्ध ग्रंथ म्हटले म्हणजे १ दासबोध २ मनोबोध ऊर्फ मनाचे श्लोक ३ जुना दासबोध आणि ४ करुणाष्टकें हे होत. यांशिवाय, आत्माराम, सुंदरकांड व युद्धकांड रामायण, षड्रिपुप्रकरण, ओंव्या शतकें १४, स्फुट ओंव्या ( ३२८ अभंग ) पंचीकरणयोग, चतुर्थमान, मानपंचक, पंचमान, स्फुट प्रकरणें, स्फुट श्लोक, पंचकें, राममंत्राचे श्लोक, भीमरूपी स्तोत्रें, पंचसमासी, स्फुट अभंग व पदें वगैरे कविता पुष्कळच आहे. समर्थांची कांहीं हिंदी कविताही उपलब्ध आहे.

 'अधिकार तैसा करूं उपदेश। साहे ओझें त्यास तेंचि द्यावें' असें

जें स्वतःच्या कवितेसंबंधानें तुकोबांनीं म्हटलें आहे तें तितक्याच तंतोतंतपणानें समर्थांच्याही कवितेस लागू पडतें. मांगणीजोगणीची पूजा करण्याचेही कुलधर्म पाळावे असें एके ठिकाणीं उपदेशिणारे समर्थ '**कर्ता एक देव तेणें केलें सर्व**' आणि '**जगीं थोरला देव तो चोरिलासे**' असें दुसऱ्या ठिकाणीं सांगतात; '**जेथें ज्या तीर्थासि जावें। तेथें त्या देवाचें दर्शन घ्यावें**' असें एके ठिकाणीं सांगून, '**जगीं वावरे जो अणू रेणु कांहीं। रिता ठाव या राघवावीण नाहीं**' असें दुसऱ्या ठिकाणीं प्रतिपादितात, तेव्हां हें काय गौडबंगाल आहे? असा प्रश्न सहजच कोणीही विचारील. तर या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, ज्याचा जसा अधिकार तसा त्याला समर्थांनीं उपदेश केला आहे. कोणत्याच प्रकारची उपासना नसण्यापेक्षां मांगीण आणि जोगीण यांची पूजा केलेली पतकरली. भगवत्प्राप्तीच्या आड येणाऱ्या प्रियजनांचा त्याग करावा असा उपदेश त्यांनीं मुमुक्षूंस केला असला तरी '**आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थविवेका**' असा स्पष्ट इशारा प्रापंचिकांस देऊन ठेवला आहे. क्षत्रियांना घोर रणकंदन करून शत्रूचा निःपात करण्याचा, ब्राह्मणांना आपलें ब्राह्मण्य सांभाळण्याचा आणि मुलांना विद्याभ्यास करण्याचा उपदेश समर्थांनीं केला आहे. ब्राह्मण आपल्या धर्मापासून चेवले आणि म्हणून समाजांत त्यांची किंमत कमी झाली याबद्दल समर्थांनीं फार दुःखाचे उद्गार काढले आहेत. ब्राह्मणांनीं द्रव्य मिळवून चैन करावी हें त्यांना पसंत नव्हतें; '**ब्राह्मणांची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा। ॐ भवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे**' असा जो भिक्षांदेहीचा उपदेश ब्राह्मणांस त्यांनीं केला आहे त्याचा उद्देश, निर्वाहापुरतेंच अन्नाच्छादन मिळवून, धनसंचयाच्या नादीं न लागतां, ब्राह्मणांनीं आपली उच्च संस्कृति आणि वर्णगुरुत्व हीं कायम ठेवावीं, हा आहे.

समर्थांचा दासबोध म्हणजे एक लहानसा ज्ञानकोशच आहे. अध्यात्मनिरूपण हाच या ग्रंथाचा मुख्य विषय, परंतु तदनुषंगानें व प्रसंगानुरोधानें दुसरे अनेक महत्त्वाचे विषय यांत येऊन गेले आहेत. '**मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण। तिसरें सावधपण। सर्व विषयीं**' ही ओंवी दासबोधाची सारभूत म्हणतां येईल. आरंभींच्या कांहीं समासांत दुर्लभ नरदेहाचें माहात्म्य वर्णन केल्यावर, प्रपंचांतील त्रिविध तापांचें असें भयानक चित्र समर्थांनीं उभें केलें आहे कीं, त्याच्या दर्शनानें तरुण प्रपंचोन्मुख मनुष्याचें धाबेंच धडाडून जाईल! समर्थांचें अवलोकन इतकें सूक्ष्म होतें कीं, अगदीं बारीकसारीक गोष्टीदेखील त्यांच्या नजरेंतून सुटलेल्या नाहींत. कीर्तनास जे श्रोते येतात त्या सर्वांचा उद्देश एकच नसतो, कोणी खरोखरच श्रद्धेनें कीर्तन ऐकण्यास येतात, कोणी स्त्रियांचीं तोंडें पहाण्यास येतात आणि दुसरे कोणी लोकांच्या पादरक्षा लांबविण्यास येतात, असें एके ठिकाणीं त्यांनीं म्हटलें आहे. पुढील ओंवी पहा—

**विषयी लोक कीर्तनासि येती। ते नायकांकडेच पाहती।**
**दुसरे कोणी चोरटे येतीं। ते चोरून नेती पादरक्षा॥**

दासबोधांतल्या पुष्कळ ओंव्या सुभाषितरूप असल्यामुळें कांहीं अर्वाचीन लेखक आपल्या लेखाच्या शिरोभागीं त्या उद्धृत करीत असतात.

'**धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।**
**मागें जाले पुढें होणार। देणें ईश्वराचें,**'

'**सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें।**
**परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे,**'

'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा।
ये विषयीं न करितां तकवा। पूर्वज हांसती,'

'आपुली आपण करी स्तुति। तो एक मूर्ख,'

इत्यादि शेंकडो ओंव्या महाराष्ट्रांत लोकांच्या तोंडीं आहेत. तरीपण समर्थांची शिकवण थोडक्यांत सांगावयाची, तर ती सुगुणोपासना हीच होय. निर्गुणोपासना त्यांना अप्रिय होती अशांतला प्रकार नाहीं, परंतु भक्तीशिवाय ज्ञान हें करंटें आहे असें त्यांचें मत होतें. श्रीरामोपासनेचें महत्त्व त्यांनीं पुढील ओंव्यांत वर्णिलें आहे—

मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि नासून जातें।
कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते॥

रघुनाथभजनें ज्ञान जालें। रघुनाथभजनें महत्त्व वाढलें।
म्हणोनियां तुवां केलें। पाहिजे आधीं॥

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें। तें तत्काळचि सिद्धी पावे।
कर्ता राम हें असावें। अभ्यंतरीं॥

आणि ''आधीं केलें मग सांगितलें' हा तर समर्थांचा बाणा आहे. सर्वसामान्य लोकांस समर्थांनीं जो उपदेश केला आहे, त्यांतील फक्त दहा ओंव्या येथें देतों—

प्रपंचीं जो सावधान। तोच परमार्थ करील जाण।
प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थीं खोटा॥

बहुत जन्माचा शेवट। नरदेह सांपडे अवचट।
येथें वर्तावें चोखट। नीतिन्यायें॥

ऐक सदैवपणाचें लक्षण। वायां जावों नेदी क्षण।
प्रपंचव्यवसायाचें ज्ञान। बरें पहा॥

मराठा ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: वि:



कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।
केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥

सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।
जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥

प्रयत्नेंवीण कार्य जालें । जेविल्याविण पोट भरलें ।
ज्ञानेंविण मुक्त जाले । हें तों घडेना ॥

आळसें कार्यभाग नासतो । साक्षेपें होत होत होतो ।
दिसते गोष्टी कळेना तो । शहाणा कैसा ॥

व्याप आटोप करिती । धक्के चपेटे सोशिती ।
तेणें प्राणी सदैव होती । देखत देखतां ॥

जें जें कांहीं आपणास ठावें । तें तें हळूहळू शिकवावें ।
शहाणे करून सोडावे । सकल जन ॥

कीर्ति पाहतां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं ।
केल्यावीण कांहींच नाहीं । कोठें तरी ॥

समर्थांचे मनाचे श्लोक म्हणजे तर महाराष्ट्रीयांना त्यांनीं देऊन ठेवलेला एक मोठा अमूल्य ठेवाच होय.

'मनाचीं शतें ऐकतां दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ।
म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥'

अशी या श्लोकांची फलश्रुति त्यानीं स्वतःच सांगितली आहे. स्वतःच्या मनाला बोध करण्याच्या निमित्तानें, आपलें सर्व ज्ञान आणि आपला सारा अनुभव या २०५ श्लोकांत त्यांनीं आपल्या जोरदार भाषेनें, नमूद करून ठेवला आहे.

'मना चंदनाचे परी त्वां झिजावें।
परी अंतरी सज्जनां नीववावें,'

'मना सांग पां रावणा काय जालें।
अकस्मात तें राज्य सर्वं बुडालें,'

'मना मानसीं व्यर्थ चिंता वहातें।
अकस्मात होणार होऊनि जातें,'

'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।
अकस्मात तोही पुढें जात आहे'

वगैरे श्लोक तर महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं आहेत.

'करुणाष्टकें' हीं समर्थांनीं, टाकळी येथील मुक्कामांत लिहिलीं असावीं असें वाटतें. समर्थांच्या कवितेंत जर कोठें 'काव्य' असेल तर तें या करुणाष्टकांत आहे. बहुतेक करुणाष्टकांत करुण रसाचा परिपोष उत्कृष्ट झाला असून, त्यांजवर एक प्रकारची उदासीनतेची छाया पडलेली असल्यामुळें प्रेमळ रसिकाच्या हृदयाचा भेद करण्याचें सामर्थ्य त्यांत आहे. अंगांत तारुण्याचा भर, त्यामुळें होणारी मनाची चलबिचल; दुसरीकडे भगवद्दर्शनाचा निदिध्यास; स्वतःच्या गुणदोषांची जाणीव होऊन, भगवत्कृपेस आपण पात्र नाहीं या समजुतीमुळें झालेली निराशा, इत्यादि अनेक भावांचें प्रतिबिंब या करुणाष्टकांत पडलें आहे. हीं सर्व करुणाष्टकें लक्षपूर्वक वाचलीं म्हणजे समर्थांनीं आपलें हृदयच उकलून प्रभूपुढें ठेवलें आहे असें वाटतें.

अवस्था मनीं लागली काय सांगों।
गुणीं गुंतला हेत कोणासि मागों॥
बहूसाल भेटावया प्राण फूटे।
उदासीन हा काळ कोठें न कंठे॥

भजों काय सर्वांपरी हीण देवा ।
करूं काय रे सर्व माझाचि ठेवा ॥
म्हणों काय मी कर्मरेखा न लोटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥

सदासर्वदा योग तूझा घडावा ।
तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
उपेक्षूं नको गूणवंता अनंता ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥

अनुदिन अनुतापें तापलों रामराया ।
परम दिनदयाळा नीरसीं मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥

तनुमनधन माझें राघवा रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥
प्रचळित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळभजनलीळा लागली आस तूझी ॥

असंख्यात रे भक्त होऊनि गेले ।
तिहीं साधनांचे बहू कष्ट केले ॥
नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं ।
नसे प्रेम हें राम विश्राम नाहीं ॥
असा दीन अज्ञान मी दास तूझा ।
समर्था जनीं घेतला भार माझा ॥

या श्लोकांवरून, समर्थांनीं करुणाष्टकें लिहिलीं त्या वेळीं त्यांच्या मनाची स्थिति कोणत्या प्रकारर्चीं होती याची काहींशी कल्पना वाचकांस होईल. खालील लोकप्रिय पद्यांतही समर्थांच्या याच मनःस्थितीचें प्रतिबिंब उतरलें आहे—

**धांव रे रामराया किति अंत पाहसी।**
**प्राणांत मांडियेला नये करुणा कैसी॥ ध्रु० ॥**

**मीपण अहंकारें अंगीं भरला ताठा।**
**विषयकर्दमांत लाज न वाटे लोळतां॥**
**चिळस निपजेना ऐसें जालें बा आतां।**
**धांव रे रामराया० ॥**

**मारुतिस्कंधभागीं शीघ्र बैसोनि यावें।**
**राघवें वैद्यराजें कृपा—औषध द्यावें॥**
**दयेच्या पद्महस्तें माझे शिरीं ठेवावें।**
**धांव रे रामराया० ॥**

**या भवीं रामदास थोर पावतो चिंता।**
**कौतुक पाहतोसी काय जानकीनाथा।**
**दयाळा दीनबंधो! भक्तवत्सला आतां।**
**धांव रे रामराया० ॥**

समर्थांनीं अशा रीतीनें जी भगवंताची करुणा भाकली आहे तिला हल्लींचे कांहीं लोक कदाचित् रडगाणें म्हणतील, तर या रडगाण्या-विषयीं श्री. शंकर श्रीकृष्ण देव म्हणतात—"जन्माला आल्यापासून मरेपर्यंत रडणें सर्वांच्याच पाठीमागें लागलें आहे, पण हें रामासाठीं

रडणें जरा निराळें असतें. माणसाच्या मागचें रडणें जर टळत नाहीं तर मग केवळ ऐहिक वस्तूसाठींच तेवढें कां रडावें, हें समजत नाहीं. रडावयाचेंच तर मग अशासाठीं रडावें कीं ज्याची प्राप्ति झाली असतां रडणें कायमचें सुटावें.”

समर्थ आरंभीं भगवंतासाठीं असे रडले म्हणूनच ते समाधिस्थ झाल्यावर सगळा महाराष्ट्र त्यांच्यासाठीं रडला!

समर्थांची कविता लक्षपूर्वक वाचीत असतां एक गोष्ट सकृद्दर्शनींच लक्षांत येते ती ही कीं, या कवितेवर एकनाथी वाङ्मयाच्या अभ्यासाचा पुष्कळच परिणाम झालेला आहे.

समर्थांच्या या काव्योदधीचें हें मंथन जर आपण असेंच पुढें चालविलें तर त्यांतून इतकीं अमूल्य रत्नें बाहेर पडतील कीं, त्यांचा संग्रह या चिमुकल्या ग्रंथांत करितां येणें शक्य नाहीं. म्हणून आतां हात आटोपता घेणें भाग आहे. समर्थ हे श्रीरामोपासक असतांही प्रसंगविशेषीं त्यांनीं अनेक देवतांच्या स्तुतिपर कविता केलेल्या आहेत. ‘**सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची**’ ही गणपतीची, ‘**लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा०**’ ही शंकराची वगैरे त्यांच्या आरत्या तर सर्वतोमुखीं आहेत. शेवटीं समर्थांच्या सर्व उपदेशाचें सार ज्यांत सांठविलें आहे असा त्यांचा एकच श्लोक येथें देऊन व समर्थांचे ग्रंथ एकदां तरी लक्षपूर्वक वाचण्याची विनंति वाचकांस करून हें प्रकरण संपवितों—

**उपासनेला दृढ चालवावें ।**
**भूदेव संतांसि सदा लवावें ॥**
**सत्कर्मयोगें वय घालवावें ।**
**सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥**

११

# श्रीसमर्थ–निर्याण

समर्थांचे ज्येष्ठ बंधु गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ यांस शक १५९९ मध्यें देवाज्ञा झाली. त्यानंतर शक १६०० या वर्षी चैत्रांत, समर्थांनीं, श्रेष्ठांच्या मुलांस आणण्यासाठीं उद्धवगोसावी यांस जांबेस पाठविलें. वैशाखांत मुलें सज्जनगडावर आलीं, तीं माघ महिन्यापर्यंत गडावर होतीं. पुढें माघ कृष्ण प्रतिपदेस समर्थांनीं त्यांस जांबेस पाठविलें. शक १६०२ मध्यें चैत्र शुद्ध पौर्णिमेस श्रीशिवाजीमहाराज कैलासवासी झाले. महाराजांचा मृत्युकाल जवळ आला आहे हें समर्थांस पूर्वीच समजलें होतें व तसें त्यांनीं उद्धवगोसावी यांजपाशीं बोलूनही दाखविलें होतें. महाराजांच्या मृत्यूचें वर्तमान जासुदानें समर्थांस कळवितांच, 'श्रीची इच्छा' असें म्हणून ते आपल्या खोलींत गेले व त्यांनीं अन्न वर्ज्य केलें. फक्त दुधावर असत. बाहेर फिरणेंही सोडून दिलें. ते मायामोहातीत असूनही महाराजांच्या मृत्यूमुळें त्यांना अत्यंत दुःख झालें. महाराजांमागें समर्थही आतां

फार दिवस जगणार नाहींत असें शिष्यमंडळीस वाटूं लागलें. पुढें संभाजीमहाराज सिंहासनारूढ झाल्यावर, रामचंद्रपंत अमात्य यांस बरोबर घेऊन ते सज्जनगडावर समर्थदर्शनास गेले. स्वतःच्या राज्याभिषेकसमारंभास समर्थांनीं यावें म्हणून त्यांस बोलावण्यासाठीं संभाजीमहाराजांनीं राघो अनंत यांस पाठविलें होतें, परंतु 'आपणास येणें होत नाहीं' असें सांगून समर्थांनीं दिवाकर गोसावी यांस रायगडीं पाठविलें. पुढें संभाजीमहाराजांनीं दुष्ट लोकांच्या नादीं लागून जुन्या मुत्सद्द्यांचा व एकनिष्ठ सेवकांचा छल चालविला असून बाळाजी आवजी, अण्णाजी दत्तो, विठोजी फर्जंद इत्यादिकांचा त्यांनीं अत्यंत क्रूरपणानें वध केला वगैरे हकीकत जेव्हां समर्थांस कळली तेव्हां, संभाजीस कांहीं उपदेश करून पहावा म्हणून त्यांनीं पुढील ओंवीबद्ध पत्र त्यांस पाठविलें—

**अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ।**
**तजविजा करीत बसावें । एकांतस्थळीं ॥**

**कांहीं उग्र स्थिति सांडावी । कांहीं सौम्यता धरावी ।**
**चिंता लागली परावी । अंतर्यामीं ॥**

**मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ।**
**सुखी करूनि सोडावे । कामाकडे ॥**

**पाटवणी तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ।**
**तैसें सज्जनाच्या मना । कळलें पाहिजे ॥**

**जनाचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला ।**
**जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥**

**श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बसलें ।**
**मग जाणावें फावलें । गलिमासी ॥**

ऐसें सहसा करूं नये। दोघे भांडतां तिसऱ्यास जय।
धीर धरोन महत्कार्य। समजून करावें॥

आधींच पडली धास्ती। म्हणजे कार्यभाग होय नास्ती।
या कारणें समस्तीं। बुद्धि शोधावी॥

राजी राखतां जग। मग कार्यभागाची लगबग।
ऐसें जाणोनियां सांग। समाधान राखावें॥

सकळ लोक एक करावे। गलीम निवटून काढावे।
ऐसें करितां कीर्ति धांवे। दिगंतरीं॥

आधीं गाजवावे तडाके। मग भूमंडळ धाके।
ऐसें न होतां धक्के। राज्यास होती॥

समय प्रसंग ओळखावा। राग निपटून काढावा।
आला तरी कळों न द्यावा। जनांमध्यें॥

राज्यामध्यें सकळ लोक। सलगी देऊन करावे सेवक।
लोकांचे मनामध्यें धाक। उपजोंचि न ये॥

बहुत लोक मिळवावे। एक विचारें भरावे।
कष्टें करोनि घसरावें। म्लेंच्छांवरी॥

आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मिळवावें।
महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे॥

लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल येणें॥

शिवराजास आठवावें। जीवित्व तृणवत मानावें।
इहलोकीं परलोकीं राहावें। कीर्तिरूपें॥

शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं॥

शिवरायाचें कैसें चालणें। शिवरायाचें कैसें बोलणें।
शिवरायाचें सलगी देणें। कैसें असे ॥
सकळ सुखांचा त्याग। करूनि साधिजे तो योग।
राज्यसाधनाची लगबग। कैसी असे॥
त्याहूनि करावें विशेष। तरीच म्हणावें पुरुष।
याउपरी आतां विशेष। काय लिहावें॥

दिवसेंदिवस समर्थांची प्रकृति खचत चालली होती. शिवाजीमहाराजांनीं पितळेच्या खुरांचा पलंग दिला होता त्यावर बसून असत. बोलावल्याशिवाय खोलींत कोणास येऊं देत नसत. सज्जनगडावरील हवेपेक्षां चाफळची हवा चांगली असें सांगून शिष्यांनीं चाफळास जाण्याचा आग्रह केला, परंतु चाफळास आपली समाधि झाल्यास शिष्यमंडळी आपल्या पुण्यतिथीचा उत्सव तेथें करतील व त्यामुळें श्रीरघुपतीची अमर्यादा होईल या विचारानें समर्थांनीं चाफळास जाण्याचें नाकारलें. चाफळ मठाच्या पुढील व्यवस्थेसंबंधाचा विषय अक्का व उद्धव यांनीं अनेक वेळां काढला असतां "शिष्यांपाशीं कांहीं मागावयाचें नाहीं अशी आमची प्रतिज्ञा आहे. माझी समाधि झाल्यावर तुम्ही रघुपतीची उपासना करीत जा." येवढेंच उत्तर समर्थांनीं दिलें. कांहीं दिवसांनीं तोच प्रश्न पुनः निघाला तेव्हां, "जांबेस श्रेष्ठांचीं मुलें आहेत त्यांना आणून संस्थान त्यांचे स्वाधीन करावें व सर्वांनीं त्यांचे आज्ञेंत राहून श्रीची पूजा उत्सवादि कामें करावींत," असें समर्थांनीं सांगितलें. सगळेच शिष्य सारखेच निरपेक्ष नसल्यामुळें आपल्या पश्चात्, संस्थानच्या कारभारांत कोणाचें वर्चस्व असावें एतदर्थ शिष्यमंडळींत तंटेभांडणें होऊन मुख्य कार्याची हानि होण्याचा संभव आहे हें लक्षांत घेऊनच श्रेष्ठांच्या मुलांस चाफळास आणण्याची ही तोड समर्थांनीं सुचविली असावी. परंतु त्या सुमारास जांबेकडे

दंगा असल्यामुळें, श्रेष्ठांच्या मुलांस आणणें लांबणीवर पडलें. समर्थांच्या अंतकाळच्या कांहीं गोष्टी, तंजावरमठपति भीमस्वामी यांनीं दिल्या आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, समर्थ पूर्वी तंजावरास गेले होते त्या वेळीं तेथील एका कारागिरास त्यांनीं कांहीं मूर्ति करण्यास सांगितलें होतें, त्याप्रमाणें त्या मूर्ति तयार झाल्यावर व्यंकोजीराजे यांनीं त्या मल्हारराव लिंबदेव थेऊरकर व केशव-गोसावी यांजबरोबर सज्जनगडावर पाठविल्या. तेव्हां, आपण सांगितल्याप्रमाणेंच मूर्तींचें ध्यान आहे हें पाहून समर्थांस संतोष झाला. मग त्यानीं आपल्या खोलींतच त्या मूर्तींची स्थापना केली.

शक १६०३ माघ वद्य नवमी दिवशीं समर्थ प्रातःकाळींच उठले. श्रीराममूर्तीस साष्टांग नमस्कार घातला, व दिगंबर होऊन मूर्तिसन्मुख भूमीवर बसले. बाहेर कांहीं मंडळी दर्शनासाठीं आली होती व आंत अक्का व उद्धव गोसावी होते. त्यांच्या विनंतीवरून बाहेरच्या मंडळीस आंत येण्यास परवानगी दिली. नऊ दिवसांत पोटांत अन्न नाहीं, उदकस्पर्शही केला नाहीं, तरी कृपा करून थोडें साखरपाणी घ्यावें, अशी विनंति शिष्यांनीं केली तेव्हां समर्थ वाटीभर साखरपाणी प्याले. नंतर त्यांनीं सर्व मंडळीस बाहेर जाण्यास सांगितलें. अक्का व उद्धव यांनीं त्यांस पलंगावर बसण्याची विनंति केली, तेव्हां 'उठवत नाहीं, तुम्हींच उठवा,' असें ते म्हणाले. त्यांनीं समर्थांना उठविण्याचा प्रयत्न केला, परंतु समर्थ त्यांना उचलेनात. आणखी मंडळी बोलावली. त्यांनींही प्रयत्न केला. परंतु आसनावरून समर्थ अणुमात्रही हालेनात. शेवटीं समर्थांनींच त्यांना बाहेर जाण्यास सांगितलें व स्वतः श्रीराममूर्तीकडे दृष्टि लावून ध्यानस्थ झाले. हें पाहून, आतां समर्थ आपणास सोडून जातात असें वाटून शिष्यमंडळी घाबरली. तेव्हां समर्थ त्यांस म्हणाले—

“माझी काया गेली खरें। परि मी आहें जगदाकारें।
ऐका स्वहित उत्तरें। सांगेन तीं॥
नका करूं खटपट। पहा माझा ग्रंथ नीट।
तेणें सायुज्याची वाट। ठायीं पडे॥
रहा देहाच्या विसरें। वर्तू नका वाइट बरें।
तेणें मुक्तीचीं हीं द्वारें। चोजविती॥
रामदास म्हणे। सदा स्वरूपीं अनुसंधान।
करा श्रीरामाचें ध्यान। निरंतर”॥

“दासबोध आणि आत्माराम हे दोन ग्रंथ प्रत्यक्ष माझें स्वरूप आहेत, म्हणून तुम्हाला खेद करण्याचें कांहीं कारण नाहीं,” असेंही समर्थांनीं शिष्यवर्गास सांगितलें. या वेळीं एकट्या अक्का समर्थांजवळ होत्या. उद्धव गोसावी, केशव गोसावी, शिवराम गोसावी व त्यांची बहीण इतकी मंडळी दाराजवळ होती व इतर मंडळी बाहेर होती. शेवटीं समर्थांनीं एकवीस वेळां ‘हर हर’ शब्द करून ‘श्रीराम’ हा शब्द उच्चारला व श्रीराममूर्तीकडे पाहिलें, तोंच त्यांच्या मुखांतून दिव्य तेज निघून मूर्तीच्या मुखांत तें प्रविष्ट झालें! अशा रीतीनें या महापुरुषानें आपल्या वयाच्या ७४ व्या वर्षीं आपला अवतार संपविला.

सज्जनगडावरील मठाच्या उत्तरेस एक खळगा होता तो भरून काढण्यास शिवाजीमहाराजांनीं सांगितलें असतां “खळगा आहे तसाच असूं द्या, पुढें उपयोगीं पडेल,” असें समर्थ म्हणाले होते. त्याचा उद्देश शिष्यमंडळीच्या आतां लक्षांत आला व त्याच खळग्यांत चंदन-बिल्वादि काष्ठें रचून समर्थांच्या शवाचें त्यांनीं दहन केलें. समर्थांनीं समाधि घेतल्याचा वृत्तांत संभाजी राजे यांस समजतांच त्यांनीं रामचंद्रपंत अमात्य यांस पुष्कळ द्रव्य देऊन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: चरित्र
क्रमांक 92...

गडावर पाठविलें. त्या द्रव्यानें दानधर्म केला. उत्तरकार्य पहिले शिष्य उद्धव गोसावी यांनीं केलें. नंतर दहनस्थलीं समाधि बांधून चंदनाचा ओटा समर्थशिष्य तारळेकर गोसावी यांजकडून बांधवून त्यावर पादुकांची स्थापना केली. अस्थि जमा करून गंगेंत टाकण्याकरितां चाफळ येथें मठासमोर वृंदावन बांधून त्यांत ठेवल्या व त्या पुढें कल्याणस्वामीच्या अस्थींबरोबर केशवस्वामींनीं शक १६३६ मध्यें काशीस नेऊन गंगोदकांत त्यांचें विसर्जन केलें. पुढें अक्का, उद्धव वगैरे शिष्यांनीं समाधीवर एक लहान देवालय बांधून, तंजावराहून आलेल्या मूर्तींची त्यांत स्थापना केली. कांहीं कालानें स्वतः संभाजी राजे रामचंद्रपंत अमात्यांसह समाधिदर्शनास आले असतां त्यांनीं समाधीसुद्धां मोठें देवालय बांधण्याची आज्ञा केली व त्याप्रमाणें एकदोन महिन्यांत देवालय उभारण्यांत आलें. रामचंद्रपंत अमात्य व खंडो बल्लाळ यांस मठाच्या खर्चास द्रव्य पुरविण्याची आज्ञा महाराजांनीं दिली. संभाजी महाराजांचें एकंदर वर्तन जरी विशेष स्पृहणीय नव्हतें तरी समर्थांविषयीं त्यांच्या मनांत थोडीबहुत पूज्यबुद्धि असावी असें दिसतें. समर्थांना मात्र संभाजीमहाराजांविषयीं फारसें प्रेम नव्हतें. गादीवर बसतांच त्यांनीं जे अत्याचार केले त्यांची हकीकत ऐकून समर्थांच्या मनांत त्यांजविषयीं तिटकारा उत्पन्न झाला होता. शिवाजीमहाराजांचा अकाल मृत्यु व संभाजी महाराजांचें दुर्वर्तन या दोन गोष्टींचा परिणाम समर्थांच्या मनावर झाल्यामुळेंच त्यांनीं लवकर समाधि घेतली असावी, असें अनुमान केलें तर तें अगदींच निराधार ठरेल असें वाटत नाहीं. स्वतः रोगग्रस्त असूनही औषधोपचारादि कोणताही रोगनिवारणाचा उपाय शिष्यांस त्यांनीं करूं दिला नाहीं व शेवटीं नऊ दिवस तर कडकडीत उपोषण केलें, यावरून त्यांनीं

प्रायोपवेशनच केलें, असावें असेंही म्हणण्याचें धाष्टर्य कदाचित् कोणी करील. असो. पुढें सातारचें राज्य इंग्रज सरकारनें खालसा केलें त्या वेळेपर्यंत, सातारच्या सर्व छत्रपतींनीं समर्थांविषयींचा आपला भक्तिभाव कायम ठेवून चाफळ व सज्जनगड येथें श्रीराम-नवमी-महोत्सवास व श्रीसमर्थांच्या पुण्यतिथीस जातिनिशीं हजर रहाण्याची परंपरा कायम ठेवली होती.

समर्थांनीं आपल्या मृत्यूपूर्वीं, जांबेहून श्रेष्ठांच्या मुलांस सज्जनगडावर आणण्याची सूचना आपल्या शिष्यांस केली होती, परंतु जांबेच्या बाजूस दंगाधोपा असल्यामुळें ती सूचना अंमलांत आणतां आली नाहीं, हा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. पुढें समर्थ समाधिस्थ झाल्यावर, संभाजीमहाराजांच्या कारकीर्दींत तर महाराष्ट्रांत बेबंदशाहीच माजली व खुद्द औरंगजेबानें मराठ्यांचें राज्य धुळीस मिळविण्याचा चंग बांधून महाराष्ट्रांत येऊन तळ दिला. 'हरिवरदा' ग्रंथाचे कर्ते कृष्णदयार्णव यांनीं या प्रसंगाचा उल्लेख पुढील ओंवींत केला आहे—

**शिवभूपति पावतां मुक्ति।**
**दक्षिणे येवोनि ताम्रपति।**
**केली विजयपुरा समाप्ति।**
**महाविपत्ति राष्ट्रातें॥**

असा तो राष्ट्राच्या विपत्तीचा काल होता. संभाजीमहाराजांची कारकीर्द बहुतेक लढाया करण्यांतच गेली व शेवटीं इ. स. १६८८ सालीं औरंगजेबानें तुळापूर येथें त्यांचा वध केला. पुढें राजाराम महाराजांची कारकीर्द सुरू झाली तरी जिकडे तिकडे धामधूमच, स्थैर्य नाहीं. या कारणामुळें, श्रेष्ठांच्या मुलांस जांबेहून सज्जनगडावर आणण्याचें काम लांबणीवर पडत गेलें. पुढें तर राजाराममहाराज जिंजीकडे गेले व सर्व कृष्णाकांठ पुन: म्लेंच्छांनीं व्यापला. तेव्हां,

५२७८

चाफळ येथील मूर्तीस उपसर्ग पोंचूं नये म्हणून शिष्यांनीं त्या मूर्ति रामचंद्रपंत अमात्य यांच्या संमतीनें वाघोलीच्या सड्यावर नेल्या व तेथें उत्सव सुरू केला. परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यांनी सज्जनगडावरील समाधीचें दार भिंतीनें बंद करून तेथें मारुतीची मूर्ति ठेवली व देवालयांतील मूर्ति उद्धवगोसावी यांजबरोबर वासोटें येथें पाठविल्या. पुढें मोगल फौजेचा पाडाव होऊन, गेलेला प्रांत पुनः मराठ्यांच्या हातीं आल्यावर दोन्ही ठिकाणच्या मूर्ति पूर्वस्थलीं आणल्या. नंतर रामचंद्रपंत अमात्य यांनीं, श्रेष्ठांचे पुत्र रामचंद्रबुवा यांस आणण्यासाठीं एक मनुष्य जांब येथें पाठविला. तों तेथें रामचंद्रबुवा पूर्वींच निवर्तल्याचें कळलें. सन १७०७ मध्यें शाहूमहाराज बंधमुक्त होऊन साताऱ्यास आल्यावर त्यांनीं सज्जनगडावर जाऊन समर्थांच्या समाधीचें दर्शन घेतलें व पूजाअर्चा, उत्सव इत्यादिकांची पूर्ववत् व्यवस्था केली. पुढें, त्यांनीं जांबेस कारकून व पालखी पाठवून श्रेष्ठांचे नातू गंगाधरबुवा व त्यांचे कनिष्ठ बंधु शामजी यांस आणविलें. ते माहुलीस येऊन पोंचतांच महाराजांनीं मुद्दाम तेथवर जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. दुसरे दिवशीं पंतप्रधान व पंतप्रतिनिधि यांना लवाजम्यानिशीं पाठवून मोठ्या समारंभानें त्यांना साताऱ्यास नेलें. स्वतः महाराज पोईपर्यंत त्यांना सामोरे आले होते. नंतर सुमुहूर्तानें शक १६३२ माघ शुद्ध ५ या दिवशीं त्यांना सज्जनगडावर नेलें. अक्का, उद्धवप्रभृति समर्थ-शिष्यांनीं त्यांचें स्वागत करून, त्यांजकडून समर्थांच्या समाधीचें दर्शन करविलें. नंतर साखर वांटली व तोफांचे बार केले. तिसरे दिवशीं शाहूमहाराज स्वतः गडावर गेले तेव्हां उद्धवगोसावी म्हणाले, “मुलें लहान आहेत, मठाचा अभिमान महाराजांस असावा.” महाराज म्हणाले, “राज्य त्यांचेंच आहे.” इतकें बोलून त्यांनीं खंडोबल्लाळ यांस मठाची व्यवस्था पूर्वीप्रमाणें

ठेवण्यास सांगितलें. अक्का शेवटपर्यंत गडावरच होत्या. त्यांचें निर्याण शके १६४३ कार्तिक शुद्ध १ या दिवशीं सज्जनगडावरच झालें. उत्तरकार्य गंगाधरबुवा यांनीं केलें. त्यांच्या समाधीचें वृंदावन गडावर श्रींच्या देवालयाच्या ईशान्येस आहे. श्रेष्ठांची वंशपरंपरा येणेंप्रमाणें—

**सूर्याजीपंत**

- गंगाधर ऊर्फ रामीरामदास ऊर्फ **श्रेष्ठ**
  - **रामजी**
    - **गंगाधर** ऊर्फ बापास्वामी पुण्यतिथि मार्गशीर्ष वद्य १२
    - **शामजी** ऊर्फ दादजीबोवा
      - **लक्ष्मण** ऊर्फ बाबास्वामी
        - **हनुमंतस्वामी** ऊर्फ बापूस्वामी
          - **महारुद्रस्वामी**
            - दत्तक **लक्ष्मणस्वामी**
              - **गंगाधर** ऊर्फ बापूसाहेब
                - **आबास्वामी** ( विद्यमान )
      - **रामचंद्रबावा**
  - **शामजी**
- नारायण ऊर्फ **श्रीसमर्थ रामदास**

१२

# जांब, सज्जनगड व चाफळ

जांब ही समर्थांची जन्मभूमी हल्लीं मोगलाईत आहे. ज्या घरांत समर्थ जन्म पावले तें घर आतां नाहीं, परंतु घराची जागा आहे. उजव्या बाजूला विहीर आहे, तिला अजूनही कुळकर्ण्यांची विहीर असेंच म्हणतात. ज्या मारुतीपाशीं सूर्याजीपंतांना अनुग्रह झाला तो मारुति गांवाबाहेर आहे. गांवाला लहानशी नदी आहे. पूर्वी जेथें डोह होता व ज्यांत, वडाच्या झाडावरून समर्थांनीं उडी घेतली होती तो डोह आतां नाहीं, पण तें वडाचें झाड आहे. आसनगांवीं समर्थांना लग्नाला नेलें होतें तें आसनगांव जांबेपासून अर्धकोसावर आहे. जांब येथील उत्सवांत जेवणाचे वेळीं तुपाची खोटी झाल्यामुळें, समर्थांच्या सांगण्यावरून एका विहिरींतलें पाणी तूप म्हणून वाढण्यांत आलें होतें. हें पाणी ज्या मातीच्या घागरींतून वाढण्यांत आलें होतें ती घागर अद्याप जांब येथील मठांत असून हल्लीं तिचा वरचा भाग पितळेनें व खालचा भाग तांब्यानें

मढविलेला आहे. ही घागर श्रीराममंदिरांत ठेवलेली असून, उत्सवाचे वेळीं तींतून तूप वाढण्याचा प्रघात अद्याप आहे. समर्थांचें उपनांव ठोसर. या ठोसरांचीं ५।२५ घरें त्या भागांत अद्याप आहेत. समर्थांच्या घराण्यांत ज्या श्रीरामाची उपासना होती तें राममंदिरही जांब येथें आहे. ज्या वडाच्या झाडावरून समर्थांनीं डोहांत उडी मारली त्याच झाडाजवळ, श्रेष्ठांचे पुत्र रामजी व शामजी यांच्या समाधि आहेत. तेथें जवळच तिसरी समाधि आहे ती महारुद्रस्वामीच्या कुटुंबाची होय असें सांगतात. जांबगांव चांफळच्या स्वामीमहाराजांस इनाम आहे. सूर्याजीपंतांचे वेळीं जी जमीन त्यांजकडे होती त्या जमिनीवर हल्लीं मळा असून त्यास देवमळा म्हणतात.

जांबगांव हल्लीं मोगलाईत, औरंगाबाद जिल्ह्यांत, मनमाड–हैदराबाद रेल्वेच्या परतूर स्टेशनापासून १४ मैल आहे. गांवाचें उत्पन्न सुमारें ५००० रु. आहे. तेथील पूजा अर्चा, उत्सव वगैरे चाफळच्या स्वामींचे मार्फतच होत असतात. धुळें येथील प्रसिद्ध एकनिष्ठ समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं अलीकडे मोठ्या परिश्रमानें ४०००० रु. जमवून जांब येथें समर्थांचें मोठें सुंदर मंदिर बांधलें असून त्यांत संगमरवरी दगडाची समर्थांची मूर्ति स्थापन केली आहे. तेथें दर वर्षी अनेक विद्यमान समर्थभक्त जमून मोठा उत्सव करितात. श्री. देव यांनीं आपलें आयुष्यच श्रीसमर्थसेवेस वाहिलें आहे. गेल्या २०।२५ वर्षांत सर्व महाराष्ट्रभर व कर्नाटकांतही प्रवास करून, समर्थांनीं स्थापन केलेल्या ठिकठिकाणच्या मठांतील विद्यमान मठपतींस भेटून व त्यांच्या संग्रहीं असलेल्या ग्रंथांचें व कागदपत्रांचें अवलोकन करून, समर्थ व त्यांचा संप्रदाय यांच्यासंबंधाची व तदनुषंगानें इतर साधुसंत व त्यांचे ग्रंथ यांचीही, इतकी महत्त्वाची माहिती त्यांनीं गोळा केली आहे कीं, समर्थसंप्रदायाच्या इतिहासांत त्यांची ही कामगिरी

सुवर्णाक्षरांनींच लिहून ठेवावी लागेल. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारानें समर्थांचें विस्तृत चरित्र लिहिण्याचा आपला विचार त्यांनीं जाहिर केला असून, त्या ग्रंथाची, महाराष्ट्रांतील सर्व श्रद्धाळू व प्रेमळ जन चातकाप्रमाणें वाट पहात आहेत. '**रामदास** आणि **रामदासी**' या मासिकाच्या द्वारें श्री. देव हे महाराष्ट्र वाङ्मयाची जी सेवा करीत आहेत ती अमूल्य आहे. श्रीसमर्थकृपेनें त्यांना दीर्घायुरारोग्य लाभावें येवढीच आमची प्रार्थना.

**चाफळ**चा मठ म्हणजे श्री. देव यांच्या भाषेंत, 'श्रीसमर्थसंप्रदायाचें आद्यपीठ' होय. देशाचा आणि धर्माचा विचार समर्थांनीं मुख्यतः या ठिकाणीं केला. हें ठिकाण फार रमणीय आहे. सभोंवतीं डोंगरांचा वेढा असून मध्यभागीं श्रीराममंदिर आहे. अंगापूरच्या डोहांतून श्रीरामाची जी मूर्ति समर्थांनीं काढली तिची स्थापना या ठिकाणीं केली आहे व हिचेंच पूजन समर्थ स्वतः करीत असत. याच चाफळखोऱ्यांत शिंगणवाडीचे मारुतीपाशीं श्रीशिवाजीमहाराजांस समर्थांनीं अनुग्रह दिला. मंदिर नदीतीरीं उंचवट्यावर आहे. मंदिरा-समोर दासमारुति व मागें भीममारुति आहे. भीममारुतीच्या डाव्या बाजूला जो तट आहे तो कल्याणस्वामीचे शिष्य उंब्रज मठाधीश केशवस्वामी यांनीं बांधला असें जुन्या कागदपत्रांवरून दिसतें. शिंगणवाडीचे पलीकडील डोंगरांत समर्थांची बसण्याची गुहा आहे तिला 'रामघळ' असें म्हणतात. ही घळ दुमजली असून तिच्या पहिल्या मजल्याला वरच्या बाजूस एक भोंक आहे त्यांतून वरच्या मजल्यावर जावें लागतें. "दुसऱ्या मजल्यांत आसनस्थ असा फक्त एकच मनुष्य बसूं शकेल. येरवीं तीन चार माणसें बसतील." या घळीच्या वरच्या मजल्यांतून दिसणारा देखावा अपूर्व आहे. समोर डोंगरांच्या रांगाच रांगा दिसतात. खालच्या मजल्यांत ५।५० माणसें बसूं शकतील येवढा तो प्रशस्त

आहे. खालच्या मजल्यांत मध्यभागीं भिंत घालून दोन भाग केले आहेत. एका भागांत धुणी आहे. धुणीपाशीं एक विवर आहे, त्यांतून जमिनीसरसें फरफटत जावें लागतें. कांहींसें आंत गेल्यावर दोन तीन माणसें बसण्याइतकी जागा आहे. रामघळीपासून दोन हाकांच्या अंतरावर 'कुबडीतीर्थ' आहे. श्रीसमर्थ एकदां निंबघळींत असतां त्यांच्या दर्शनास शिवाजीमहाराज आले होते. उन्हांतून आल्यामुळें महाराज बरेच तृषाक्रांत झाले आहेत असें पाहून समर्थांनीं आपल्या कुबडीनें तेथील एक दगड बाजूस सारून पाणी काढलें, तेंच हें कुबडीतीर्थ होय. हें तीर्थ कधीं आटत नाहीं. निरंतर करांगळीयेवढी पाण्याची धार वहात असते. पाणी गार आणि मधुर आहे. रामघळींतील दगड व माती यांचा रंग भगवा आहे. चाफळ मठाला उत्पन्न चांगलें आहे. येथें रामनवमीचा मोठा उत्सव होतो. चाफळ गांव सातारा जिल्ह्यांत मसूर स्टेशनापासून १० मैल आहे. श्रीसमर्थांनीं आपल्या ' डफगाणें ' नामक एका सुंदर पद्यांत चाफळचें व तेथील उत्सवाचें फार रसभरित वर्णन केलें आहे. शिवथरच्या घळींतही समर्थ पुष्कळ वेळां बसत असत.

**सज्जनगड** हें समर्थांचें समाधिस्थान होय. उर्वशी ऊर्फ उरमोडी नदीच्या कांठीं हें स्थल आहे. शिवाजीमहाराजांच्या आग्रहावरून समर्थांनीं येथें वास्तव्य केलें. साताऱ्यापासून सज्जनगड तीन कोस आहे. गडावरून सातारचा किल्ला स्पष्ट दिसतो. सातारच्या बाजूनें गड चढून जात असतां किल्ल्याच्या दरवाजापासून उजव्या हाताला परळी गांवाकडे जाणारी पायवाट असून तिच्या वरच्या बाजूनें जाणाऱ्या दुसऱ्या पायवाटेनें बऱ्याच अंतरावर गेल्यावर एक गुहा लागते. गुहेच्या जवळची वाट जरा अवघड आहे. गुहेचें द्वार इतकें लहान आहे कीं, बसून आंत जावें लागतें. गुहेंत गेल्यावर उजव्या बाजूला वळून थोडेंसें पुढें जातांच कमरेइतका उतार लागतो, तेथें

आठदहा माणसें बसूं शकतील अशी वर्तुळाकार जागा आहे. श्रीसमर्थ या गुहेंत पुष्कळदां जाऊन बसत असावेत असा श्री. देव यांचा तर्क आहे. किल्ल्याचे दोन्ही दरवाजे ओलांडून आंत गेल्यावर डाव्या बाजूला आंगळाई देवीचें देवालय आहे. अंगापूरच्या डोहांतून समर्थांनीं ज्या मूर्ति काढल्या त्यांपैकीं देवीच्या मूर्तीची त्यांनीं या स्थलीं स्थापना केली. पुढें गेल्यावर मारुतीचें देऊळ लागतें. त्याच्या मागल्या बाजूस पाणी पिण्याचें टाकें आहे. या टांक्यावरून पुढें गेलें म्हणजे श्रीसमर्थांचें निवासस्थान व त्यांची समाधि लागते. समाधीची इमारत मोठी आहे. समाधि खालीं तळघरांत असून वर श्रीरामाच्या मूर्ति आहेत. समाधीच्या मागच्या बाजूस एका पितळेच्या पेटींत समर्थांच्या पादुका आहेत. पादुकांपाशींच समर्थांची एक कुबडी व काठी आहे. शेजघरांत पलंगावर समर्थांची तसबीर आहे. शेजघरांतच समर्थांचा पाणी पिण्याचा एक तुंबा व पिकदाणी हीं आहेत. बाह्यतः कुबडी पण आंत तलवार अशी जी समर्थांची गुप्ती होती ती येथेंच आहे. अक्का व वेणू यांचीं वृंदावनें गडावर आहेत. गडावर येणारांस मठांत अन्न मिळतें. गडावरील सर्व व्यवस्था चाफळच्या स्वामीमहाराजांकडे आहे. माघ वद्य १ पासून ९ पर्यंत उत्सव होऊन दशमीला ललित होतें. उत्सवास समर्थशिष्यांच्या पालख्या गडावर येतात. टाकळी मठांतून उद्धवस्वामीची पालखी पौष वद्य १३ रोजीं निघून सज्जनगडास जाते. कल्याणस्वामीची पालखी माघ शुद्ध ४ रोजीं डोमगांवाहून निघून कुर्डूवाडी, लऊळ, आरण, पंढरपूर, म्हसवड, गोंदवलें, कोरेगांव या रस्त्यानें गडावर जाते. श्रीशिवाजीमहाराजांची पालखी माघ शुद्ध ८ रोजीं रायगडाहून निघते. वेणाबाईची पालखी माघ शुद्ध ११ रोजीं मिरजेहून निघते व आईसाहेबमहाराजांची

पालखी वाईहून माघ वद्य ३ स निघते. या पांचही पालख्या माघ वद्य ५ रोजीं सातारा येथें एकत्र होऊन सायंकाळीं मोठी मिरवणूक निघते. नंतर माघ वद्य ७ रोजीं पालख्या सज्जनगडावर पोंचतात व तेथें तीन रात्री मुक्काम करून परत स्वस्थानीं जातात.

येणेंप्रमाणें हें संक्षिप्त श्रीसमर्थचरित्र, समर्थांच्याच कृपेनें येथें पूर्ण झालें.

## १३

# उपसंहार

महाराष्ट्र संतशिरोमणि श्रीज्ञानदेव यांच्या समाधिकालापर्यंत आपला महाराष्ट्र देश पूर्ण स्वतंत्र होता. त्यानंतर उत्तरेकडून मुसलमानांची टोळधाड दक्षिणेंत आली व तिनें देवगिरीच्या यादव राजघराण्याचा पहिला बळी घेतला. पुढें हळूहळू मुसलमानांची राजसत्ता महाराष्ट्रांत दृढ होत चालली व त्यांचीं लहान लहान राज्यें इकडे स्थापन होऊं लागलीं. खालीं तुंगभद्राकांठीं विजयनगरचें प्रबल हिंदुराज्य. होतें, परंतु पुढें तालिकोटच्या लढाईंत पांच मुसलमान नबाबांच्या संयुक्त सैन्याकडून तेंही पराभव पावलें. अशा रीतीनें अगदीं थोड्या वेळांत, आणि थोड्याशा सैन्याच्या जोरावर, तत्कालीन हिंदु राजांचा मुसलमानांनीं मोड करून सर्वत्र स्वसत्ता स्थापन केल्यामुळें, अकस्मात् दिवा गेल्यामुळें मुलें जशीं भयभीत होऊन अंधारांत चांचपडूं लागतात तशी स्थिति महाराष्ट्रीयांची झाली. ते किंकर्तव्यमूढ झाले. फार वर्षें युद्धाचा सराव

व अनुभव नसल्यामुळें जयिष्णु मुसलमानांपुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं. बहुत दिवसांची स्वस्थता आणि सुखासीनता प्रतिकार-क्षमतेस घातक झाली. शिवाय, स्वार्थमूलक फितुरी आणि विश्वासघात यांचाही बुजबुजाट होताच. अशा प्रकारचा हा काल म्हणजे खरोखर मोठा विपत्कालच होय. येवढ्या थोड्या वेळांत ज्यांनीं आपणास जिंकलें ते व त्यांचा धर्म आपल्यापेक्षां व आपल्या धर्मापेक्षां केव्हांही श्रेष्ठच असले पाहिजेत अशी सर्वसामान्य जनतेची समजूत होणें अगदींच अस्वाभाविक नाहीं. जितांपेक्षां जेते श्रेष्ठ असले पाहिजेत व म्हणून त्याचें अनुकरण जितांनीं केलें पाहिजे अशी समजूत इंग्रजी अमदानीच्या आरंभीं आमच्यांतील सुजाण लोकांचीही झाली होती व तिचीच ही पूर्वावृत्ति मुसलमानी राजसत्तेच्या आरंभीं महाराष्ट्रांत निघाली होती. कांहीं अंशीं या चुकीच्या समजुतीमुळें व कांहीं अंशीं स्वार्थबुद्धीनें तत्कालीन महाराष्ट्रीय हिंदु मुसलमानांचें अनुकरण करूं लागले व बरेच हिंदु बाटून किंवा बाटविले जाऊन मुसलमान झाले. आज महाराष्ट्रांत जे थोडेसे मुसलमान दृष्टीस पडतात त्यांतले बहुतेक या बाटलेल्या हिंदूंचे वंशज आहेत. त्या वेळीं महाराष्ट्रांत उठलेली ही धर्मांतराची लाट कोणी थोपवून धरली ? वाचक हो, हें महत्कार्य, तुमच्यांतले कांहीं शाहणे ज्यांना 'संताळें' म्हणतात त्या संतांनीं केलें. त्या तमोमय कलिकालांत स्वधर्माभिमानाची ज्योत जर कोणी तेवत ठेवली असेल तर ती या टाळकुट्या संतांनींच ठेवली हें विसरूं नका. परकीय राजसत्तेशीं दोन हात करून आपलें गेलेलें राज्य परत मिळविणें हें काम योद्धे आणि मुत्सद्दी यांचें; संतांचें नव्हे. तें काम जर संतांनीं केलें असतें तर त्यांना आपण संत न म्हणतां वीरपुरुष म्हटलें असतें. पण स्वराज्याची स्थापना करणारा वीरपुरुष पुढें निर्माण व्हावयाचा होता व त्याच्या भावि कार्यासाठीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



जमीन साफसूफ करण्याचीच तेवढी कामगिरी संतांनी करावयाची होती. ही कामगिरी त्यांनीं कशी काय बजावली याची साक्ष महाराष्ट्राचा इतिहास देतच आहे.

शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंवतांच त्यांच्या भगव्या झेंड्यासभोंवतीं जे हजारों लोक भराभर गोळा झाले ते काय आकाशांतून खालीं उतरले होते? ते या महाराष्ट्रांतलेच लोक होते, आणि त्यांच्या मनांत परकीय राजसत्तेविषयीं तिटकारा आणि त्वेष उत्पन्न करून त्यांच्या अंगांत जयिष्णुतेचा प्रार्दुभाव करण्यास महाराष्ट्र संतांची स्वधर्मप्रेमाची शिकवणूकच पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेली होती. खुद्द शिवाजीमहाराजांसदेखील आपल्या अंगीकृत कार्यांत साधुसंतांच्या आशीर्वादाची आवश्यकता वाटली. सहाशें वर्षांपूर्वी नामदेव, जनाबाई, विसोबा खेचर, चोखामेळा, राका, बंका, नरहरि सोनार, सांवतामाळी, जगमित्र नागा, जोगा परमानंद, गोरा कुंभार इत्यादि संतांनीं महाराष्ट्रांतील हिंदूंचें स्वधर्मप्रेम कायम ठेवण्याचा जो प्रयत्न केला त्याचा परिणाम पुढें असा झाला कीं, हिंदू लोकांस हातीं धरून त्यांचें साहाय्य मिळविल्याशिवाय येथें आपला निभाव लागावयाचा नाहीं अशी मुसलमान नबाबांची खात्री झाली व त्यामुळें त्यांच्या कारभारांत हिंदु मुत्सद्दी आणि हिंदु योद्धे यांचा शिरकाव होऊन पुढें पुढें तर त्यांतले कांहीं नबाब हिंदु प्रधानांच्या हातांतलीं कळसूत्री बाहुलीं होऊन बसले. आरंभीं आरंभीं मुसलमानी राजसत्तेविरुद्ध महाराष्ट्रीय संतांनीं उघड उघड फारसा गोंगाट कधीं केला नाहीं, हिंदूंचें स्वधर्मप्रेम कायम रहावें इतकीच खबरदारी त्यांनीं घेतली. पण पुढें, पहिल्यानें एकनाथांनीं आणि मागाहून समर्थांनीं यवन राजसत्तेविरुद्ध उघड उघड शाब्दिक बंड पुकारलें. समर्थांनीं तर अशी कमाल करून सोडली कीं, त्या वेळीं जर, हल्लींच्यासारखा,

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम 3८९०७ वि: चरित्र
क्रमांक ९२... नों: दि: ...



राजद्रोहाचा कायदा असता तर त्या कायद्याच्या कचाट्यांत ते अगदीं सहज सांपडले असते. श्रीसमर्थ रामदासस्वामींचें वैशिष्ट्य या त्यांच्या जळजळीत राजद्रोही उद्गारांतच आहे.

आमच्या समर्थादि साधुसंतांच्या वैयक्तिक सदाचरणाचा ठसा तत्कालीन हिंदु समाजावर उमटला असला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं, पण कांहीं मुसलमानांवरदेखील त्यांच्या शिकवणुकीचा परिणाम होऊन त्यांनीं हिंदु साधूंचें शिष्यत्व पतकरलें होतें हें ऐकून मात्र वाचकांस आश्चर्य वाटेल. अहमदनगर जिल्ह्यांतील चांभारगोंदें गांवचे संतकवि शेखमहमद यांची मुलाणाची वृत्ति असतां, बोकड कापण्यासाठीं हातीं घेतलेली सुरी भिरकावून देण्या-इतका कळवळा त्यांच्या मनांत उत्पन्न होण्यास हिंदु साधूंचा उपदेशच कारणीभूत झाला नाहीं काय ? हे शेख महमद चंद्रभट ऊर्फ चांगबोधला नामक एका ब्राह्मण सत्पुरुषाचे शिष्य असून पंढरीचे वारकरी होते. गोपाळनाथ त्रिपुटीकर यांचे शिष्य शेख सुलतान अल्ली; ते आपल्या एका पद्यांत म्हणतात, '**गोपाळनाथ हंबीर ज्ञानाचा सागर । शेखसुलतानअल्ली किंकर लोळे चरणांवर.**' अशा रीतीनें, महाराष्ट्रीय संतांनीं कांहीं मुसलमानांस 'किंकर' बनवून आपल्या 'चरणांवर लोळावयास' लाविलें. महाराष्ट्रांतील संतांनीं केलेली ही कामगिरी कांहीं अगदींच उपेक्षणीय नाहीं. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हें महाराष्ट्राचें संतपंचायतन; या पंचायतनासभोंवतीं इतर संतपरिवार; आणि या संतांच्या वाङ्मयांत महाराष्ट्राचें खरें स्वरूप प्रतिबिंबित झालेलें आहे; म्हणून या संतांची आणि त्यांच्या वाङ्मयाची उपेक्षा महाराष्ट्रीयांनीं करितां कामा नये



श्रीसमर्थचुरणा...
५२०८
REFBK-0005275